


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार १५ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## कॉ.पानसरे हत्याप्रकरण

# सर्वच आरोपींची सुटका

**कोल्हापूर / प्रतिनिधी-**कोल्हापूर येथील कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यातील संशयित डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे




आणि शरद कळसकर यांना कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झाला आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणी आजपर्यंत एकूण १२ संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ९ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता. मात्र, या प्रकरणातील डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना जामीन मंजूर झाला नव्हता. जामीन न मिळाल्यामुळे तिघेही कळंबा कारागृहात होते. आज १४ ऑक्टोबर रोजी तिघांच्याही जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापुरातील सर्किट बेंच इथं सुनावणी झाली. यामध्ये तिघांनाही न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

त्यामुळे कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आजपर्यंतचे एकूण सर्वच १२ संशयीतांना आता जामीन मंजूर झाला आहे. दरम्यान याच मुद्दयांवर बोट ठेवत सनातन संस्थेने निरपराध हिंदुत्वनिष्ठांची साडे नउ वर्षांची भरपाई कोण करणार? असा सवाल केला आहे.पानसरे हत्याप्रकरणी निष्पाप हिंदुत्वनिष्ठ डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना जामीन मंजूर झाल्यानंतर त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे.

# आयटीआयमध्ये आता 'मंत्रोपचार आणि पौरोहित्य' अभ्यासक्रम

**नाशिक/प्रतिनिधी : :** सरकारतर्फे 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पहिल्यांदाच वैदिक संस्कार ज्युनिअर असिस्टंट हा नवा अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. पुढील वर्षी नाशिकमध्ये भरणा-या कुंभमेळ्यामध्ये वैदिक विधीसाठी पुरोहित उपलब्ध व्हावेत म्हणून तेथील आयटीआयमध्ये अभ्यासक्रम



सुरू केला जात आहे.अभ्यासक्रमासाठी इच्छुकांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेत अर्जाची छाननी आणि मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

**सिंहस्थात पुरोहितांच्या उपलब्धतेसाठी कोर्स**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पहिल्यांदाच वैदिक संस्कार ज्युनिअर असिस्टंट हा अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. पुढील वर्षी नाशिकमध्ये भरणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये वैदिव विधीसाठी पुरोहित उपलब्ध व्हावेत म्हणून तेथील आयटीआयमध्ये हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. यास चांगला प्रतिसाद मिळण्याच अपेक्षा आहे. वैदिक संस्कार, मंत्रोच्चाराचे मिळणार धडे-नाशिकमध्ये होणा-या २०२६ च्या कुंभमेळ्यासाठी प्रशिक्षित पुजारी तयार करण्यासाठी विशेष अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना वैदिक संस्कार आणि मंत्रोच्चाराचे प्रशिक्षण दिले जाईल, ज्यामुळे कुंभमेळ्यात योग्य प्रशिक्षण घेतलेले पुजारी उपलब्ध होतील. आधुनिक तंत्रशिक्षण-आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रशिक्षणासोबत वैदिक मंत्रांचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. या उपक्रमाचा उद्देश तांत्रिक कौशल्यासोबत आध्यात्मिक ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. हा अभ्यासक्रम पहिल्यांदाच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राबविला जाणार आहे.

**इतरही शेकडो नवे अभ्यासक्रम सुरू !-** राज्यभरात कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता वाढवण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सौरउर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, कृत्रिम प्रज्ञा, ग्रीन हायड्रोजन, मोबाइल दुरुस्ती आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर व इतरही शेकडो नवे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

## शिंदेंचा आणखी एक निर्णय फडणवीसांनी बदलला

# बच्चू कडू यांना कार्यालयासाठी जागा देण्याचा निर्णय रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात घेतलेले निर्णय बदलण्याचा सपाटाच विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लावला आहे. गेल्या दहा महिन्यांमध्ये अनेक निर्णय बदलले गेले, शिंदेंनी सुरू केलेल्या योजना बंद केल्या. त्यात आणखी एका निर्णयाची भर पडली आहे. मुख्यमंत्री असताना शिंदे यांनी बच्चू कडू यांच्या प्रहार या पक्षासाठी मंत्रालयाजवळ जागा दिली होती. तो निर्णय फडणवीसांनी रद्द केला आहे. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बंड केले तेव्हा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी त्यावेळी एकनाथ शिंदे यांना साथ दिली होती. बच्चू कडू यांना दिव्यांग कल्याण विभागाच्या एका महामंडळाचे अध्यक्षपदही देण्यात आले होते. त्याचबरोबर बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षासाठी मंत्रालयासमोर जागा देण्यात आली होती.



जनता दल सेक्यूलर (जेडीएस) पक्षाच्या कार्यालयाची जागा कमी करुन तिथेच प्रहार जनशक्ती पक्षासाठी जागा दिली होती. मंत्रालयाशेजारी जनता दलाचे ९०० चौरस फुटाचे कार्यालय आहे. त्यातील ७०० चौरस फुट जागा तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्ष कार्यालयासाठी दिली होती. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचा हा निर्णय बदलला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाची जागा काढून घेतली आहे. जेडीएसला पूर्वीप्रमाणेच संपूर्ण जागा देण्याचा निर्णय फडणवीसांनी घेतला आहे.

# 'मी तुमची अनेक प्रकरणे पाहिली आहेत' - CJI गवईनी ईडीला फटकारले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तमिळनाडू स्टेट मार्केटिंग कॉर्पोरेशन (TASMAC) मधील १००० कोटींच्या घोटाळा प्रकरणावर आज (१४ ऑक्टोबर २०२५) सर्वोच्च न्यायालयाने प्रवर्तन संचालनालयाला (ED) तीव्र शब्दांत फटकारले. मुख्य न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने ईडीला थेट प्रश्न केला की, 'जेव्हा राज्यातील पोलिस या प्रकरणाचा तपास करू शकतात, तर ईडीने हस्तक्षेप करण्याची गरज काय होती? हा राज्याच्या अधिकारक्षेत्रावर अतिक्रमण नाही का?

**सुप्रीम कोर्टाचे निरीक्षण-**सीजेआय गवई आणि न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणावर सुनावणी झाली. ईडीने मार्च २०२५ मध्ये TASMAC च्या चेन्नई मुख्यालयावर छापे टाकले होते. एजन्सीने या कारवाईदरम्यान संगणक आणि इतर दस्तऐवज जप्त केले होते. दारु च्या किमतींमध्ये फेरफार, टेंडर प्रक्रियेत गैरव्यवहार आणि लाचखोरी केल्याचा आरोप ईडीने केला होता. सुनावणीदरम्यान न्यायालयाने विचारले की, राज्य पोलिस या प्रकरणाची चौकशी करू शकले नसते का? ईडीला हस्तक्षेप करण्याची आवश्यकता का वाटली? राज्यात कायदा व सुव्यवस्था कोण राखतं? यामुळे देशाच्या संघीय रचनेवर काय परिणाम होईल?

**सीजेआय गवईंची ईडीवर टिप्पणी-** यादरम्यान, मुख्य न्यायाधीश गवई म्हणाले की, गेल्या सहा वर्षांत मी ईडीच्या तपासाची अनेक



प्रकरणे पाहिली आहेत. पण त्यावर काही बोललो, तर उद्या ते सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनेल. यावर ईडीचा पक्ष मांडणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले, महोदय, सोशल मीडियावर आमच्या बाजूने कोणी बोलतच नाही, हाच आमचा खरा आक्षेप आहे.

**दोन्ही बाजुचा युत्तीवाद-** TASMAC च्या वतीने वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी ईडीच्या कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले की, सरकारी संस्थेवर अशा प्रकारे छापा टाकला जाउ शकतो का? तपासाचा आदेश स्वत? TASMAC ने दिला होता. तरीही व्यवस्थापकीय संचालकांच्या घरावर छापा टाकण्यात आला. एफआयआर नोंदवली आणि लगेच ईडीची चौकशी सुरू झाली, हे आश्चर्यकारक आहे.ईडीने संगणक जप्त केले, हे धक्कादायक आहे. ईडीला जर कोणती माहिती होती, तर ती स्थानिक पोलिसांना का देण्यात आली नाही? यावर ईडीच्या वतीने एएसजी एस. व्ही. राजू म्हणाले, TASMAC मध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाले आहेत. आतापर्यंत ४७ एफआयआर नोंदवले गेले आहेत. यावर सिब्बल यांनी प्रत्युत्तर दिले की, बहुतेक सर्व एफआयआर आता बंद झाल्या आहेत. त्यामुळे ईडीचे हस्तक्षेप न्यायसंगत नाही. खंडपीठाने अखेरीस ईडीला विचारले की, तुमची कारवाई राज्य पोलिसांच्या अधिकारक्षेत्रावर अतिक्रमण नाही का? जर प्रत्येक राज्य प्रकरणात केंद्राच्या एजन्सी अशा प्रकारे हस्तक्षेप करणार असतील, तर यामुळे देशाच्या संघराज्यीय रचनेवर गंभीर परिणाम होउ शकतो.




# न्याय विभागात 2 हजार 228 पदांची भरती करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाकरिता नव्याने २ हजार २२८ पदांची निर्मिती करण्यास करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत



मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. न्यायालयीन कामकाज गतीने होण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. त्याचबरोबर न्यायालयीन कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेचा जास्तीत जास्त वापर करुन कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने २ हजार २२८ पदे निर्माण करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रिया गतिमान होण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुविधेसाठी या पदाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई येथील मूळ शाखा व अपील शाखा आणि औरंगाबाद व नागपूर खंडपीठाकरिता गट-अ ते गट-ड संवर्गात अतिरिक्त पदांची निर्मिती करण्यात येत आहे. त्यानुषंगाने पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या पद निर्मितीसह या पदांसाठीच्या वेतन अनुदान व अनुषांगिक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. ही पदे गट-अ ते गट-ड या संवर्गातील आहेत. २ हजार २२८ पदांपैकी १७१७ पदे प्रशासकीय कामकाजाशी निगडीत आहेत. मंजूर झालेल्या पदांपैकी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेशी संबंधित ५६२, अपील शाखेशी ७७९, औरंगाबाद खंडपीठ ५९१ आणि नागपूर खंडपीठासाठी २९६ पदांची निर्मिती होणार आहे.

## वारकरी गुरुकुलमध्येच मुलींसोबत नको ते 'कृत्य'

# कोकरे महाराज आणि कदमवर गुन्हा

**खेड/प्रतिनिधी :**रत्नागिरी जिल्ह्यात असलेल्या खेड तालुक्यात लोटे येथे आध्यात्मिक वारकरी गुरुकुल आहे. या गुरुकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या



एका अल्पवयीन युवतीसोबत गुरुकुलच्या प्रमुखाने आणि शिक्षकाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भगवान कोकरे महाराज आणि प्रितेश प्रभाकर कदम अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. भगवान कोकरे महाराज हे आध्यात्मिक वारकरी गुरुकुलचे प्रमुख आहेत. तर कदम हे शिक्षक आहेत. पोलिसांनी दोघांविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्यातील कलम १२ व १७, त्याचबरोबर भारतीय न्याय संहितेतील कलम ७४,३५१(३) आणि ८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. कोकरे यांच्या या आध्यात्मिक वारकरी गुरु कुलमध्ये अनेक ठिकाणची मुले, मुली शिक्षण घेतात. एका मुलीचा विनंयभग करत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप कोकरे आणि कदम यांच्यावर आहे. ही घटना उघडात आल्यानंतर लोक संताप व्यक्त करत आहेत.

# आवाज केला तर अजून लोकांना बोलवू

## काळजावर दगड ठेवून पीडितेने सांगितली अत्याचाराची कहाणी

**दुर्गापूर/प.बंगाल/वृत्तसंस्था : :** पश्चिम बंगालच्या दुर्गापूरमध्ये एमबीबीएसच्या विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनं संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. जेवणासाठी बाहेर गेलेल्या विद्यार्थिनीवर नराधमांनी अत्याचार केला. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून पोलिस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

दुसरीकडे, सामूहिक बलात्कार झालेल्या तरुणीने त्या दिवशी नेमके काय घडले हे सांगितले आहे. तिने तिच्यावर उपचार करणा-या डॉक्टरांना सांगितले की, त्या रात्री जेवण करून परत येत असताना, तिला काही पुरूषांनी जंगलात ओढत नेले होते. या प्रकरणामुळे पश्चिम बंगालमध्ये वातावरण तापले असून सरकारवर जोरदार टीका केली जात आहे. दुर्गापूर



सामूहिक बलात्कार प्रकरणातील वैद्यकीय शिक्षण घेणा-या विद्यार्थिनीच्या जबाबाने देशभरात खळबळ उडाली आहे. ही घटना १० ऑक्टोबरच्या रात्री घडली, जेव्हा दुस-या वर्षाच्या वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थिनी तिच्या मैत्रिणीसोबत जेवण करून परतत होती. वाटेत काही लोकांनी तिला घेरले आणि तिला जंगलात नेउन अत्याचार केला. (पान २ वर)

# हरियाणातील ASI ची आत्महत्या: मरण्यापूर्वी व्हिडिओ बनवला

## म्हणाला- भ्रष्टाचार प्रकरणात बदनामीच्या भीतीने IPS पुरण यांनी आत्महत्या केली



**रोहतक/वृत्तसंस्था : हरियाणातील रोहतक येथील सायबर सेलमध्ये तैनात असलेले एएसआय संदीप कुमार यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. त्यांचा मृतदेह लधोत-धामड रोडवरील एका फार्महाउसमध्ये आढळला. घटनास्थळी एक सुसाईड नोट सापडली आहे. त्यांनी मरण्यापूर्वी एक व्हिडिओ रेकॉर्ड केला. एका एएसआयने दिवंगत आयपीएस अधिकारी वाय. पुरण कुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला. भ्रष्टाचार प्रकरणात बदनामी होण्याची भीती बाळगून पुरण कुमार यांनी आत्महत्या केली. त्यांच्या कुटुंबाच्या राजकीय कारकिर्दीवर त्याचा परिणाम होण्याची भीती त्यांना होती. तथापि, पोलिसांनी सुसाईड नोट किंवा व्हिडिओची पुष्टी केलेली नाही.**

**संदीपने व्हिडिओमध्ये काय म्हटले .....**

राव इंद्रजीतला वाचवण्यासाठी ५० कोटींचा सौदाः संदीपचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये तो म्हणत आहे - 'मी, संदीप कुमार, तुम्हाला एक सत्य सांगू इच्छितो. सत्याची खूप मोठी किंमत मोजावी लागते. भगतसिंगांनीही आपले बलिदान दिले. त्यांना आपले जीवन संपवावे लागले, तेव्हाच हा देश जागा झाला. सदर पोलिस स्टेशनमधील एका खून प्रकरणात पैसे घेणारा एक भ्रष्ट पोलिस अधिकारी आहे. त्याने राव इंद्रजीतला वाचवण्यासाठी ५० कोटींचा सौदा केला.' नरेंद्र बिजर्निया त्यांच्या बोलण्यावर ठाम राहिलेः संदीप पुढे म्हणाले की, प्रामाणिक अधिकारी नरेंद्र बिजर्निया त्यांच्या बोलण्यावर ठाम राहिले. त्यांनी त्यांच्या पोस्टिंग दरम्यान नेहमीच प्रामाणिकपणे काम केले, भ्रष्ट लोकांना बाजूला ठेवून, स्वत?च्या पगारावर जगले. त्यांनी पोलिस कर्मचा-यांचे भले केले. ज्या दिवशी त्यांना आयजी म्हणून नियुक्त करण्यात आले, त्या दिवशी त्यांनी कार्यालयातील प्रत्येक कर्मचा-याची जात पाहिली आणि त्यांना काढून टाकण्यास सुरुवात केली. त्यांनी स्वतःच्या भ्रष्ट अधिका-यांची नियुक्ती करण्यास सुरु वात केली. त्या लोकांना माहित (पान २ वर)

## IPS पूरन कुमार यांच्या पत्नीला अटक करा, ASI संदीप यांच्या कुटुंबीयांनी केली मागणी

हरियाणामधील आयपीएस अधिकारी वाय पूरन कुमार यांनी स्वतःवर गोळ्या झाडून घेत जीवन संपवल्याची घटना ताजी असतानाच आज रोहतक येथील एएसआय संदीप कुमार यांनीही जीवन संपवले. पूरन कुमार यांनी जीवन संपवण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमधून वरिष्ठांवर गंभीर आरोप केले होते. तर संदीप कुमार यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेली चिठ्ठी आणि व्हिडीओमधून पूरन कुमार यांच्यावर गंभीर आरोप केल्याने या प्रकरणात प्रचंड गुंतागुंत निर्माण झाली आहे. तसेच आता संदीप कुमार यांच्या कुटुंबीयांनी दिवंगत आयपीएस अधिकारी वाय. पूरन कुमार यांच्या पत्नीला अटक करण्याची मागणी केली आहे. एएसआय संदीप कुमार हे रोहतक जिल्ह्याच्या सायबर सेलमध्ये तैनात होते. त्यांनी आज टोकाचं पाउल उचलत जीवन संपवलं होतं. संदीप यांच्या मृत्युमुळे कुटुंबीय आणि स्थानिकांना धक्का बसला आहे. संदीप कुमार यांनी दबावाखाली येउन जीवन संपवल्याने त्यासाठी पूरन कुमार यांची पत्नी आणि त्यांच्या समर्थकांना अटक करण्यात यावी, अशी मागणी त्यांचे कुटुंबीय करत आहेत. जोपर्यंत पूरन कुमार यांच्या पत्नी अमनीत पी. कुमार यांना अटक केली जात नाही तोपर्यंत संदीप यांच्यावर अंत्यसंस्कार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे. हरयाणामधील जींद जुलाना परिसरात राहणा-या संदीप यांचे चुलत भाउ शिशपाल आर्य यांनी सांगितले की, पूरन कुमार यांची पत्नी आणि समर्थकांवर तत्काळ केस दाखल केली गेली पाहिजे. त्यांना अटक केल्याशिवाय आमच्या कुटुंबीयांना न्याय मिळणार नाही. संदीप यांनी जीवन संपवल्याचं आम्हाला मान्य नाही. त्यांच्यावर दबाव आणून त्यांना जीवन संपवण्यास भाग पाडण्यात आलं आहे. जर संदीप यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली असेल, तर धरणे आंदोलन करण्यासाठी बसलेल्या किमान ५-७ जणांना त्यांनी लक्ष्य केलं असतं. पण असं झालं नाही. त्यामुळे त्यांचा मृत्यू नैसर्गिक नाही आहे, असा आमचा संशय आहे, असे त्यांनी सांगितले. एएसआय संदीप कुमार हे जींदमधील जुलाना येथील रहिवासी होते. मात्र गेल्या एक वर्षापासून ते रोहतक येथील सायबर सेलमध्ये तैनात होते. मात्र आता त्यांचं अचानक निधन झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# चांदी 1,95,000 रुपयांवर

**मुंबई/प्रतिनिधी :** चांदीच्या भावातील नवनवीन उच्चांक दररोज गाठले जात असून मंगळवारी (१४ ऑक्टोबर) इतिहासात प्रथमच एकाच दिवसात चांदी १५ हजार रुपयांनी वधारली. या भाव वाढीसह चांदी एक लाख ९५ हजार रुपये अशा विक्रमी भावावर पोहचली आहे. दुसरीकडे सोन्याच्याही भावात दोन हजार ७०० रुपयांनी वाढ होउन ते एक लाख २७ हजार ४०० रुपयांवर पोहोचले आहे. जगभरात चांदीचा तुटवडा जाणवत असल्याने तिचे भाव दररोज वाढत आहे. या आठवड्यात तर चांदीमध्ये तीन वेळा मोठी भाववाढ नोंदली गेली आहे. पाच दिवसातील अंतराने दोन वेळा ११ हजार रुपयांनी वधारलेली चांदी मंगळवारी एकाच दिवसात थेट १५ हजार रुपयांनी वधारली. सुवर्ण (पान २ वर)



# 50 प्रवासी असलेल्या बसला भीषण आग, 10 जणांचा मृत्यू

**जैसलमेर/वृत्तसंस्था :**राजस्थानातील जैसलमेर येथे आज (१४ ऑक्टोबर) क धक्कादायक घटना घडली आहे. प्रवाशांनी भरलेल्या बसला आग लागली आहे. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला आहे. ही बस जैसलमेरहून जोधपूरला जात होती. त्याचवेळी बसला आग लागल्याची घटना घडली. या बसमध्ये एकूण ५० हून अधिक प्रवासी प्रवास करत होते.

**या बसमधले १४ प्रवासी गंभीर भाजले आहेत-**बसच्या समोरच्या सीटवर बसलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्यात यश आलं आहे. पण मागच्या सीटवर बसलेले लोक भाजले आहेत. या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसमधील १४ प्रवासी गंभीररित्या भाजले गेले आहेत आणि त्यापैकी १० प्रवाशांचा मृत्यू झाल्याचं वृत्त ऑल इंडिया रेडिओने दिलं आहे.

बस जैसलमेरवरुन जोधपूरला येथे जात होती. जेव्हा ही बस वॉर म्युझियमच्याजवळ पोहचली, असताना अचानक बसमधून धूर येउ लागला आणि काही क्षणात बस जळून खाक झाली. त्यामुळे कोणाला वाचवण्याची संधी मिळाली नाही. (पान २ वर)



# फ्रेजरपुरा प्रशांत नगर नाला पूल परिसराची आयुक्त सौम्या यांनी केली पाहणी

## तातडीने उपाययोजना करण्याचे दिले निर्देश



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिका नागरिकांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक १४ ऑक्टोंबर २०२५ रोजी पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक ११ मधील फ्रेजरपुरा परिसरातील प्रशांत नगर नाला पूल परिसराची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान परिसरातील नाल्यांची स्वच्छता, पावसाळ्यातील पाणी निचरा व्यवस्थापन, नागरिकांना होणाऱ्या अडचणी तसेच पूलाभोवतीच्या स्वच्छतेची स्थिती यांचा सखोल आढावा आयुक्तांनी घेतला. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, नाल्यांवरील झाकणांची स्थिती, आणि जलनिकासी अडथळ्यांचे निरीक्षण करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती दुरुस्ती आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सर्व अधिकाऱ्यांना परिसरातील कामांबाबत जबाबदारीने व समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश दिले.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी सांगितले की, महानगरपालिकेचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे. नाल्यांमधील गाळ काढणे, अतिक्रमण हटवणे आणि नियमित साफसफाई ठेवणे या गोष्टी वेळेवर केल्या गेल्यास पावसाळ्यात पाणी तुंबण्यासारख्या समस्या टाळता येतील.

तसेच त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, नाल्यांमध्ये घनकचरा, प्लास्टिक व अन्य कचरा टाकू नये. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले. या पाहणीदरम्यान झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, अभियंता नितीन भटकर, मंगेश कडू, स्वास्थ निरीक्षक शक्ती पिवाल, योगेश कंडारे आणि कुळकर्णी आदी अधिकारी उपस्थित होते.

# महिला बचतगटांचा दिवाळी फराळ, खाद्यान्ने खरेदी करुन प्रोत्साहन द्या

## - मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महोपात्र

अमरावती/प्रतिनिधीः- महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या वतीने दिवाळी महोत्सवानिमित्त 'मेळघाट हाट', सायन्सस्कोर मैदान येथे भरविण्यात आलेल्या भव्य विक्री व प्रदर्शन मेळाव्याचे उद्घाटन आज मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महोपात्र यांच्या हस्ते झाले. महिला बचत गटांनी तयार केलेला दिवाळी फराळ, खाद्यान्ने खरेदी करुन त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संजीता महोपात्र यांनी केले.

महा एफ.पी.सी.संचालक सुधीर इंगळे, माविमचे विभागीय सल्लागार केशव पवार, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार पवन देशमुख, वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखेडे तसेच शासकीय कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.




मेळाव्यात जिल्ह्यातील विविध महिला बचत गट यांच्याकडून

### मेळघाट हाट येथे भव्य विक्री व प्रदर्शन मेळावा १९ ऑक्टोबरपर्यंत

हस्तनिर्मित उत्पादने, स्थानिक खाद्यपदार्थ, दिवाळी फराळ, सजावटीच्या वस्तू, कापड, सुगंधी अगरबत्ती, तसेच ग्रामीण भागातील पारंपरिक कलाकृती यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. महिलांच्या कष्टातून आणि कौशल्यातून घडविलेल्या या वस्तूंना नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेकांनी आपल्या घरासाठी व दिवाळी भेटवस्तूसाठी महिला उद्योजिकांच्या उत्पादनांची खरेदी करून 'वोकल फॉर लोकल' या संकल्पनेला हातभार लावला आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत १९ ऑक्टोबरपर्यंत मेळघाट हाट येथे भरविण्यात आलेल्या या दिवाळी विशेष विक्री व प्रदर्शनास भेट देवून महिला उद्योजकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे. या माध्यमातून 'आत्मनिर्भर महिला - सशक्त समाज' हा संदेश दिला जाईल, असे आवाहन डॉ. रंजन वानखेडे यांनी केले आहे.

# १६ ते २१ ऑक्टोबरदरम्यान सांस्कृतिक भवनात दिवाळी आनंदोत्सव

### आयुक्तांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिका आणि विधिमंत्र संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ ते २१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सांस्कृतिक भवन, अमरावती येथे 'दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन' या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

सहा दिवस चालणाऱ्या या उत्सवामध्ये फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शनी, हस्तकला व बचत गटांचे स्टॉल्स, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच स्थानिक कलाकारांचे सादरीकरण असे विविध आकर्षक उपक्रम ठेवण्यात आले आहेत. शहरातील नागरिक, विद्यार्थी, छायाचित्रकार, महिला बचत गट, व्यापारी व तरुणांसाठी हा उत्सव एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरणार आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, 'दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे, आणि या आनंदोत्सवाच्या माध्यमातून शहरातील नागरिक एकत्र येऊन संस्कृती, कला आणि सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करतील. नागरिकांनी परिवारासह उपस्थित राहून या उपक्रमाला यशस्वी करावे, ही मनापासून विनंती आहे.'

या कार्यक्रमाचे उद्घाटन १६ ऑक्टोबर रोजी दुपारी भव्य सोहळ्यात होणार असून, २१ ऑक्टोबर रोजी समारोप आणि विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

अमरावती महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना या दिवाळी आनंदोत्सवात सहभागी होण्याचे आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### ५० प्रवासी असलेल्या

आग लागली तेव्हा बसमध्ये ५० प्रवासी बसले होते. आग लागल्यानंतर काही प्रवासी खिडक्या आणि दरवाज्यातून बाहेर आले.परंतू काही प्रवासी अडकले आणि आगीच्या तावडीत सापडले. रस्त्यावरील लोकांनी या अपघाताची तक्रार पोलीस आणि अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर मदत आणि बचाव कार्य सुरु झालं. सदर घटनेची माहिती मिळताच राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी पोस्ट लिहून दु?ख व्यक्तकेलं आहे. या बसच्या दुर्घटनेत ज्या प्रवाशांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबाबत मी सहवेदना व्यक्तकरतो. जे प्रवासी भाजले आहेत त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांना लवकर आराम मिळावा यासाठी मी देवाकडे प्रार्थना करतो आहे. या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

### चांदी 1,95,000

बाजाराच्या इतिहासात मौल्यवान धातूमध्ये प्रथमच एका दिवसात एवढी वाढ झाली आहे. या भाववाढीमुळे चांदी एक लाख ९५ हजार रुपये प्रति किलोवर पोहचून दोन लाख रुपयांच्या दिशेने झेप घेत आहे. एक किलो चांदीसाठी आता जीएसटीसह दोन लाख ८५० रुपये मोजावे लागणार आहे.

सोनेही उच्चांकी पातळीवर – चांदीसह सोन्याच्याही भावात मंगळवारी मोठी भाव वाढ झाली. सोमवारी एक लाख २४ हजार ७०० रुपयांवर असलेल्या सोन्याच्या भावात मंगळवारी दोन हजार ७०० रुपयांनी वाढ होउन ते एक लाख २७ हजार ४०० रुपयांवर पोहोचले आहे. सोनेदेखील आता सव्वा लाखाच्या पुढे गेले असून एक तोळे सोन्यासाठी जीएसटीसह एक लाख ३१ हजार २२२ रुपये मोजावे लागणार आहे.

### आवाज केला तर अजून

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर बोलताना ती इतक्या रात्री बाहेर काय करत होती असे विचारल्यानंतर हे प्रकरण अधिकच चर्चेत आले.आम्ही तीन जणांना त्यांची गाडी सोडून आमच्याकडे येताना पाहिले. घाबरून आम्ही जंगलात पळत गेलो. ते माझ्या मागे धावत आले. त्यांनी मला पकडले आणि जंगलात ओढले. मग त्यांनी माझा फोन घेतला आणि माझ्या मैत्रिणीला बोलवायला सांगितले. माझी मैत्रीण आली नाही म्हणून त्यांनी मला जंगलात नेले आणि झोपवले. एका माणसाने माझी पँट उघडली आणि माझ्यासोबत चुकीच्या गोष्टी करू लागला. मी ओरडू लागलो तेव्हा त्यांनी धमकी दिली की जर मी जास्त आवाज केला तर आणखी लोक येतील आणि असेच करतील असे पीडितेने सांगितले. घटनेची माहिती समोर आल्यानंतर जनतेचा रोष वाढला. बंगाल पोलिसांच्या म्हणण्यानुसार, बलात्कार प्रकरणात पाच जणांना अटक करण्यात आली आहे. आरोपींमध्ये मेडिकल कॉलेजमधील माजी सुरक्षा रक्षक, रुग्णालयातील कर्मचारी, नगरपालिका कर्मचारी आणि एका बेरोजगार तरुणाचा समावेश आहे. एका आरोपीच्या बहिणीनेही त्याला पकडण्यात पोलिसांना मदत केली. दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी रात्री १२:३० वाजता विद्यार्थिनी कशी बाहेर पडली असा प्रश्न उपस्थित केल्याने राजकीय वादाला तोंड फुटले. भाजपने त्यांच्या या विधानावर टीका केली. विद्यार्थिनीच्या पालकांनीही कॉलेजवर निष्काळजीपणाचा आरोप केला. विद्यार्थिनीच्या वडिलांनी कॅम्पसमध्ये पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप केला.

### हरियाणातील ऋृक्ष ची आत्महत्या:

होते की कोणत्या फाईल्समध्ये चुका आहेत, म्हणून त्यांनी लोकांना फोन करून पैसे मागायला सुरुवात केली. मी जे म्हणतो ते खरे आहे. त्यांनी तिथे असे वातावरण निर्माण केले की जर कोणी तिथे गेले तर सुशील पैसे मागू लागला. तुम्ही लोक न्यायाच्या खुर्चीवर बसला आहात, तुम्ही पैसे कसे मागत आहात? एक व्यापारी आधीच त्रासलेला आहे, गुंड त्याला आधीच जीवे मारण्याची धमकी देत आहेत. तुम्ही लोक त्याला फोन करून त्रास देत आहात. म्हणूनच त्याला ही खुर्ची मिळाली का? त्याची पत्नी आयएएस अधिकारी आहे, त्याचा मेहुणा आमदार आहे. न्याय नेहमीच जनतेकडून मिळतो. मी आज खरे सांगतोय. त्याच्याविरुद्ध दाखल झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारीच्या भीतीने त्याने आत्महत्या केली.'

'जेव्हा आम्ही सुशीलच्या बंदूकधारीला पकडले, तेव्हा त्याने आम्हाला वाटेत सांगितले की अजून एक गोष्ट बाकी आहे. मी दुस-या ठिकाणाहून लाच घेतली होती आणि ते पैसे गाडीच्या डॅशबोर्डवर राहिले होते. ड्रायव्हर धर्मेंद्रने गाडी घेतली होती. गाडीत धर्मेंद्र आणि सुशील हे दोघेच होते. त्यांना खटल्यात सामील होण्याची सूचना देण्यात आली होती. त्यांनी आम्हाला सांगितले की, अधिकारी बसले आहेत आणि १० मिनिटांत बाहेर येतील. आम्ही सांगितले की, ही आमची जबाबदारी आहे.'भविष्यात तुमच्याविरुद्ध चौकशी होईल, सत्य बाहेर येईल. तो खूप अहंकारी होता. जेव्हा त्याने पाहिले की त्याचे पाप ओसंडून वाहत आहेत, जेव्हा त्याला कळले की त्याची बदनामी होईल आणि त्याच्या कुटुंबाची राजकीय कारकीर्दही धोक्यात येईल, तेव्हा त्याने आपल्या कुटुंबाला वाचवण्यासाठी आत्महत्या केली. त्याच्या पत्नीलाही भीती होती की ती भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकू शकते. आयोगात बसून त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी भ्रष्टाचार केला. याची चौकशी झाली पाहिजे. त्यांना यासाठी परवाना मिळत नाही. सर्वांची चौकशी झाली पाहिजे. त्याने लाच घेतली आहे, तो भ्रष्ट माणूस होता.

### नांदगावपेठ पोलिसांनी पकडला

ै-३० बीडी-१५९९ किंमत सुमारे १५ लाख रुपये असा एकूण २१ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहनचालक शिवशंकर ओंकार तायडे (रा. अकोला) आणि हमाल राजेश सोनोने (रा. अकोला) यांनी चौकशीत हा तांदूळ अमोल महल्ले (रा. भातकुली) यांच्या गोदामातून घेऊन वडसा, जि. गडचिरोली येथे नेत असल्याचे सांगितले. त्यांच्या जवळ 'बालाजी ट्रेडर्स'चे बिल सापडले. प्राथमिक चौकशीत संबंधित तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याचा संशय बळावला. त्यामुळे प्रकरणातील मुख्य सूत्रधार आरोपी अमोल महल्ले, शिवशंकर तायडे आणि राजेश सोनोने यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत नांदगाव पेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

सदर कारवाई पुरवठा विभाग अमरावती ग्रामीण व नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे केली. ही कामगिरी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सपोआ कैलास पुंडकर (फ्रेजरपुरा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली.या मोहिमेत निरीक्षक अधिकारी चैताली यादव, पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकों राजीक खान, निलेश साविकार, राजा सय्यद, वैभव तिखीले आणि अमित ढोले यांनी सहभाग घेतला.या कारवाईमुळे अमरावती परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

### अजित पवारांकडून संजय

देखील आज झालेल्या बैठकीत मांडण्यात आला. तसेच प्रत्येक बूथ स्तरावर संघटन मजबूत करणे, आमदार व जिल्हाध्यक्ष यांच्यातील संवाद सुलभ करणे आणि सर्व स्तरावर निवडणूक नियोजन समन्वयपूर्वक राबविण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

बैठकीदरम्यान शिस्त, संघभावना आणि जबाबदारी ही प्रत्येक कार्यकर्त्याची मूलभूत मूल्ये राहतील, हा पक्ष नेतृत्वाचा संदेश पुन्हा एकदा ठळकपणे देण्यात आला. या सत्रात राज्य व जिल्हास्तरीय यंत्रणेतील समन्वय वाढविणे, संघटनात्मक उपक्रमांचे मूल्यमापन करणे आणि पुढील काही महिन्यांसाठी संवाद व जनसंपर्काचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करणे यावर सविस्तर विचारमंथन झाले.

### श्री.क्षेत्र वायगावला आ.राजेश वानखडे

गणेश भक्तांसाठी विशेष महत्त्वाचे आहे, येथील श्री. सिद्धिविनायक गणपती हे विघ्नहर्ता व सिद्धिदाता म्हणून विख्यात आहेत. येथे भक्तांचे विघ्न दूर होऊन मनोकामना पूर्ण होतात. येथील सिद्धिविनायक मंदिरात गणेश जयंती, गणेश चतुर्थी व सोमवार व्रताच्या दिवशी हजारो भक्त दर्शनासाठी येतात. हे तीर्थक्षेत्र केवळ धार्मिक नसून, सांस्कृतिक व पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे आहे. या तीर्थस्थळाचा विकास होऊन भाविकांकरिता विशेष सुविधा निर्माण करण्याकरिता आमदार राजेश वानखडे सातत्याने प्रयत्नशील होते. नव्याने निवडून आल्याबरोबर तसा प्रस्ताव त्यांनी ग्रामविकास विभागाकडे सादर केलेला होता.

महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग)' ही योजना ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या संवर्धन व विकासासाठी एक क्रांतिकारी पाऊल आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणेने शासनाने हाती घेतलेल्या या योजनेमुळे ग्रामीण तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा मिळवता येतो, ज्यामुळे विकास निधी उपलब्ध होतो. या योजनेमुळे तीर्थक्षेत्रांच्या पायाभूत सुविधा सुधारल्या जातात – जसे की रस्ते, प्रवेशद्वार, विश्रामगृहे, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था व पर्यटन सुविधा. परिणामी, स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होते, रोजगार निर्मिती होते व सांस्कृतिक वारसा जपला जातो. राज्य निकष समितीने दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या बैठकीत श्री. क्षेत्र वायगावसह इतर तीर्थक्षेत्रांच्या प्रस्तावांची तपासणी करून हा निर्णय घेतला आहे.आमदार राजेश वानखडे यांचे अथक प्रयत्न महत्त्वाचे आहेत. स्थानिक विकासासह नेहमीच भर देत असून प्रामुख्याने तीर्थक्षेत्रांच्या विकासाबाबत नेहमीच अग्रेसर भूमिका घेतलेली आहे. मोझरी विकास आराखड्यातील इमारतींच्या झालेल्या दुरवस्थेबाबत सुद्धा शासन स्तरावर पाठपुरावा करू त्यासाठी येणाऱ्या काळात भरघोस निधी शासनाकडून खेचून आणण्यासाठी सुद्धा ते प्रयत्न शील आहेत. श्री. क्षेत्र वायगावच्या विकासासाठी त्यांनी शासनाकडे सतत पाठपुरावा केला, प्रस्ताव सादर केले व राज्य निकष समितीसमोर सर्व निकषांची पूर्तता करत हा प्रस्ताव मंजूर झाला असून, त्यांच्या या योगदानामुळे स्थानिक भक्त व नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून 'ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रे ही आपल्या संस्कृतीची जिवंत ओळख आहेत. त्यांचा विकास हा केवळ भौतिक नसून, आध्यात्मिक समृद्धीचा भाग आहे,' असे आमदार वानखडे म्हणाले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांना व पर्यटनाला चालना मिळून स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उंची गाठता येतील. श्री. सिद्धिविनायक गणपती संस्थान, श्री. क्षेत्र वायगावच्या या विकासामुळे येथे येणाऱ्या हजारो भाविक भक्तांना अधिक सुविधा मिळतील व आधीच प्रख्यात असलेली हे तीर्थक्षेत्र अधिक भरभराटीस येईल असा सार्थ विश्वास या वेळी आमदार राजेश वानखडे यांनी व्यक्त केला आहे.

### कचरा माफिया आणि मनपा

शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजबारा झाला आहे. मनपात निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासकीय राजवटीत लोकप्रतिनिधींनी कचरा माफीयांना संरक्षण देण्यासाठी प्रभाग निहाय कंत्राट बंद करून झोननिहाय काढले. यामध्ये कंत्राटदारांना फायदा पोहोचविण्यासाठी फेरफार करण्यात आले. मनुष्यबळाची अट काढून टाकली. परिणामी शहरात स्वच्छता राखण्यात अपयश आले. त्यामुळे शहरात सर्वत्र घाण पसरली. लोकप्रतिनिधींना लाभ पोहोचवण्यासाठी हा कारनामा करण्यात आला. शहरातील स्वच्छता व्यवस्था कोलमडली. यासंदर्भात काँग्रेसने अनेक वेळा निवेदन दिले. पण प्रशासनाने याची दखल घेतली नाही. कचरा माफीयांना संरक्षण देण्यात आले. स्वच्छता व्यवस्थेची दुरावस्था झाली. या विरोधात आम्ही रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहोत असे यावेळी सांगण्यात आले. पत्रकार परिषदेमध्ये काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, किशोर बोरकर ,माजी नगरसेवक बाळू भुयार, मुन्ना राठोड, समीर जवंजाळ आदि उपस्थित होते.

### निवडणुकांसाठी शिवसेना

बैठकीबाबत पुढील सूचना देण्यात येतील. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख दिनांक १ नोव्हेंबर २०२५ राहील अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे,मनोज कडू ,नरेंद्र पडोळे यांनी दिली.

### निवृत्त अधिकाऱ्याच्या बॅगेतून

त्यांनी बसमध्ये बॅगेत सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असलेला बॉक्स ठेवला होता. साईनगर येथे पोहोचल्यानंतर त्यांनी बॅग उघडली असता बॉक्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये सुमारे २५ तोळे सोने (७.५० लाख किमतीचे), २२ हजार रोख रक्कम, तसेच चांदीचे भांडे व पायगाठी (८ हजार किमतीचे) असा एकूण ७.८० लाखांचा माल आहे. या प्रकरणी हरिदास सावके यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी बसमधील प्रवाशांची चौकशी आणि सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास प्रारंभ केला आहे.

### दिवाळीच्या सणात रेशन

नागरिकासह गोरगरिबांना पडला. दिवाळीला गोडधोड केले जाते. त्यासाठी गहू आणि चांगला तांदूळ लागतो मात्र रेशनवर राशन दुकानात एक किलो ज्वारी आणि चार किलो तांदूळ दिले जात आहे. मात्र ज्वारीचे वाटप करण्यात येत असल्यामुळे पुरणाच्या पोळीऐवजी ज्वारीच्या भाकरीवर यंदा दिवाळी साजरी करण्याची वेळ सर्वासामान्य नागरिकांवर आली असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### वरली मटका खेळणारे दोन

आणि आबिद खान इब्राहिम खान (वय २५, रा. चमन नगर, नवी वस्ती, बडनेरा) हे मटका खेळताना आढळले. दरम्यान, अब्दुल सत्तार अब्दुल खलील (रा. इस्लामी चौक, बडनेरा) हा पोलिसांच्या कारवाईपूर्वीच पसार झाला. या कारवाईत पोलिसांनी वरली मटक्याच्या चिठ्ठ्या आणि १,५६० इतकी रोकड जप्त केली आहे. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहिता कलम ४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बडनेरा पोलिसांकडून सुरू आहे.

### दोन कोटींचे सोने चोरी प्रकरणः

भरलेली बॅग आपल्याजवळ ठेवून झोपले होते. त्यावेळी आरोपी राधे गज्जू बिसोने याने संधी मिळताच प्रदीप कुमार यांच्या जवळील ५६ लाखाचे दागिने भरलेली बॅग चोरी केली. प्रदीप कुमार यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ जीआरपी पोलिसांना याची माहिती दिली. नाशिक रोड पोलिसांनी या प्रकरणात तात्काळ कार्यवाही करून आरोपीला अटक केली. त्याच्या कडून चोरी गेलेला मुद्देमाल हस्तगत केला. पोलीस कर्मचारी स्वाती भोर प्रभारी अधिकारी सचिन बनकर, संतोष उफाडे, शैलेंद्र पाटील, राज बच्छाव, नवीन प्रतापसिंह, अंबिका यादव, मच्छिंद्र लांडगे, गौतम बिऱ्हाडे, सुनील गडाख, सागर वर्मा, मनीष कुमार, केके यादव यांनी कारवाई केली.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव येथील सराफा व्यापारी किशोर वर्मा हे रविवारी (दि. १२) अमरावतीत व्यवहारासाठी आले होते. दिवसभर व्यवहार आटोपल्यानंतर ते संध्याकाळी साडेसहा वाजता हावडा–मुंबई मेलच्या जनरल डब्यातून जळगावकडे परतत होते. त्यांनी २ किलो ८९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (किंमत अंदाजे २.११ कोटी) भरलेली निळ्या रंगाची बॅग सीटवर ठेवली होती. थोड्याच वेळासाठी वॉशबेसिनकडे गेले असता, चोरट्यांनी संधी साधून ती बॅग उचलून नेली. व्यापाऱ्याने लक्षात येताच तत्काळ बडनेरा जीआरपी पोलिसांना माहिती दिली. ठाणेदार उमेश मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने चौकशी सुरू करण्यात आली. रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता चार संशयित व्यक्ती वारंवार त्या परिसरात फिरताना दिसल्या. पोलिसांच्या मते, ही पूर्वनियोजित चोरी असण्याची शक्यता असून आरोपींनी व्यापाऱ्याच्या हालचालीवर लक्ष ठेवूनच योग्य क्षणी चोरी केली असावी. दरम्यान, संशयितांचा शोध घेण्यासाठी जीआरपीची तीन स्वतंत्र पथके नागपूर, ठाणे आणि इतर दिशांना रवाना करण्यात आली आहेत.

### रसलपुरमध्ये पोलीस पाटलाला

पोलीस पाटील रवींद्र बोंडे यांच्याकडे केली. पोलीस पाटील बोंडे हे उमेश केने याला समजावण्यासाठी गेले असता आरोपीने त्यांच्या सोबत शिवीगाळ केली. त्यांची कॉलर पकडून थापड मारली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. शासकीय कामांमध्ये अडथळा निर्माण केला. पोलीस पाटील रवींद्र बोंडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी उमेश केने विरुद्ध कलम १३२,१२१(१),३५१(२) व? ३५२ अन्वय गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करत आहे.

### वाहन चोरी प्रकरणातील आरोपा

तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असताना त्यांना संशयित व चोरीस गेलेले वाहन मिळून आले. त्यानुसार पोलिसांनी विजेंद्र हिरासिंग सोळंके (वय २४, रा. शिराळा) यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडून चोरीस गेलेली गाडी जप्त करण्यात आली आहे. गुन्हे शाखेने आरोपी व जप्त वाहन फ्रेझरपुरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देऊन पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे शहरातील दुचाकी चोरीच्या घटनांवर अंकुश बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### १२ वर्षीय मुलावर ५६

केला. घाबरलेल्या मुलाने कसाबसा घटनास्थळावरून पळ काढून घरी येऊन आईला संपूर्ण प्रकार सांगितला. कुटुंबीयांनी तात्काळ दत्तापूर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सोनाली राठोड व पथकाने तत्परतेने कारवाई करून आरोपी सतीशला अटक केली. त्याच्यावर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### शासकीय अभियांत्रिकीमध्ये

विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. महाविद्यालयामध्ये कॅरी ऑन लागू करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थी शांततापूर्ण आंदोलन करत आहे ,पण त्यांच्या मागणी कडे लक्ष दिले जात नाही आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आता रोष निर्माण झालेला आहे. महाविद्यालयामध्ये सात ते आठ ब्रांचेस मध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहे पण त्यांचे सब्जेक्ट बॅक राहिल्यामुळे त्यांना नवीन सत्रात प्रवेश नाही मिळत.यामुळे कॅरी ऑन लागू करून विद्यार्थ्यांना सुविधा देण्याची मागणी आंदोलनात करण्यात येत आहे. आंदोलन करणाऱ्यांमध्ये ईश्वरी बारब्दे, दिशा देशपांडे ,जानवी पावडे, गायत्री देशमुख, श्वेता जाधव, संस्कृती तिडके, रोहन कुटे, चिन्मय बोंडे, शिवानी कदम, ओम कात्रे सह इतर विद्यार्थ्यांचा सहभाग होता.


## जाहीर सुचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे **१) राजेश जगन्नाथराव काळे, २) नितीन दादाराव तायडे, ३) लक्ष्मीनारायण सुभाष यादव, ४) राजुभाऊ माधवराव लुंगे**, सर्व रा.अमरावती यांनी **राम बाबुरावजी हिंगणकर**, रा.मुर्तिजापूर, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्त (शेतजमीन) विकत घेण्याचा करार केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन** - नोंदणी पोट तुकडी अकोला ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अकोलाचे हद्दीतील ग्रामपंचायत असलेले मौजे - वडगांव, ता.जि.अकोला येथील,

| | |
|---|---|
| १) शेत सर्व्हे नं.१०७ क्षेत्रफळ २ हे.०० आर | ८) शेत सर्व्हे नं.११८ क्षेत्रफळ १ हे.९५ आर |
| २) शेत सर्व्हे नं.१०८ क्षेत्रफळ २ हे.०० आर | ९) शेत सर्व्हे नं.११९ क्षेत्रफळ १ हे.६० आर |
| ३) शेत सर्व्हे नं.१०९ क्षेत्रफळ १ हे.८२ आर | १०) शेत सर्व्हे नं.१२० क्षेत्रफळ २ हे.०० आर |
| ४) शेत सर्व्हे नं.११० क्षेत्रफळ १ हे.८२ आर | ११) शेत सर्व्हे नं.१२१ क्षेत्रफळ २ हे.०० आर |
| ५) शेत सर्व्हे नं.११३ क्षेत्रफळ १ हे.८२ आर | १२) शेत सर्व्हे नं.१२२ क्षेत्रफळ १ हे.०७ आर |
| ६) शेत सर्व्हे नं.११४ क्षेत्रफळ १ हे.८१ आर | १३) शेत सर्व्हे नं.१२३ क्षेत्रफळ ० हे.९३ आर |
| ७) शेत सर्व्हे नं.११७ क्षेत्रफळ १ हे.७७ आर | |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा करार माझे पक्षकार यांनी केलेला आहे व लवकरच सदर मालमत्तेची खरेदी करुन घेणार आहेत.

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझीशन, कूळ वहीवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅंक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सूचना प्रेषित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

**अमरावती**
**दिनांक १४.१०.२०२५**

**स्वाक्षरी/-**
**(अॅड.राजेश एन.पट्टलवार)**
**प्रभात कॉलनी, शिलांगण रोड, अमरावती**
**मो.नं.९९७०४४७७०७**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी 'मिशन मोड'वर काम करावे – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

### नोडल अधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय आढावा बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत आणि वेळेवर पार पडावी, यासाठी सर्व विभागांनी 'मिशन मोड'वर काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.**



जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या आरक्षणाचा प्रारूप प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणूक तयारीच्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांची आज दि.१४ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी कुंभेजकर दूरदृष्यप्रणालीव्दारे बोलत होते.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव,मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ . योगेश क्षीरसागर, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे, शिक्षणाधिकारी (प्रा.) संजय ससाणे, प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड आदी यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी पुढे सांगितले की, निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यात शासकीय नियमांचे काटेकोर पालन करून जबाबदारीने काम करावे. सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी वेळेत व समन्वयाने काम करून प्रक्रिया निर्दोष पार पाडावी.

जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी निवडणुकीसंदर्भातील सर्व प्रशासकीय तयारी, आरक्षण प्रक्रिया, मतदान केंद्रांची यादी, मतदार नोंदणी, कर्मचारी प्रशिक्षण आदी बाबींवर देखरेख ठेवण्याचे निर्देश दिले.

त्यांनी पुढे म्हटले की, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, वेळेवर आणि शिस्तबद्ध पद्धतीने पूर्ण व्हावी, यासाठी सर्व यंत्रणांनी मिशन मोडमध्ये कार्यरत राहावे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचे कामकाज पारदर्शक, काटेकोर व सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसाठी कर्तव्यदक्ष आणि निःपक्ष अधिकारी नियुक्त करण्याच्या सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या माध्यमातून हाताळल्या जाणाऱ्या कामकाजासाठी नोडल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्याकरिता आवश्यक अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले आहेत. जिल्हा व्यवस्थापनासाठी विविध विषयवार नोडल अधिकारी नेमले असून, त्यांना सहाय्यक म्हणून संबंधित अधिकारी–कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. निवडणूक कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी ही यंत्रणा 'मिशन मोड' मध्ये कार्यरत राहील, असेही जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी नमूद केले आहे.

## मालेगाव पंचायत समिती आरक्षण सोडत

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



तालुक्यातील पंचायत समिती आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे मालेगाव तालुक्यातील पंचायत समिती सदस्यांसाठी मोठे फेर बदल आहे. त्यामुळे आता पंचायत समिती सदस्य निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी ईछुक असलेल्या अमेदवारांची काही ठिकाणी धावपळ झाली आहे. त्यामुळे काही महिण्यात पंचायत समिती साठी होणाऱ्या निवडणूक मध्ये कमालीची चुरस पाहायला मिळणार आहे. या मध्ये मालेगाव तालुक्यातील पंचायत समिती आरक्षण पुढील प्रमाणे निघाले आहे.

राजुरा राव - सर्वसाधारण,
किन्ही राजा - सर्वसाधारण,
मुंगळा - सर्वसाधारण,
खंडाळा शिंदे - सर्वसाधारण, शिरपूर - २ सर्वसाधारण महिला, जऊळका रेल्वे - सर्व साधारण महिला, जोड गव्हाण - सर्वसाधारण महिला. तर शिरपूर - नामाप्र, तिवळी - नामाप्र, डोंगर किन्ही - नामाप्र (स्त्री), करंजी - नामाप्र (स्त्री) तर मारसुळ - एस टी, कवरदरी - एस टि ( स्त्री ), मेडशी एस टी ( स्त्री ), तर ब्राह्मणवाडा - एस सी, बोरगाव - एस सी, चांडस एस सी ( स्त्री ), पांगरी नवघरे - एस सी ( स्त्री ) अशा प्रकारे मालेगाव पंचायत समिती आरक्षण निघाले आहे.

## शेलुबाजार येथे हज़रत बुरहान शाह वली यांचा संदल उत्साहत



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेलुबाजार येथे दरवर्शी प्रमाणे या वर्षी सुध्धा हज़रत बुरहान शाह वली चा संदल मोठ्या उत्साहने निघाला शेलूबाजार येथे सेकडो वर्षा पासुन बुरहान शाह वली यांचा दर्गा आहे तेथे हिंदू मुस्लिम समाजाची लोक मोठ्या भक्ति ने दर्शन करतात ही दरगाह आहिल्याबाई नगर धनगरपुरा जवल आहे. शाही संदल हे चार ठिकान मधून निघते, रफिक खान यांचे घरुन, शादीखाना ज्ञानदेव गुप्ता दुकान जावलून के.जी.एन.ग्रुप , शाह बॉयिज ग्रुप गुप्ता चौक गफ्फार भाई यांचे चक्की जावलुन मन्नान शाह व शाहरुख मेंबर व प्लाट वासी ग्रुप जुना प्लाट येथुन मार्केट रोड़, आरामिशीन चौक , मारवाड़ी गल्ली, राम मंदिर मार्गे, गुप्ता चौक ,महोमदिया मस्जिद बाजार रोड़,,बस स्टैड चौक , मालेगांवरोड़, आरॉमशिन चौक, राममंदिर, अहिल्या देवीनगर धनगर पुरा वरुण रात्रि १० वाजता बुरहनशाह वली दरगाह वर, बैंजो नाचनारे घोड़े ,घोड़े चादर घेवून पिकप वर चादर ,, सर्व भविकानी आपल्या आपल्या चादर बुरहनशा वाली च्या मजरिवार चढ़वली.

## मोटरसायकलवर अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणारा गजाआड!

### आरोपीकडून १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

सोमवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी माना पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ग्राम जितापूर–खेडकर रस्त्यावर सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान मोटरसायकलवरून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करत असलेला आरोपी उमेश सुरेश गोंडाणे (वय ३५, रा. माना, ता. मुर्तीजापूर) पोलिसांच्या तावडीत सापडला.

पोलिसांनी आरोपीकडून २०० नग देशी दारू 'बॉबी संत्रा' (९० मि.ली.), एक व्हिवो कंपनीचा मोबाईल, तसेच मोटरसायकल असा एकूण १ लाख ६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या प्रकरणी आरोपीविरुद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा नोंदवून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चीत चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गणेश नावकार, पोलीस उपनिरीक्षक गणेश महाजन, पोलीस हवालदार उमेश हरमकर व पोलीस शिपाई प्रमोद हिवराळे यांनी केली.

## आमदार सई डहाके यांच्या प्रयत्नांना यश

### ५ कोटींच्या विकासकामांना मंजुरी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील विविध सामाजिक सुविधा आणि लोकांच्या गरजा लक्षात घेता आमदार सईताई डहाके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश लाभले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत एकूण ५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

शहरात सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सभागृहांच्या तसेच अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांच्या विकासासाठी आमदार डहाके यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्राद्वारे विनंती केली होती. या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत



खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला आहे त्यामध्ये

**नाट्यगृह बांधकामासाठी:** २ कोटी

**स्मशानभूमीच्या विकासासाठी:** १ कोटी

**धोबी समाज सभागृहासाठी :** ३० लाख

**माळी समाज सभागृहासाठी :** ३० लाख

**नामदेव महाराज मंदिराजवळील सभागृहासाठी:** ३० लाख

**कामाक्षा देवी संस्थान सभागृहासाठी:** ३० लाख

**आसरा माता मंदिर, बारदारीपुरा :** २० लाख

**रेणुका माता संस्थान, भारतीपुरा :** ३० लाख

**नाभिक समाज सभागृहासाठी:** २० लाख

**हनुमान मंदिर संस्थान, यशोदानगर भाग १:** १० लाख

या सर्व कामांना वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत मान्यता देण्यात आली असून लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात होणार आहे. आमदार सई डहाके यांनी आपल्या मतदारसंघात विकासकामांचा वेग वाढवला असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. त्यांच्या या प्रयत्नाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## हरविलेले ३ हजार ६०० रुपये परत करून गजानन पायघन यांनी दिले माणुसकीचे दर्शन!



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव येथील गजानन पायघन यांनी रस्त्यावर सापडलेले ३ हजार ६०० रुपये परत करून प्रामाणिकपणा आणि माणुसकीचे सुंदर उदाहरण घालून दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सावरगाव येथील रामेश्वर लाड हे सकाळच्या सुमारास कामानिमित्त घाईत जात असताना त्यांच्या खिशातून ३ हजार ६०० रुपये पडले. हे पैसे गजानन पायघन यांना रस्त्यावर सापडले. त्यांनी कोणताही विलंब न लावता चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांना याबाबत माहिती दिली. पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली विविध व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे 'हरविलेले पैसे मिळाले आहेत' असा संदेश प्रसारित करण्यात आला. थोड्याच वेळात रामेश्वर लाड यांनी संपर्क साधला आणि त्यांनी हरविलेल्या रकमेचा आकडा बरोबर सांगितल्याने हे पैसे त्यांचेच असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर ठाणेदार रवींद्र लांडे यांच्या उपस्थितीत गजानन पायघन यांनी पैसे परत केले. विशेष म्हणजे, यापूर्वीही त्यांनी सापडलेले पैसे त्यांच्या मालकांना परत केले होते. त्यामुळे पोलिसांनी तसेच ग्रामस्थांनी त्यांच्या या प्रामाणिकपणाचे मनःपूर्वक कौतुक केले आहे. स्वार्थी जगात गजानन पायघन यांनी दाखवलेली ही माणुसकी सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. पैसे परत केल्यानंतर लाड यांनी त्यांना बक्षीस देण्याचा प्रयत्न केला, मात्र गजानन पायघन यांनी तेही नाकारले. त्यांच्या या प्रामाणिक कृतीमुळे संपूर्ण परिसरात त्यांचे नाव आदराने घेतले जात आहे.

## आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियान

**कारंजा :** जे.सी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे जिल्हाधिकारी कार्यालय व टि.डी.आर.एफ. च्या वतीने टि.डी.आर.एफ. संचालक मा. हरिश्चंद्र बद्रीनाथ राठोड यांच्या मार्गदर्शनात टि.डी.आर.एफ. जनसंपर्क अधिकारी तथा प्रशिक्षण अधिकारी अभिषेक राजहंस यांचेकडून विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियान व टि.डी.आर.एफ. सदस्य नोंदणी अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती मध्ये आपला व इतरांचा जीव कसा वाचवायचा तसेच आपत्तीला जाण्यास कसे तयार राहायचे, आपत्कालीन परिस्थितीत काय करावे.

## माजी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समस्यांचा निपटारा करणार-एसपी अनुज तारे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

माजी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या योग्य त्या मागण्यां तसेच समस्यांचा निपटारा करण्यासाठी आपण कटीबध्द राहु -अशी ग्वाही जिल्हा पोलिस अधिक्षक अनुज तारे यांनी वाशिम येथे बोलतांना दिली. सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी कल्याणकारी असोसिएशनच्या वतीने आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते.




यावेळी पुढे बोलतांना पोलिस अधिक्षक अनुज तारे म्हणाले की, पोलिस सेवेमध्ये असतांना पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. या काळात त्यांना आपले कूटुंबिय तसेच आरोग्याकडे देखील लक्ष देता आले नाही.ही वस्तुस्थिती आहे. सेवानिवृत्तीनंतर पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना अत्यंत चांगले जीवन जगता यावे यासाठी पोलिस विभागाकडे सेवानिवृत कर्मचाऱ्यांची जी काही कामे असतील ती निश्चितच कायदेशीर मार्गाने त्वरीत करण्यात येतील असे सांगुन अनुज तारे यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पोलिस घटकांच्या मालकीच्या खुल्या जागेवर संबंधीतासांठी दोन रूमचे कार्यालय बांधण्याबाबत तसेच कल्याणकारी योजना राबविण्या करीता मा.डिजी यांनी दिलेल्या लेखी परीपत्रका प्रमाणे योग्य ती कारवाई केल्या जाईल मात्र यासाठी निधी उपलब्ध करण्यास सेवा निवृत्त पोलिस अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे असे देखील त्यांनी सांगितले.

जिल्हा पोलिस अधिक्षक अनुज तारे यांचा वाशिम जिल्हा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी कल्याणकारी असोसिएशनच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रल्हाद काटकर यांनी शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. या कार्यक्रमास जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे , सेवानिवृत्त उप विभागीय अधिकारी पंडीतराव सरनाईक यांची उपस्थिती होती.

## पटसंख्येच्या आधारावर शाळा बंद करण्याची कार्यवाही तात्काळ थांबवा !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**पटसंख्येच्या आधारावर जिल्ह्यातील ४५ शाळा कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक अमरावती यांनी काढले आहेत. या आदेशामुळे जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. तथापि, बेकायदेशीर नियम लावून पटसंख्येच्या आधारावर शाळा बंद करण्याचा आदेश तात्काळ मागे घ्यावा. अन्यथा, तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिक्षण बचाव समन्वय समितीने निवेदनाद्वारे दिला आहे. याबाबत दि. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शिक्षण उपसंचालक अमरावती यांना निवेदन पाठविले आहे.**



■ वाशिम जिल्ह्यातील ४५ शाळा बंद करण्याचा फतवा
■ ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र
■ शिक्षण बचाव समन्वय समितीचा आंदोलनाचा ईशारा

निवेदनानुसार, शिक्षण उपसंचालक अमरावती यांनी दि. ७ ऑक्टोबर रोजीच्या शिक्षण आयुक्त पुणे यांच्या आभासी सभेतील निर्देशानुसार दि. ८ ऑक्टोबर रोजी पत्र काढून अमरावती विभागातील अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ व बुलढाणा या जिल्ह्यातील शून्य पटाच्या तसेच १ ते ५ पटसंख्या असणाऱ्या शाळा तात्काळ बंद करण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच एकाच कॅम्पस मधील शाळा बंद करून एकाच शाळेत रूपांतरित कराव्यात. बंद झालेल्या शाळांच्या विद्यार्थ्यांचे इतर शाळेत समायोजन करावे. तसेच बंद केल्यानंतर त्या शाळेचा यु डायस नंबर बंद करावा. असे आदेशात नमूद केले आहे. शिक्षण उपसंचालकांच्या या आदेशामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

कुठलीही शाळा बंद करण्याचा अधिकार शिक्षण उपसंचालक अथवा कुठल्याही अधिकाऱ्यास व मंत्रिमंडळात नाही. शाळा बंद करण्याबाबतची शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये कुठलीही तरतूद नाही. याउलट शाळांचा दर्जा सुधारावा व शाळांची संख्या वाढवावी असे स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे शाळा बंदचा आदेश एखादा अधिकारी कसा काय काढू शकतो? असा सवाल शिक्षण बचाव समन्वय समितीने उपस्थित केला आहे. सदर आदेश राज्यघटना व शिक्षण हक्क कायदा २००९ चा भंग करणारे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार व सामाजिक न्याय डावलणारे असल्याचे निवेदनात नमूद आहे.

एकाच कॅम्पस मध्ये प्राथमिक, उच्च प्राथमिक, किंवा माध्यमिक च्या प्रत्येकी दोन शाळा भरतात असे एकही उदाहरण नसताना एकाच शाळेत कोणती शाळा समायोजित होणार? असा सवाल निवेदनातून करण्यात आला आहे. राज्यघटनेच्या कलम १४, १५, १६, १९, २१ आणि २२ अ नुसार तसेच शिक्षण हक्क कायद्याच्या सेक्शन १८ व १९ प्रमाणे शाळा बंद करणे वा तसा शब्द प्रयोग करणे बेकायदेशीर असल्याचा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

शून्य किंवा १ ते ५ पट असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय शिक्षण हक्क कायदा २००९ चा भंग करणारे व घटनाविरोधी आहे. कोणतीही शाळा बंद करता येत नाही, याउलट मान्यता नसलेल्या शेजार शाळेला निकष लावून मान्यता देण्याची प्रक्रिया पार पाडण्याचे बंधन कायद्याने घातले आहे. याची जाणीव शिक्षण उपसंचालकांना निवेदनातून करून देण्यात आली आहे.

या आदेशातून कोणत्याही स्तराला जाऊन राज्यघटना व कायद्याचा भंग करून तातडीने शाळा बंद करण्याचा हेतू प्रशासनाचा असल्याचे निदर्शनास आले आहे. सामाजिक न्यायाचा विचार बाजूला सारून असंवेदनशील शिक्षणहीत विरोधी भूमिका प्रशासनाची आहे. त्यामुळे याचा तीव्र निषेध करण्यात आला असून लवकरच हा आदेश मागे न घेतल्यास यापुढे रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या माध्यमातून संदर्भित आदेश ताबडतोब मागे घ्यावा, पटसंख्येच्या आधारावर कोणतीही शाळा बंद करू नये, क्लस्टर निर्मितीची प्रक्रिया ताबडतोब थांबवावी, शिक्षण हक्क कायद्याच्या निकषाप्रमाणे सर्व शाळांना भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू न करण्याचा निर्णय घ्यावा तसेच शिक्षणावर सकल उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च करावा आदी मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. निवेदनावर, शिक्षण बचाव समन्वय समितीचे गजानन धामणे, विजयराव शिंदे, इंजी. सिताराम वाशिमकर, दिलीप गवई, मिलिंद सुर्वे, रंजनाताई पारिसकर, गजानन देशमुख, राजकुमार पडघान, मंगेश भुताडे, राजू धोंगडे, दिपक खडसे, दिनेश पठाडे, अजय सोनुनकर, नारायण काळबांडे, राम धनगर, सुनील कांबळे, पप्पू घुगे, विष्णू राठोड, सुभाषराव बोरकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३१६ ■ बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# कोराडी जंगलातून गवसले एटीएम चोरीतील वाहन

## -समुद्रपूर प्रकरणाच्या तपासाला वेग

**समुद्रपूर जनमाध्यम :** येथील बँक ऑफ इंडिया शाखेतील एटीएम चोरी प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले असून, नागपूर जिल्ह्यातील कोराडी जंगल परिसरातून गुन्ह्यात वापरण्यात आलेले मालवाहू वाहन सापडले आहे. हे वाहन जप्त करून समुद्रपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी चार चमू राज्याबाहेर रवाना करण्यात आले आहेत.५ ऑक्टोबरच्या पहाटे लाखो रुपयांची रोकड घेऊन एटीएम पळवण्यात आले होते.

तपासा दरम्यान सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्ह्यात मालवाहू वाहनाचा वापर झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी हायवेवरील टोलनाके आणि ढाब्यांवरील चित्रफिती तपासून वाहन बुटीबोरीमार्गे नागपूरकडे गेल्याचा सुगावा लावला. त्यानंतर कोराडी जंगल परिसरात संशयास्पद स्थितीत एम. एच. ४९ डी. ०७११ क्रमांकाचे वाहन सापडले.हे वाहन नागपूरच्या इमामवाडा येथील देवकुमार काळसर्पे यांच्या नावावर असून, ते तिसऱ्या ऑक्टोबरला चोरीला गेले होते. प्राथमिक तपासात चोरट्यांनी नागपूर येथून वाहन चोरून चंद्रपूरमार्गे समुद्रपूर गाठत एटीएम चोरी केली आणि नंतर नागपूरच्या दिशेने पळ काढल्याचे समोर आले आहे.

# अमृतच्यावतीने दुर्गोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

## -गड, दुर्गची प्रतिकृती बनविणाऱ्यांना मिळणार मुख्यमंत्र्याच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र

**वर्धा जनमाध्यम :** दरवर्षी दिवाळी सणांमध्ये बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनवून छत्रपतीच्या कार्याचे स्मरण आणि अभिवादन करत असते. याच दुर्गच्या प्रतिकृती साकरण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृतने दिपावलीमध्ये दुर्गोत्सवाचे आयोजन केले आहे. या उत्सवात सहभागी होण्यासाठी बालक व नागरिकांनी १२ दुर्ग पैकी एका दुर्गची प्रतिकृती साकारुन संकेतस्थळावर अपलोड करावे, असे आवाहन अमृतच्यावतीने करण्यात आले आहे.

शिवछत्रपतींच्या पराक्रमांचे साक्षिदार असलेल्या १२ दुर्गांना युनेस्कोच्या जागतिक वारसा वास्तुंमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि महाराष्ट्राचा ऊर अभिमानाने भरुन आला. दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीमध्ये घरोघरी बालदोस्त आणि तरुण, जेष्ठ मंडळीसुध्दा दुर्गच्या प्रतिकृती साकारतात.



नागरिकांनी आपल्या अंगणात, बाल्कनी, हाऊसिंग सोसायटीच्या सार्वजनिक जागांमध्ये अगदी जमेल तिथे रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग) या १२ दुर्ग पैकी कोणतीही एक हुबेहुब प्रतिकृती बनवावी आणि त्यासोबत सेल्फी काढून https://www. durgotsav.com या संकेतस्थळावर पाठवावी. गडदुर्गचा आकार कमीत कमी दोन फुट असावा. सेल्फीमध्ये गडदुर्गचा जास्तीत जास्त भाग दिसेल असा असावा. दुर्गोत्सवात सहभागी झालेल्या सर्व चित्रांचे संकलन करुन उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र पाठविण्यात येणार आहे. याशिवाय अमृतने निर्माण केलेल्या अमृत विद्या या डिजिटल लर्निंग फ्लॅटफॉर्मवरील शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास व त्यातून आज घ्यावयाचे धडे या विषयावरील ९९९ रुपयांचे प्रशिक्षण मोफत उपलब्ध करुन दिले जाणार आहे. यामध्ये स्वराज्यरक्षक दुर्ग, शिवरायांच्या आयुष्यातील महत्वाच्या घटना, कवी भूषण यांची कवने, स्वराज्यासाठी लढलेल्या स्वराज्ययोद्यांच्या परिचयाची श्रृंखला या सर्व गोष्टींचा आस्वाद सहभागी होणाऱ्याला मिळेल.

### दुर्गोत्सव कार्यक्रमाचे अनावरण

दुर्गोत्सव कार्यक्रमाचे अनावरण शिवश्रृष्टी हिस्टोरिकल थीम पार्क पुणे येथे अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्याहस्ते पार पडले असून यावेळी अमृतचे विशेष कार्यकारी अधिकारी श्रीराम बेंडे, प्रवीण पांडे, सिद्धेश्वर वरणगावकर आणि राज्य व्यवस्थापक दिपक जोशी उपस्थित होते, असे अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी कळविले आहे.

# कर्जाच्या ओझ्यात शेतकऱ्याची आत्महत्या

**आष्टी जनमाध्यम :** नापिकी, वाढत्या कर्जाचा ताण आणि चंगळलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे एक शेतकरी जीवनयात्रा संपविल्याची दुर्दैवी घटना आष्टी तालुक्यातील लहान आर्वी येथे घडली. प्रवीण पंजाबराव राऊत (वय ४८) या अल्पभूधारक शेतकऱ्याने दि. १२ ऑक्टोबर रोजी रात्री राहत्या घरी विषप्राशन करून आत्महत्या केली.राऊत यांच्या नावावर केवळ दीड एकर शेती असून त्यांनी ऊसने पैसे



घेऊन सोयाबीन व तूर अशी पिके लावली होती. यावर्षी सतत पावसामुळे सोयाबीनचे पीक सडल्याने त्यांना मोठा फटका बसला. यामुळे बँकेचे थकीत कर्ज परतफेडीची चिंता वाढत गेली. त्याच काळात पायाला गँगरीनचा आजार, मजुरी न होणे, व रोजच्या खर्चाची टंचाई यामुळे ते मानसिकदृष्ट्या त्रस्त झाले होते.पत्नी घर सोडून गेल्याने प्रवीण हे आपल्या वृद्ध आईसोबत राहत होते. आत्महत्येच्या दिवशी त्यांनी आईला शेजारी पाठवून घरी विषप्राशन केले. काही वेळानंतर आई घरात गेली असता तोंडाला फेस आलेला दिसून आला. तातडीने ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना आष्टी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले; परंतु वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.या घटनेची नोंद आष्टी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# वर्ध्यात खादीच्या घरात सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांचा वार्षिक मेळावा रंगला

## -चरखा भवनात उत्साह, संवाद आणि संघटनशक्तीचा अनोखा संगम

**वर्धा जनमाध्यम :** स्वदेशीचा टिकाऊ वारसा जपणाऱ्या चरखा भवनाच्या ऐतिहासिक अंगणात रविवारी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब राजपत्रित सहाय्यक लेखा अधिकारी संघटनेचा वार्षिक मेळावा जल्लोषात पार पडला. नागपूरसह राज्यभरातून आलेल्या अधिकारी वर्गाच्या उपस्थितीने वातावरण उत्साहाने भरून गेले.नागपूर कार्यकारिणीने पुन्हा एकदा संघटन व नियोजनाचा आदर्श ठेवत सभेची जबाबदारी निभावली. वर्धा जिल्हा टीमच्या नीटनेटक्या कार्यक्रम नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि स्वादिष्ट नागपुरी जेवणाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.कार्यक्रमाची सुरुवात मनीषा हटवार यांच्या गोड स्वागतगीताने झाली. सूत्रसंचालनाची जबाबदारी विद्या चहारे यांनी प्रभावीपणे पार पाडली. आरती राठोड यांनी जॉब चार्टमध्ये नवीन कार्यपद्धतीचा समावेश या विषयावर १७ मुद्द्यांवर आधारित मुद्देसूद मांडणी करत कार्यसुधारणा ही काळाची गरज असल्याचे सांगितले. वेतनत्रुटी प्रकरणाविषयी निलेश बोंगीरवार यांनी इझऊ सादरीकरणातून सविस्तर माहिती दिली.नव्या सदस्यांचे स्वागत करण्यात आले. संघटनेच्या महिला कार्यवाहपदी श्रीमती स्वाती दारुणकर (चंद्रपूर) यांची सर्वानुमते निवड झाली. प्रमुख कार्यवाह योगेश दांदळे यांनी सभासदांच्या प्रश्नोत्तरांद्वारे थेट संवाद साधला. उपाध्यक्ष शिवाजी खराडे यांनी एकूण व्यवस्थापनाचे कौतुक केले.अध्यक्ष दीपक धनगर यांनी संवाद आणि एकतेच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हास्तरावर दरमहा बैठकांचे आयोजन करून ठोस उपाययोजना राबविण्याचा सल्ला दिला. राज्य ग्राहक मंचातील अधिकाऱ्यांच्या अडचणींवर शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले.सभेचा समारोप अमोल रामटेक यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

# हिंदी विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.उमेश कुमार सिंग यांचे निधन



**वर्धा जनमाध्यम :**महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या हिंदी साहित्य विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. उमेश कुमार सिंग (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते विद्यापीठातील निवासस्थानी राहत होते. मंगळवारी सकाळी त्यांचे पुत्र धीरेंद्र कुमार सिंग व सुनील सिंग, पत्नी उर्मिला सिंग व कुटुंबीय वर्धा येथे पोहोचले. त्यानंतर स्थानिक सेवाग्राम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मेनखात परिसरात बिबट्याचा वावर

# अंगणातून कुत्रा उचलून नेल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील मेनखात गावात बिबट्याचा वावर असल्याची नवी घटना घडली आहे.

गावातील रहिवासी नारायण बावणे यांच्या घरासमोरील अंगणातून बिबट्याने कुत्रा उचलून नेल्याची माहिती मिळाली.घटनेनंतर गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस पाटील प्रगती मंगरुडकर यांनी तातडीने वनविभागाशी संपर्क साधला. वनरक्षक शशिकांत शेंद्रे यांनी घटनास्थळी धाव घेत गावकऱ्यांच्या उपस्थितीत पाहणी केली. जागेवर कुत्र्याच्या ओढून नेल्याच्या खुणा व बिबट्याचे पावलांचे ठसे आढळून आले. प्राथमिक तपासात हा बिबटाच असल्याचे निष्पन्न झाले.गेल्या काही दिवसांपासून शेजारच्या कारडा गावात कुत्र्यांच्या आरडाओरड आणि जनावरांच्या चळवळीतील अस्वस्थता लक्षात येत होती. मात्र, मेनखात गावात प्रत्यक्ष बिबट्याचा प्रवेश होईल, अशी अपेक्षा नव्हती, असे ग्रामस्थ सांगतात.

वनविभागाकडून संध्याकाळनंतर घराबाहेर जाणे टाळावे, लहान मुले व पाळीव प्राणी घरात सुरक्षित ठेवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. बिबट्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले असून परिसरात सापळे व कॅमेरे बसविण्याचे काम सुरू असल्याचे वनरक्षकांनी सांगितले.या तपासणी दरम्यान प्रगती मंगरुडकर, रमेश विहीरकर, गजानन सुरजुसे, रेखा बावणे, विनोद सुरजुसे, रोहित सुरजुसे, ज्योती मंगरुडकर, रितिक महाकाळकर, प्रताप मंगरुडकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते. मेनखात आणि आसपासच्या भागात सध्या सावधगिरी व सतर्कतेचे वातावरण आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यपदाच्या आरक्षणाची अधिसूचना प्रसिध्द

## -आरक्षणावर हरकती व सूचना असल्यास १७ ऑक्टोंबर पर्यंत सादर येणार

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ करीता आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. प्रारुप आरक्षणावर नागरिकांना हरकती व सूचना असल्यास दि.१७ ऑक्टोंबर पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय किंवा संबंधित तहसिल कार्यालयात सादर करता येणार आहे.

जिल्हा परिषद सदस्य पदासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच पंचायत समिती सदस्य पदासाठी संबंधित तालुक्याच्या तहसिल कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात आली असून आरक्षणाबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित तहसिल कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आली आहे. या अधिसूचनेवर नागरिकांना हरकती व सूचना दाखल करावयाच्या असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित तहसिल कार्यालयात दि.१७ ऑक्टोंबर पर्यंत सादर कराव्या, असे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणूक प्रभारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे यांनी कळविले आहे.

# कष्टकऱ्यांच्या दिवाळीत उजेड पेरण्याचा अंबिका हिंगमिरे यांचा संकल्प

**वर्धा जनमाध्यम :** समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंदाचा प्रकाश पोहोचावा, हीच खरी दिवाळीची सजावट या भावनेतून अंबिका सोशल फाउंडेशन आणि वीरांगना ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्ष अंबिका हिंगमिरे यांनी एक वेगळा संकल्प हाती घेतला आहे. या दिवाळीत दहा हजार कष्टकरी कुटुंबांना रवा-साखरेची स्नेहभेट देऊन त्यांच्या घरातही गोडवा आणि आनंदाचा उजेड पेरण्याचे काम त्या करणार आहेत.



१६ ऑक्टोबरपासून या उपक्रमाची सुरुवात बोरगाव (मेघे) येथून होणार असून, १७ ऑक्टोबरला नागसेननगर, शांतीनगर, सिंदी मेघे, सावंगी मेघे, पिपरी मेघे, उमरी मेघे, मसाळा आणि इतर वस्त्यांमध्ये तसेच १८ ऑक्टोबरला वर्धा शहरातील विविध वस्त्यांमध्ये ही स्नेहभेट पोहोचवली जाणार आहे.'दिवाळीचा आनंद फक्त काहींचाच का ? प्रत्येक माताभगिनीच्या हातात, प्रत्येक घरात उजेड यावा, हेच माझं समाधान, असं हिंगमिरे म्हणाल्या. अंबिका सोशल फाऊंडेशनच्या सहकार्याने या सामाजिक दीपप्रज्वलनाचा हा प्रवास अनेकांना प्रेरणादायी ठरत आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय**
**महात्मा गांधी पुतळयाजवळ, सिव्हिल लाईन, वर्धा**

फोन नंबर ०७१५२-२४०७४८ — क्र. महसुल सहायक/गृह/कावि - ७८४/२०२५
ई-मेल- rowardha@gmail.com — दिनांक १४/१०/२०२५

**वाचाः** १. भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड १ ३. मा. जिल्हादंडाधिकारी, २. ३. मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे आदेश क्रमांक कक्ष-२ब/म. सहा/ गृह / कावि-७५०/२०२४, दिनांक २४/०५/२०२४

**जाहिरनामा**

अर्जदार गुलाबराव आनंदराव हागोणे रा मदणी ता. जि. वर्धा यांनी अर्जामध्ये बुलकी विठोबा हागोणे मृत्यु मदणी येथे झालेला बुलकी विठोबा हागोणे या नावाने मृत्युंची नोंद ग्रामपंचायत मदणी येथे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म् नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

अर्जदार यांच्या आजीचा मृत्यु दिनांक - ०४/०६/१९७५ रोजी मौजा-मदणी येथे झाला आहे असे अर्जदाराने अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी तालुका दंडाधिकारी, वर्धा उपरोक्त वाचा क्रमांक १ व २. नुसार व ३ मध्ये न्मुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनामा प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे आंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विवित मुदतीत आक्षेप/हरकतींचा पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**स्वा,**
**तहसिलदार वर्धा**

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार सुलोचना महादेवराव Sutasonakar हे मौझा बोरगाव मेघे मौजा क्रमांक १०० ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. ३९/१ ANG ओल्ड अँड नव १९१ मधील प्लॉट क्रमांक ९ क्षेत्रफळ १५३.३५ चौरस मीटर मालमत्ते चे मालक आहेत सादर प्लॉटची चतुरसीम -

पूर्वेस - प्लॉट क्रमांक ८ पश्चिमेस - ३० Ft. Wide Layout Road उत्तरेस - ३० Ft. Wide Layout Road दक्षिणेस - जेठवा ह्यांचे लेआऊट श्री.रवींद्र वासुदेवराव चावरे यांनी सादर प्लॉट माझ्या पक्षकाराला दिनांक ०३/१०/२०१६ दस्त क्रमांक अन्वय २३६१/२०१६ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे . माझ्या पक्षकाराकडून मूळ लिंक विक्री पत्र दिनांक ३०/०७/२००२ दस्त क्रमांक अन्वय ३६५०/२००२ आणि मूळ लिंक विक्री पत्र दिनांक ०९/११/१९९८ दस्त क्रमांक २२३५/१९९८ हरविले आहे. आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने The Tata Capital Housing Finance Ltd.येथे कर्जासाठी अर्ज केला आहे, सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.त्यानंतर कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर वर्धा मो.९९२२४२६१६८**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता जलविज्ञान प्रकल्प विभाग, नागपूर**
**ई-निविदा क्र.१२/२०२५-२६**

खालील दर्शविलेल्या कामांच्या सिलबंद निविदा **ब-१** टक्केवारी या नमुन्यात कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, वैनगंगानगर अजनी, नागपूर-३ (दुरध्वनी क्र. ०७१२-२९८०१४६) ई-मेल eehpdiv.nagpur@gmail.com हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, वैनगंगानगर अजनी, नागपूर यांचे कार्यालयातून अ.क्र.१ ते २ करीता दिनांक १७/१०/२०२५ ते २७/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरुन दिलेल्या निविदा दिनांक २८.१०.२०२५ रोजी १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील.

**सविस्तर निविदा सूचना**

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिने) | निविदा शुल्क ऑफलाईन पध्दतीने रुपये) (+) जीएसटी | बयाणा रक्कम (१ टक्का) | कंत्राटदाराचा वर्ग/वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | Hiring charges for vehicles for Godavari River Basin (Vidarbha Region) Under Hydrology Project Sub-Division, Wardh | 643200 | 10 Months | 1000/- G.S.T. Rs.180/- | 6500/- | वर्ग ८ करीता |
| | | **643200** | | | **6500/-** | |

**अटी व शर्ती-**

१. कंत्राटदाराचे पंजियन राजपत्रित अधिकाऱ्याच्या सहीने साक्षांकित (Attested) केलेली असावी. सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य श्रेणीतील स्थापत्य पंजीयन असणे आवश्यक आहे.
२. कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांनी राखून ठेवले आहेत.
३. सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), वैनगंगानगर अजनी, नागपूर यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत नोटीसबोर्डावर पहावयास मिळेल.
४. सदर निविदा सूचना https://Wrd.Maharashtra.gov.in यांचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
५. सदर निविदा कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, वैनगंगानगर अजनी, नागपूर हे निविदा प ध्दतीने निविदा वेळेनुसार उपस्थित कंत्राटदाराचे समक्ष उघडण्यात येईल.
६. कंत्राटदाराचे जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक
७. उपरोक्त कामाच्या किंमतीत जी.एस.टी. किंमत अंतर्भूत नाही. नियमानुसार जी.एस.टी.वसूल करण्यात येईल किंवा अदा करण्यात येईल.

**(जा.क्र. /निली/२०२५-२६, दिनांक / /२०२५)**
**कार्यालयाचा पत्ता-**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, नागपूर**
**अजनी, वैनगंगानगर, नागपूर-४४००३**

**(क्र. जिमाका-वर्धा/१३४/२०२५-२६)**

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग
वर्धा

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय**
**महात्मा गांधी पुतळयाजवळ, सिव्हिल लाईन, वर्धा**

फोन नंबर-०७१५२-२४०७४८ — ई-मेल- rowardha@gmail.com
क. महसूल सहायक/गृह/कावि-६६५/२०२५ — दिनांक - १३/१०/२०२५

**वाचाः** १. भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र २. जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड १ ३. मा. जिल्हादंडाधिकारी, ३. मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे आदेश क्रमांक कक्ष-२ब/म. सहा/गृह/कावि-७५०/२०२४, दिनांक २४/०५/२०२४

**जाहिरनामा**

अर्जदार, विनोद त्र्यंबकराव नागतोडे रा.नांदोरा ता.जि. वर्धा यांनी अर्जामध्ये विनोद त्र्यंबकराव नागतोडे यांचा जन्म मौजा नांदोरा येथे झालेला विनोद त्र्यंबकराव नागतोडे या नावाने जन्माची नोंद ग्रामपंचायत सेवाग्राम, वां येथे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

अर्जदार यांच्या जन्म दिनांक - ०१.०५.१९८२ रोजी मौजा-सेवाग्राम, ता.जि. वर्धा येथे झाला आहे असे अर्जदाराने अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी तालुका दंडाधिकारी, वर्धा उपरोक्त वाचा क्रमांक १ व २. नुसार व ३ मध्ये न्मुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसांचे आंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विवित मुदतीत आक्षेप/हरकतीचा पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**तहसिलदार तथा,**
**तालुका दंडाधिकारी, वर्धा**

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार नरेश सुरेश अराडे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा रीमडोह, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील ग्राम पंचायत च्या हद्दीतील शेत सर्वे कं. ४८/१ प्लॉट नं. १७ ज्याची एकूण आराजी १४७०.३५ चौ. फुट म्हणजेच १३६.६५ चौ. मी. इतकी असुन त्याची

**चतुःर्सिमा :-**
पुर्वेसः खाली प्लॉट
पश्चिमेसः ३०.०० फुट बिट्टुमेन रोड,
उत्तरेसः दामोदर निखोडे यांचे घर,
दक्षिणेसः ३०.०० फुट श रोड,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १०,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


## संक्षिप्त

### निवडणूक न लढवताही कार्यकर्ते झेडपी, पंचायत समितीचे सदस्य बनणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता पुढच्या काही दिवसांमध्ये जाहीर होणार आहेत. या निवडणुकांसाठी आरक्षण आणि इतर प्रक्रियांना सुरु वात झाली आहे. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मोठी मागणी केली आहे. जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोशल मीडियावरू न माहिती दिली आहेत. त्यात ते म्हणाले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत पाच आणि पंचायत समितीमध्ये दोन सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती करणारे पत्र आज मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मी दिले आहे. दरम्यान, आता बावनकुळे यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी असा निर्ण? घेतला तर काही राजकीय कार्यकर्त्यांना निवडणूक न लढवता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे.

### नक्षलग्रस्त दुर्गम भागात आता पोस्टाची ड्रोन डिलिव्हरी!

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-** महाराष्ट्राच्या नक्षलग्रस्त आणि दुर्गम अशा गडचिरोली भागात पोहचण्यासाठी पोस्ट खात्याला अनेक काळापासून अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे अशा नक्षली भागात पोस्ट खात्याच्या पत्रांची डिलीव्हरी



आता ड्रोनने करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यामुळे या भागातील जनतेचा मोठा फायदा होणार आहे. पोस्ट विभागाने भामरागड, वैरागड आणि सिरोंचा तालुक्यातील २७ दुरस्थ गावामध्ये ड्रोन डिलिव्हरी सेवा सुरु करण्याची तयारी पूर्ण केली आहे. घनदाट जंगले आणि चांगला रस्ता नसल्याने या आदिवासी भागात डाक आणि आवश्यक सामान पोहचवण्यासाठी दोन-दोन दिवस लागत होते. परंतू आता पोस्ट विभागाचे लक्ष्य डिलीव्हरी म्हणजे त्याच दिवशी सेवा प्रदान करण्याचे आहे. हा पायलट प्रोजेक्ट केवळ संचार क्रांतीच आणणार असे नव्हे तर दुर्गम क्षेत्रात जीवनाची गती आणि सरकारी सेवांची पोहच निर्णायक रु पाने बदलणार आहे. डिलिव्हरीचे लक्ष्य आता दुर्गम भागात त्याच दिवशी डिलिव्हरी करण्याचे आहे. या सेवेचे काम पाहणारे अधिकारी ललित बोरकर यांनी सांगितले की ड्रोन डिलीव्हरीने आता या गावापर्यंत मेडिकल किट, सरकारी दस्तावेज, वर्तमान पत्रे आणि अन्य आवश्यक वस्तू देखील पोहचवता येणार आहेत. यामुळे केवळ संचार व्यवस्था आमुलाग्र बदलेल असे नव्हे तर दुर्गम भागातील जीवनाचा वेग वाढणार आहे. आणि सरकारी योजना गावागावात पोहचवणे शक्य होणार आहे. या महत्वाकांक्षी योजनेला याच वर्षी मे महिन्यात हिरवा झेंडा दाखवला होता. त्यावेळी कर्जत ते माथेरान या दरम्यान एका ड्रोनद्वारे ९ किलो वजनाचे पार्सल केवळ २० मिनिटात यशस्वीपणे पोहचवले होते. रस्ते मार्गाने येथे पोहचण्यासाठी सुमारे दोन तास लागतात. या यशस्वी पायलट ट्रायलनंतर ऑगस्टमध्ये चंद्रपूर पोस्ट खात्याने गडचिरोलीत याची सुरु वात करण्याचा प्रस्ताव दिला. त्यानंतर २७ दुर्गम खेड्यांची निवड करण्यात आली. ही ड्रोन सेवा दुर्गम खेड्यापाड्यात राहणा-या लोकांचे जीवन सुविधाजनक बनवण्यास मदत करणार आहे.

### द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विकासासाठी स्वतंत्र योजना

#### पाच वर्षासाठी ५०० कोटींच्या निधीची तरतूद

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला अभिवादन म्हणून त्यांनी स्थापन केलेल्या केलेल्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीअंतर्गत विविध शैक्षणिक संस्था, वसतिगृहांच्या इमारतींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याकरिता स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या योजनेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या नउ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचे जतन आणि संवर्धन केले जाणार.भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी ८ जुलै, १९४५ रोजी द पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन केली. या संस्थेमार्फत १९४६ मध्ये मुंबईत सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, सिध्दार्थ नाईट हायस्कूल, १९५० मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद कला महाविद्यालय, मिलिंद विज्ञान महाविद्यालय, १९५५ मध्ये मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल आणि मिलिंद प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल, १९५६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद महाविद्यालय, १९५३ मध्ये मुंबईत सिध्दार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, १९५६ मध्ये सिध्दार्थ विधि महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, वडाळा सुरु करण्यात आले. याचबरोबर छत्रपती संभाजीनगर येथे अजिंठा बॉईज होस्टेल आणि प्रज्ञा मुलींचे वसतिगृह स्थापन करण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या स्थळांचा विकास करण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार नउ महाविद्यालये आणि दोन वसतिगृहे यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी पुढील पाच वर्षात, दरवर्षी १०० कोटी याप्रमाणे ५०० कोटी रु पयांच्या खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

### तळोजा एमआयडीसीतील भूखंड विभाजन प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करा

**मुंबई/प्रतिनिधी :** तळोजा एमआयडीसीतील भूखंड विभाजन प्रकरणाची चौकशी करू न १५ दिवसात अहवाल सादर करावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.विधानभवनात तळोजा एमआयडीसी येथील ए-३ भूखंड तक्रारीसंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी गृह विभागाचे कक्ष अधिकारी हेमंतकुमार मोहन, पोलीस निरीक्षक संजय पाटील, उद्योग विभागाचे अवर सचिव किरण जाधव, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी, महादेव इम्पेक्सचे प्रतिनिधी व तक्रारदार उपस्थित होते.तळोजा एमआयडीसी येथील ए-३ या भूखंडाबाबत महादेव इम्पॅक्ट्स् कंपनीने नियमांचे उल्लंघन करत अवैधरित्या भूखंडाचे विभाजन करू न इतर उद्योजकांना विक्री केल्याची तक्रार आहे. नियमानुसार उद्योग सुरू झाल्यानंतर व तो बंद पडल्यासच भूखंड विभाजनाची तरतूद आहे, मात्र संबंधित उद्योगाने कोणताही उद्योग सुरू न करता थेट भूखंड विभाजन करू न विक्री केली. या प्रकरणात एमआयडीसीमार्फत सखोल चौकशी करु न १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश अण्णा बनसोडे यांनी दिले. या चौकशी पथकामध्ये पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी आणि प्रांत अधिकारी, पनवेल यांचा समावेश केला जाणार आहे.

### इतर मागासवर्गीय महामंडळाच्या थेट कर्ज पोर्टलचे उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेच्या पोर्टलचे उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. महामंडळाच्या थेट कर्ज योजना पोर्टलमुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद होणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी यावेळी सांगितले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज आणि व्यवस्थापकीय संचालक रविंद्र पेटकर उपस्थित होते. मंत्री अतुल सावे म्हणाले, या महामंडळांतर्गत सध्या १४ उपकंपन्या कार्यरत असून, थेट कर्ज योजना ही महामंडळाची एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेची सुरु वात २८ जानेवारी २०१९ रोजी करण्यात आली असून आतापर्यंत ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत होती. शासनाच्या सेवा वितरणातील सुधारणा या उपक्रमांतर्गत आता ही योजना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्गातील पात्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असेही मंत्री अतुल सावे म्हणाले. या योजनेअंतर्गत इतर मागास प्रवर्गातील १८ ते ५५ वयोगटातील महाराष्ट्रातील रहिवासी व्यक्तींना एक लाख रु पयांपर्यंत थेट कर्जाचा लाभ दिला जातो. योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत ३,९२३ लाभार्थ्यांना २१.०७ कोटी रु पयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५ जाहीर

## ■ 50 हजार कोटींची गुंतवणूक, पाच लाखांवर रोजगार निर्मिती

## ■ 15 समर्पित बांबू क्लस्टर्स; नगदी पिकांसारखा पर्यावरणपूरक, शाश्वत ऊत्पन्न पर्याय

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक-यांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देणा-या महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५ ला आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यातून जागतिक स्तरावर आणि देशांतर्गत बांबू उत्पादनात महाराष्ट्राचे स्थान आणखी बळकट करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय बांबू मिशन आणि महाराष्ट्र मिशन २०२३ शी सुसंगत असे हे धोरण असेल. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत हे धोरण राबविले जाईल. या कालावधीत आणि त्यानंतर पुढील दहा वर्षात राज्यात ५० हजार कोटींची गुंतवणूक येणे अपेक्षित आहे. यातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या पाच लाखांहून अधिक जणांसाठी रोजगार निर्मिती होणार आहे.या धोरणात बांबू शेतकरी उत्पादक संघटना, कंत्राटी शेती आणि उर्जा, उद्योग आणि इतर घरगुती क्षेत्रांमध्ये बांबूच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी पायाभूत सुविधा म्हणून अँकर युनिट्स आणि सामायिक सुविधा केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. तसेच राज्यभरात १५ बांबू क्लस्टर्स स्थापन करण्यात येतील. याशिवाय दुर्गम भागातील बांबू कारागिरांसाठी सूक्ष्म सामायिक सुविधा केंद्रे सुरु करण्यात येतील. तसेच बांबूच्या संशोधन आणि विकासासाठी कृषी विद्यापीठांचे सहकार्य घेतले जाईल. यात शेतक-यांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी, त्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील. यासाठी आवश्यक तेथे आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सामंजस्य करार केले जातील.

बांबूशी निगडीत प्रक्रिया उद्योगांना व्याज अनुदान, वीज अनुदान तसेच मुद्रांक शुल्क व वीज शुल्क सवलती दिल्या जातील. याशिवाय बांबू क्षेत्रातील नवोन्मेषावर आधारित स्टार्टअप्स आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांसाठी व्हेंचर भांडवल निधी म्हणून ३०० कोटी रु पयांच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली.महाराष्ट्रात आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने बांबू विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे ४ हजार २७१ कोटी रु पयांचा प्राथमिक अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पाद्वारे शेतकरी उत्पादक कंपनीला दर्जेदार रोपांची निर्मिती, अनुदान व प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.बांबू उत्पादक, उद्योग व वितरक यांच्यात समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच बांबू आधारीत उद्योगांसाठी पीएलआय योजना तयार करून मागणी-पुरवठामधील दरी कमी



करून बाजारपेठेचा विकास करण्यात येणार आहे.औष्णिक उर्जा प्रकल्पांमध्ये ५ ते ७ टक्के बांबू बायोमासचा वापर केला जाणार आहे. जीआयस, एमआयस, ब्लाकचेन, ड्रोन, टिशू कल्चर लॅब्स इत्यादींच्या माध्यमातून बांबू मूल्य साखळीचा विकास करण्यासाठी नवीन तंत्र व संशोधनाला चालना दिली जाणार आहे. विशेषत? मनरेगातून व सार्वजनिक लागवडीच्या माध्यमातून मोकळ्या जमिनीवर बांबू लागवड करण्यात येणार आहे.महाराष्ट्र बांबू धोरण २०२५ ३० राबविण्यासाठी १ हजार ५३४ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी देण्यात आली. तर २० वर्षांच्या कालावधीसाठी ११ हजार ७९७ कोटी रु पयांच्या तरतुदीस तसेच चालू आर्थिक वर्षात धोरणाच्या अंमलबजावणीसाठी ५० कोटी रु पयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.जगात बांबूची बाजारपेठ २०३० पर्यंत ८८.४३ अब्ज अमेरिकन डालर्स इतकी होणार आहे. सध्या भारताची बांबू निर्यात २.३ टक्के इतकी आहे. भारतातील बांबू उद्योग २८ हजार कोटींचा आणि बांबूचे वन क्षेत्र ४ टक्के इतके आहे. देशाची दरवर्षीची बांबू उत्पादन क्षमता ३२ लाख ३ हजार टन इतकी आहे. महाराष्ट्रात बांबू लागवडीखालील क्षेत्र हे भारतातील तिस-या क्रमांकाचे म्हणजेच १.३५ दशलक्ष हेक्टर आहे. महाराष्ट्राचे २०२२ मधील बांबू उत्पादन ९ लाख ४७ हजार टन होते. सध्या अमरावती, सिंधुदुर्ग आणि भंडारा जिल्ह्यात उत्पादनाच्या दृष्टीने बांबू क्लस्टर्स आहेत. महाराष्ट्रात लागवडीयोग्य पडीक जमीन आणि पडीक जमीन लक्षात घेता, बांबू उत्पादनाची क्षमता दरवर्षी सुमारे १५७.१२ लाख टन होउ शकते.

### पात्र गावांना सामूहिक वनहक्क देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात १७ हजार गावे सामुदायिक वन हक्क मिळण्यासाठी पात्र असून आतापर्यंत ५ हजार गावांना सामुदायिक वन हक्क देण्यात आले आहेत. उर्वरित गावांना सामुदायिक वन हक्क देण्यासंदर्भात आदिवासी विकास व अन्य सर्व संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने कार्यवाही करावी. वंचित आदिवासी, गरीब समाजाला सर्व योजनांचे लाभ द्यावेत. अंशत? वन हक्काच्या पात्र दाव्यांवर तातडीने सुनावणी घेउन जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हाधिका-यांनी ते निकाली काढावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात वन हक्क कायदा २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात तसेच जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या विविध विषयासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री ड?.अशोक वुईके, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ?ड.माणिकराव कोकाटे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन



मंत्री मकरंद जाधव-पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, लोक संघर्ष समितीच्या प्रमुख

#### जंगल नसलेल्या, ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्येच्या गावांचाही 'पेसा'मध्ये समावेश करावा

प्रतिभाताई शिंदे, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख हे मंत्रालयातून तर नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, आदिवासी विकास आयुक्तलीना बनसोड, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मिताली सेठी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

### कोणत्याही स्टॅम्प कार्यालयात दस्तऐवज नोंदणी करता येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल विभागाने मुंबईकरांसाठी दिवाळीची खास सुविधा जाहीर केली आहे. आता मुंबईतील कोणत्याही स्टॅम्प कार्यालयात दस्तऐवज नोंदणी करता येणार आहे. राज्य सरकारने क्षेत्रीय मर्यादेची अट रद्द केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.मुंबई आणि उपनगरातील नागरिक, व्यावसायिक व कंपनी मालक आता आपल्या क्षेत्रावर मर्यादित न राहता मुंबईतील कोणत्याही सहा स्टॅम्प कार्यालयांत दस्तऐवज नोंदणी करू शकतील. ज्या भागातील रहिवासी किंवा व्यावसायिक आहेत, तेथीलच कार्यालयात नोंदणी करण्याची अट आता लागू नाही. कोणत्याही स्टॅम्प कार्यालयात आता कागदपत्रांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येईल.मुंबई शहर आणि उपनगरातील नागरिक आता बोरिवली, कुर्ला, अंधेरी, मुंबई शहर तसेच ओल्ड कस्टम हाउस जवळील प्रधान स्टॅम्प कार्यालयातील मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमलबजावणी १ व २) या सहा कार्यालयांत मालमत्ता करार, भाडे करार, वारसा हक्कपत्र आणि



इतर महत्त्वपूर्ण कागदपत्रांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात.सदर सुधारणा मुंबईकरांचा वेळ व धावपळ वाचवेल, तसेच निर्णय प्रक्रिया आणि कार्यालयीन कामकाज वेगवान होईल. यासंदर्भात शासनाकडून राजपत्र जारी करण्यात आले आहे.जागा मोजणीसाठी अर्ज मिळाल्यानंतर ३० दिवसांत मोजणी पूर्ण केली जाईल. राज्यात खासगी भूमापकांचा समावेश करण्यात येणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

### राज ठाकरेंच्या दीपोत्सवला उद्धव ठाकरे उद्घाटक; ठाकरे बंधूंची दिवाळीही एकत्र

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यात दिलजमाई झाल्याचं संपूर्ण राज्याने ५ जुलैला पाहिलं. दोघांनीही एकत्र येत जे बाळासाहेब ठाकरेंना जमलं नाही ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं आणि अनाजी पंतांनी आमच्यातला आंतरपाट दूर केला अशी विधानं केली. त्यानंतर ठाकरे बंधूंच्या म्हणजेच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या तीन महिन्यांत सहा भेटी पार पडल्या. आता ठाकरे बंधूंची दिवाळीही एकत्र पार पडणार आहे. याचं कारण मनसेच्या दीपोत्सवाला उद्धव ठाकरे हे उद्घाटक असणार आहेत.



मनसे अधिकृत या मनसेच्या अधिकृत पेजवर दीपोत्सव १७ ऑक्टोबर २०२५ संध्याकाळी ६.३० वाजता. असं म्हटलं गेलं आहे. तसंच या दीपोत्सवाचे उद्घाटक हे उद्धव ठाकरे असतील असं म्हटलं आहे. एवढंच नाही तर शिवसेना पक्षप्रमुख असाच उद्धव ठाकरेंचा उल्लेख करण्यात आला आहे. तसंच सगळ्यांनीच उपस्थित रहावे. दीपावलीच्या शुभेच्छा असा उल्लेखही मनसेने कार्डवर केला आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे निवडणूक आयुक्तांच्या भेटीला महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळासह गेले होते. निवडणूक आयुक्तांना जे निवेदन महाविकास आघाडीने दिलं त्यात राज ठाकरेंच्याच भाषेची छाप दिसून आली. आता प्रश्न आहे की राज ठाकरे हे मविआसह जाणार का? राज ठाकरे यांची उत्तर भारतीयांच्या आणि परप्रांतीयांच्या विरोधातली जी भूमिका आहे ती काँग्रेसला मान्य होईल का? हा मुख्य प्रश्न आहे. त्यामुळे राज ठाकरेंच्या मविआ सहभागाबाबतचा निर्णय अद्याप होणं बाकी आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या तीन महिन्यांत सहा भेटीगाठी

१) ५ जुलै २०२५ उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे मराठीच्या विजयी मेळाव्यात एकत्र आले. दोघांचीही भाषणं झाली.

### भारत-कोरिया मैत्री आणि संस्कृतीचा महोत्सव



**मुंबई/प्रतिनिधी :**कोरिया प्रजासत्ताकाचा वाणिज्य दूतावास आणि महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या साहाय्याने मुंबईतील जिओ वर्ल्ड ड्राइव्ह, वांद्रे कुर्ला संकुल येथे रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी के-हार्मनी फेस्टाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात मुंबईकरांना भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील वाढत्या सांस्कृतिक आणि पर्यटन संबंधांचा अनुभव घेता आला.महोत्सवात सोलस्ट्रीट या संकल्पनेत सोल शहरामधील प्रसिद्ध भागांची प्रतिकृती निर्माण करण्यात आली होती. यात म्यान्गडोंगचा बाजार, बुकचानमधील पारंपरिक हॅनोक घरे, हान नदीचा सुंदर किनारा, जाँगनो येथील खाद्य दालन आणि ग्याँगन्यूंगमधील एच्च बॅण्डचा प्रसिद्ध अल्बम यू नेव्हर वाक अलोनचा समावेश होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन क्षेत्राचा विस्तार होण्याच्या दृष्टीने या महोत्सवाला पर्यटन विभागाने सहाय्य केले होते. पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे म्हणाले, भारत आणि कोरिया यांच्यात प्राचीन बौद्ध धर्माशी संबंधित सांस्कृतिक आणि ऐतिहासिक नाते आहे. आगामी काळात भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील सांस्कृतिक, पर्यटन आणि व्यावसायिक सहकार्य अधिक दृढ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. दोन्ही देश एकत्र येउन बौद्ध सर्किटच्या पर्यटनाला प्रोत्साहन देतील. महाराष्ट्रातील अजिंठा-वेरू ळ, कार्ला-भाजा लेणी तसेच ग्लोबल विपश्यना पॅगोडा आणि कोरियातील जोसा, गिलसंगसा, बोंगयुन्सा ही मंदिरे एकत्र जोडली जातील. संगीत, नृत्य, खाद्यसंस्कृती, हस्तकलेच्या माध्यमातून सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवली जाईल. विद्यार्थ्यांसाठी व कलाकारांसाठी विनिमय कार्यक्रम सुरू करू न दोन्ही देशांच्या तरु णाईला आणि संस्थांना जोडले जाईल. कोरियन कंपन्यांना मुंबई व महाराष्ट्र येथे परिषद व प्रदर्शने आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. तसेच पर्यटन क्षेत्रातील डेटा शेअरिंगद्वारे दोन्ही देशांतील पर्यटकांच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.कोरियाच्या वाणिज्य दूतावासाचे डोंगवान यू म्हणाले, मुंबई आणि सोल दोन्ही शहरांची उर्जा एकसारखी आहे. के-हार्मनी फेस्टा सांस्कृतिक देवाण-घेवाण, पर्यटन आणि भविष्यातील मैत्रीचा सेतू उभारण्यास मदत करील. कोरियन सांस्कृतिक केंद्राचे संचालक ह्वांग योंग यांनी सांगितले, के-हार्मनी फेस्टा या महोत्सवाच्या माध्यमातून भारत आणि कोरिया यांच्यातील पर्यटन आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण मजबूत करण्यासाठी पुढाकार घेण्यात येत आहे.

### माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घरांत राहण्याचे स्वप्न दोन वर्षात पूर्ण होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** समूह विकासाच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले आहे. या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सुंदर व सर्व सुविधायुक्त असे घर मोफत देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होणार आहे. कुणालाही विकास आणि



घरापासून वंचित राहू देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घराचे स्वप्न केवळ कागदावर राहणार नाही तर दोन वर्षांत या परिसरात आधुनिक, सुसज्ज घरे उभी राहतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबई महानगर प्रदेशातील माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार संजय दिना पाटील, आमदार राम कदम, पराग शहा, मिहिर कोटेचा, माजी नगरसेवक परमेश्वर कदम आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

#### समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सर्व सोयी सुविधांयुक्त सुंदर घर मिळणार

पहिल्यांदाच शासकीय संस्थांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या ४५ वर्षांपासून विदारक परिस्थितीत राहणा-या रमाबाई आंबेडकर व कामराज नगरमधील नागरिकांच्या स्वप्नातील पुनर्विकास प्रकल्पाचा शुभारंभ झाला आहे. यासंदर्भात अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. विकासकांच्या गुंतागुंतीपासून दूर राहून, हे काम थेट शासकीय संस्थांकडून करायचा निर्णय शासनाने घेतला. एसआरए आणि एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प साकारला जात असून पहिल्यांदाच एमएमआरडीए व एसआरए यांना संयुक्तपणे या प्रकल्पासाठी जोडण्यात आले आहे. राज्य सरकारने दोन वर्षांचे आगाउ भाडे देउन येथील नागरिकांना तात्पुरत्या निवासाची सोय करू न दिली आहे. आता एमएमआरडीए आणि एसआरए यांनी दोन वर्षांतच हे बांधकाम पूर्ण करावे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समूह पुनर्विकासाची संकल्पना मांडली. त्यांची ही संकल्पना पुढे नेत मुंबईसाठी मोठ्या प्रमाणात समूह पुनर्विकास धोरणास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेद्वारे झोपडपट्ट्यांमध्ये राहणा-या लोकांना फक्त घरच नाही, तर खेळाचे मैदान, जिम, शाळा, आरोग्य केंद्र अशा सर्व सोयीसुविधा देउन पुनर्वसन केले जाईल. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचाराची खरी अंमलबजावणी होईल. नफा कमी झाला तरी चालेल परंतु समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून झोपडपट्टी विकास करणार आहोत. यासाठी ५० एकरांचे क्लस्टर शोधून ठेवले आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून मुंबई झोपडपट्टीमुक्तकरण्याचे काम आमचे सरकार करत आहे. झोपडपट्टीत राहणा-या बांधवांना सुंदर घराबरोबरच विविध सुविधा पुरविण्याचे काम राज्य शासन हाती घेतले आहे.

### तिस-या फेरीत वैद्यकीयच्या 2,650 जागा वाढल्या

**मुंबई :** वैद्यकीय अभ्यासक्रमाची तिसरी फेरी लांबणीवर पडल्याने विद्यार्थी चिंतीत आहेत. त्यातच आता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने देशात २ हजार ६५० नव्या जागा वाढविल्या आहेत. महाराष्ट्रत १५० नव्या जागांना मान्यता मिळाली आहे. या जागांचा तिस-या फेरीत समावेश करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची अधिक संधी उपलब्ध होणार आहे. रुग्णांच्या तुलनेत डाक्टरांची संख्या कमी आहे. केंद्र सरकारने देशातील ड?क्टरांची संख्या वाढविण्यासाठी नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि जागा वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग दरवर्षी वैद्यकीय महाविद्यालयांसह नवीन जागांना मान्यता देत आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाअंतर्गत असलेल्या वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) तिस-या फेरीचे वेळापत्रक लांबणीवर टाकल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. एमसीसीने वैद्यकीय महाविद्यालयांत देशात २ हजार ६५० जागा वाढविल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १५० जागांचा समावेश आहे. नव्याने मान्यता मिळालेल्या या जागांमुळे देशातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांची संख्या १ लाख २६ हजार ७२५ इतकी झाली आहे. हरियाणा, राजस्थान आणि तामिळनाडूमध्ये सर्वाधिक जागा वाढल्या आहेत. या तिन्ही राज्यांमध्ये प्रत्येकी ३०० जागांना मान्यता मिळाली आहे. त्या खालोखाल आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेशात प्रत्येकी ५० जागा वाढल्या आहेत. महाराष्ट्रात १५० जागांना मान्यता मिळाली आहे. यामध्ये नागपूरमधील दत्ता मेघे महाविद्यालयामध्ये १०० आणि सोलापूरमधील अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रु ग्णालयामध्ये ५० जागांना मान्यता मिळाली. या सर्व जागांचा समावेश तिस-या फेरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अधिक जागा उपलब्ध होणार असून, तिस-या फेरीमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयेगाने वैद्यकीय महाविद्यालयांतील जागा वाढविण्याबरोबरच ६ नवीन महाविद्यालयांना मान्यता दिली आहे. यामध्ये राजस्थानात २ महाविद्यालये तर तामिळनाडू, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशात प्रत्येकी १ महाविद्यालयाचा समावेश आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## वेध दिवाळीचे...

एव्हाना अवघ्या देशाला दिवाळीचे वेध लागले आहेत. वर्षभरातला सर्वात मोठा आनंदोत्सव आणि खरेदीयात्रा मानला जाणारा दिवाळीचा सण आता उंबरठ्यावर आला आहे. या निमित्ताने घरोघरी मोठी खरेदी होते, मात्र सर्वसामान्यांच्या आयुष्यात दिवाळी खरेदीचा खरा बहर येतो तो बोनसची रक्कम हाती पडल्यानंतर. हे अतिरिक्त धन, ही माया हाती पडली की खरेदीला खरे धुमारे फुटतात. अर्थात यंदा दिवाळीची दिवेलागण होण्यापूर्वीच आपण ओल्या दुष्काळाची काजळी पुसण्याचे काम करत आहोत. महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढल्यामुळे अनेक भागांमधले उभे पीक झोपले आहे. खरे पाहता दिवाळी हा पिके हाती येण्याचा काळ. मशागत केल्यानंतर शेतामध्ये डौलाने पिके डोलताना बघण्याचा हा काळ, मात्र अवकाळी तसेच अतिवृष्टीने यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्याला लागलेल्या धारांमध्ये खारेपणा वाढवण्याचेच काम केले. अर्थात सरकार आणि समाजाकडून मिळालेल्या आधाराच्या बळावर शेतकरी पुन्हा उभा राहील आणि प्रत्येकाच्या घरापुढे पणत्या त्याच तेजाने लागतील, अशी आशा आहे. अंधाराप्रमाणेच पणत्यांचा प्रकाश दुःखाचे सावटही दूर करेल आणि नव्या दमाने समाज कामाला लागेल यात शंका नाही. यापूर्वी सलग तीन वर्षे आपण कोरोनाशी निकराची झुंज घेतली. वर्षभर या ना त्या स्वरूपाच्या आक्रमणाचा, अमेरिकेच्या मनमानी करवाढीचा, युद्धजन्य परिस्थितीचा सामना करतच आहोत. त्याचा परिणाम म्हणून बाजारातील हेलकावे सहन करत आहोत. मात्र संकटातून संधी शोधणारा भारतीय समाज आणि मराठी माणूस या स्थितीतही खंबीरपणे उभा आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आपण त्याचा हाच निर्धार पाहू शकतो. शेवटी दिवाळी हे काही एका सणाचे नाव नाही, तर तो आनंदाच्या वाटेने प्रकाशाकडे नेणारा एक प्रदीर्घ प्रवास आहे. ही आपली हसरी, साजिरी परंपरा आहे. म्हणूनच दिवाळीत आनंद अर्थव्यवस्थेलाही एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या टप्प्यावर घेऊन जातो. यंदाही बाजारपेठेत दिसणारा उत्साह, खरेदीचा ओघ आणि ग्राहकांच्या बदललेल्या सवयी यामुळे दिवाळीची तयारी, लगबग हेच दाखवून देणारी दिसते आहे. ती पारंपरिक स्वरूपातून काहीशा आधुनिक ग्राहकांच्या आवडीनुसार रंगलेली बघायला मिळते आहे. इथे लक्षात घ्यायला हवे, की शहरे आणि ग्रामीण भागातील खरेदीचा वेग, उत्पादनांची मागणी आणि नव्या ट्रेंड्समध्ये स्पष्ट फरक जाणवतो. पहिली बाब म्हणजे सोन्या-चांदीच्या बाजारात यंदाही विशेष उत्साह दिसतो आहे. खरे पाहता सोन्याची कमत गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आकडेवारीच्या भाषेत बोलायचे तर ही तब्बल ३०-४० टक्क?यांची वाढ आहे. सोन्याची किंमत प्रति दहा ग्रॅम सव्वा लाख आणि चांदीची किंमत प्रति किलो दीड लाखाच्या घरात आहे. तरीही, ग्राहकांनी या मौल्यवान धातूंच्या दागिन्यांच्या खरेदीकडे पाठ फिरवलेली नाही. दिवाळी आणि त्यामागोमाग सुरू होणारी लग्नसराई बघता हलक्या वजनाचे आणि १८ कॅरेट सोन्याचे दागिने आता अधिक पसंत केले जात आहेत. चांदीच्या वस्तूंमध्ये नाणी, पूजेचे छोटे संच तसेच आकर्षक भेटवस्तूंची मागणीही वाढते आहे. जीएसटी कपातीमुळे सोने-चांदीच्या बाजारातील कमती थोड्या प्रमाणात स्थिर राहिल्यास मागणीत आणखी वाढ होऊ शकते. केवळ सोने-चांदीच्या बाजारातच नव्हे, तर ऐन दिवाळीच्या तोंडावर जीएसटी दरातील कपातीमुळे यंदाची दिवाळी ग्राहकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. किमती काही अंशी कमी झाल्यामुळे कपड्यांच्या विक्रीत दहा टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवली जात असून, वस्त्र उद्योगाचा व्यापार दिवाळीपूर्वी वृद्धिंगत झाला आहे. २,५०० पर्यंतच्या कपड्यांवर जीएसटी दर आता १२ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आल्याचा लाभ घेत, कपातीमुळे होणारा लाभ लक्षात घेत कपडेबाजारात सध्या उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. त्याचबरोबर 'लोकल फॉर व्होकल' चा प्रभावही स्पष्ट दिसत असून यंदाच्या दिवाळीत चिनी वस्तूंच्या मागणीत घट बघायला मिळते आहे. ग्राहक स्थानिक आणि भारतीय उत्पादने अधिक पसंत करत आहेत. थोडक्यात, 'लोकल फॉर व्होकल' उपक्रमामुळे ग्राहकांना भारतीय ब्रँड्सकडे वळवले गेले आहे, असेही आपण म्हणू शकतो. यामुळे, स्थानिक उत्पादकांना फायदा झाला असून या बाजारामध्ये ४.७५ लाख कोटींच्या विक्रीचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यंदाच्या दिवाळीमध्ये फॅशनच्या क्षेत्रात काही नवीन ट्रेंड्स दिसून येत आहेत. जसे की, इंडो-वेस्टर्न फ्युजननुसार धोती पँट्स, केप ब्लाउजेस आणि प्री-ड्रेप्ड साड्यांचा वापर वाढला आहे. खेरीज ग्राहक सस्टेनेबल फॅशन ट्रेंडअंतर्गत पारंपरिक कापडांचा वापर करत असून एका वर्गाकडून पर्यावरणपूरक उत्पादनांची मागणी वाढली आहे. यंदा ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही विक्री प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. डायरेक्ट-टू-कंज्युमर प्रकारच्या विक्रीत २५ टक्के वाढ दिसत आहे. ही आकडेवारी ग्राहकांचे ऑनलाइन खरेदीचे प्राधान्य दर्शवते. यंदा फटाक्यांच्या बाजारात उत्साह असला तरी पर्यावरणपूरकतेचा ठसा स्पष्ट दिसतो आहे. मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे यासारख्या शहरांमध्ये धूर आणि आवाज करणाऱ्या फटाक्यांवर निर्बंध आहेत. त्याचबरोबर यंदा 'ग्रीन क्रॅकर्स' ची मागणी वाढली आहे. त्यामध्ये धूर आणि आवाज कमी असतो. मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी ग्रीन क्रॅकर्सना विशेष प्रोत्साहन दिले गेले आहे. काही ठिकाणी पावसामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला असला तरी ग्राहकांचा उत्साह कमी झाला नाही. ऑनलाइन ऑर्डरिंगमुळे ग्राहकांना घरबसल्या फराळ मिळत असून त्याचा व्यापारी लाभ नोंद घेण्याजोगा म्हणावा लागेल. वाहनांच्या खरेदीतही यंदा उत्साह आहे. दसऱ्यापासूनच या बाजारातील चहलपहल वाढली असून शहरी भागात इलेक्ट्रिक स्कूटर्स, कॉम्पॅक्ट ई-कार्स आणि नवीन मॉडेल्ससाठी ग्राहक मोठ्या संख्येने खरेदी करत आहेत. ग्रामीण भागात दुचाकी वाहनांचा ओघ जास्त असून नवीन डिझाईन्स आणि सुविधा पाहता त्यामध्ये खरेदीचा स्तर वाढलेला दिसतो आहे. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सबसिडीज, इंधनदरातील बदल आणि पर्यावरणपूरक वाहनांसाठी प्रोत्साहन यामुळे ग्राहक अधिक सजग आणि पर्यावरणपूरक पर्याय निवडताना दिसत आहेत. ग्राहकांच्या बदललेल्या सवयींना प्रतिसाद देण्यासाठी विक्रेते सतत नवे प्रयोग करत आहेत. वाढती ऑनलाइन खरेदी, सोशल मीडियाचा प्रचंड प्रभाव आणि कस्टमाइज्ड उत्पादनांची मुबलक उपलब्धता हे यंदाच्या दिवाळीच्या बाजारातील महत्त्वाचे घटक सांगता येतील.

# अन्य पक्ष आघाडीवर, काँग्रेस पिछाडीवर

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इतर पक्षांनी तयारी सुरू केलेली असताना महाविकास आघाडीतील काँग्रेसची काय परिस्थिती आहे? अद्यापही काँग्रेसला सूर सापडलेला नाही.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नगाऱ्यावर टिपरी पडली आहे. ताशे-वाजंत्र्यांचा गजर सुरू झाला आहे. घोडामैदान वेशीवर आहे आणि अगदी काही काळातच महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे. अशी सारी लगीनघाई सुरू असताना महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या तिन्ही पक्षांनी निवडणुकीसाठी जय्यत तयारी केली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे शिवसेनेची तयारी चालली आहे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही थोड्याफार हालचाली चालवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील तिसरा घटक पक्ष काँग्रेसची काय परिस्थिती आहे? अद्यापही या पक्षाला सूर सापडल्याचे दिसत नाही की ओढून ताणून चंद्रबळ आणण्याचे सोंगही काढता आलेले नाही.

भाजपची संघटन शक्ती मुळातच जबरदस्त आहे आणि दिवसेंदिवस त्यात भरच पडत आहे. एखाद्या जिल्ह्याचा अपवाद वगळता राज्याच्या सर्व विभागांत भाजपची तगडी ताकद आहे. २०२४ मध्ये महायुतीने भाजपच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. लाडक्या बहिणींसह अनेक धोरणात्मक निर्णयामुळे, त्याप्रमाणे पायाभूत सुविधामध्ये क्रांतिकारक सुधारणांमुळे प्रामुख्याने भाजप आणि महायुतीविषयी विश्वासार्हता निर्माण झाली आहे आणि भाजपची गेल्या सव्वा वर्षात झपाट्याने घोडदौड सुरू आहे. याच काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निर्णयाने आणि त्यांच्या धडाकेबाज अंमलबजावणीने भाजपची प्रतिमा उजळून निघाली आहे. अमेरिकेने घातलेल्या टॅरिफ निर्बंधांना भारताने कस्पटाचीही किंमत दिली नाही. त्यामुळे ही प्रतिमा आणखी लखलखीत झाली आहे. अशी अनेक कारणे भाजपच्या सामर्थ्यात भर घालणारी ठरली आहेत. या साऱ्या मुद्द्यातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपचे पारडे वरचढ राहण्याचीच चिन्हे आहेत.




महायुतीतील शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनीही धडाक्याने तयारी चालवली आहे. दोन्ही पक्षांचे विभागवार, जिल्हावार मेळावे होत आहेत आणि काही ठिकाणी उमेदवारांची प्राथमिक यादीही तयार होत आहे. मुंबई, ठाणे, कोकणवर शिंदे सेनेचे लक्ष केंद्रित आहे आणि उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग येथेही लढत देण्याची तयारी शिंदे शिवसेनेने केल्याचे दिसत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही चांगलीच तयारी चालवली आहे. पक्षाने पश्चिम महाराष्ट्रात, मराठवाड्यात, उत्तर महाराष्ट्रात व अन्य ठिकाणीही ताकद लावली आहे. या पक्षाचे आमदार त्या त्या भागातील मातब्बर नेते आहेत. त्यांच्यामागे पक्षाचे संघटन आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीची व्यूहरचना करण्याचाही या नेत्यांचा मनसुबा असल्याचे दिसून येते.

महायुतीतील घटक पक्ष अशा पूर्ण ताकदीने रणांगणात उतरलेले असताना महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे काम चालले आहे. यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत डोळ्यांत भराव्यात अशा हालचाली आहेत. उद्धव यांच्या पक्षाचा दसरा मेळावा उत्साहात झाला. महत्त्वाचे म्हणजे गेल्या दोन महिन्यांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघा भावंडांमध्ये टाळी देण्याच्या हालचाली चालू आहेत आणि आता या हालचाली अंतिम टप्प्यात आहेत, असे दिसते. तसे झाले, तर समाधानकारक जागावाटप झाले आणि मुंबईसह कोकणातील लढती रंगतदार होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांनी अशा हालचाली चालवल्या असताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही हालचाली चालल्याचे दिसते. आपली ताकद किती, याचा सारासार विचार या पक्षाच्या नेत्यांनी कितपत केला आहे, हे काही समजत नाही; पण या पक्षाच्या नेत्या आणि खा. शरद पवार यांच्या कन्या खा. सुप्रिया सुळे यांनी स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. आता यावरून एकत्रित आघाडी म्हणून या पक्षाला लढायचे आहे की नाही, असाच प्रश्न निर्माण होतो आणि त्यांच्या निवडणूक तयारीसाठी अंदाज बांधता येतो.

राहता राहिला काँग्रेस पक्ष. एकेकाळी संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषदांवर या पक्षाचे अधिराज्य होते. विलासराव देशमुखांसारखे मुख्यमंत्री, अनेक मंत्री, किती तरी आमदार जिल्हा परिषदांतून पुढे आले. अशा या पक्षाची विद्यमान अवस्था दयनीय आहे. मोजक्या जिल्ह्यांत थोडेफार संघटन आणि दोन आकडी आमदार अशी ताकद असलेल्या या पक्षाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कितपत प्रभाव पाडता येईल, हे प्रश्नचिन्हच आहे. त्या ताकदीनिशी निवडणुकीची तयारी करायची तर परस्पर विसंगती, बेदिली ही परंपरागत वैशिष्ट्ये आणि उणिवा डोके वर काढलेल्या, अशा स्थितीत हा पक्ष आताच पिछाडीवर असल्याचा निष्कर्ष काढला, तर तो चुकीचा ठरणार नाही.

### 'मविआ'वर प्रश्नचिन्ह

उद्धव आणि राज ठाकरे हे दोघे बंधू एकत्र येण्याच्या दृष्टीने हालचाली चालू आहेत. अशी युती झाली, तर राज यांना महाविकास आघाडीत घेता येणार नाही, अशी भूमिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतली आहे. राज यांना आघाडीत घ्यायला त्यांचा विरोध दिसतो आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) खा. सुप्रिया सुळे यांनी स्वबळावर लढण्याचे सूतोवाच केले आहे. या परस्पर विसंगत भूमिकांमुळे महाविकास आघाडीपुढे प्रश्नचिन्ह उभारण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे.

**सुरेश पवार**

## शिंदे सरकारच्या अनेक योजना बंद

महाराष्ट्र सरकारमध्ये लाडकी बहीण योजना चालू केल्यापासून अनेक योजना बंद झाल्या आहेत .विरोधी पक्षांनी अशा योजनांची यादी जाहिर केली आहे. शिंदे सरकारच्या बंद झालेल्या योजना खालीलप्रमाणे आनंदाचा शिधा योजना,माझी सुंदर शाळा योजना,एक रुपयात पीक विमा योजना,स्वच्छता मॉनिटर योजना,एक राज्य गणवेश योजना,लाडक्या भावाला अप्रेंटिसशिप योजन,योजना दूत योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीवर ताण पडत असल्यामुळे अशा अनेक योजना बंद कराव्या लागण्याची शक्यता आहे. अनेक विभागाचा निधी महिला व बालकल्याण खात्याकडे वळविण्यात आला .मध्यंतरी सामाजिक न्याय मंत्र्यांनी याबाबत नाराजी सुद्धा व्यक्त केली होती अनेकांचा असा समज आहे कि केवळ निवडणुकीसाठी अशा योजना चालू केल्या होत्या .अनेक कामाची बिले पैशा अभावी पेंडिंग आहेत किंवा ती उशिरा दिली जात आहेत एकूणच लाडक्या बहीण योजनेमुळे तिजोरीवर ताण आला आहे हे खरे वाटते

**शांताराम वाघ** पुणे

सवाद

## मातीच्या पणत्या लावा !

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. दीपावली म्हणजे दिव्यांची रांग. दिवाळी खरेतर दिव्यांचा उत्सव. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळू हळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. सेल किंवा विद्युत प्रवाहावर चालणारे हे दिवे प्रकाश देत असले तरी पणत्यांमधून प्रक्षेपित होणारी सात्विकता यामध्ये नाही. विजेच्या कृत्रिम दिव्यांमुळे मातीचे दिवे बनवणारी आणि ती विकणारी गोरगरीब मंडळी यांच्यावर संक्रांत येऊ लागली आहे. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार? त्यामुळे या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

**जगन घाणेकर,** घाटकोपर, मुंबई

# ग्लोबल वॉर्मिंगनंतर हिमयुग

**सध्या जागतिक हवामानबदलाची चर्चा सुरू आहे, मात्र यानंतर हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे. अलीकडेच कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी पृथ्वीच्या नैसर्गिक कार्बनचक्रातील एक मोठी त्रुटी शोधून काढली. ही त्रुटी पृथ्वीच्या तापमानात असामान्य बदल कसे होऊ शकतात आणि दीर्घकालीन जागतिक तापमानवाढीनंतर हिमयुगासारखे अत्यंत थंडीचे युग कसे येऊ शकते, हे स्पष्ट करण्यास मदत करते.**



पृथ्वीचे तापमान प्रामुख्याने खडकांच्या नैसर्गिक क्षरणामुळे नियंत्रित होते. या प्रक्रियेत पाऊस वातावरणातून कार्बन डायऑक्साइड शोषून घेतो. पावसामुळे तो खडकात मिसळतो. खडक हळूहळू विरघळतात आणि कार्बन आणि कॅल्शियमच्या रूपात समुद्रात पोहोचतात. समुद्रात हे कार्बन साठे एकत्र होऊन शंख, कोरल आणि चुनखडीचे खडक तयार होतात. त्यामुळे समुद्राच्या तळावरील कार्बन दीर्घकाळ स्थिर राहतो. शास्त्रज्ञांनी या कार्बनचक्राचा एक नवीन पैलू शोधला आहे. तो पृथ्वीला अत्यंत थंड वातावरणाकडे ढकलू शकतो. पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डायऑक्साइड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे, की पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात, की पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते की संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेले होते. संशोधकांना आढळून आले आहे, की समुद्रातला कार्बनसंचयदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो.

वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. हे पोषक घटक प्लॅंक्टनच्या वाढीस चालना देतात. प्लॅंक्टन सूर्यप्रकाशाच्या मदतीने कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. प्लॅंक्टन मरतात, तेव्हा त्यांचे शरीर कार्बनसह समुद्राच्या तळाशी पडते आणि कार्बन कायमचा साठवला जातो; पण उष्ण, पोषकतत्त्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. अधिक पोषक तत्त्वे, अधिक प्लॅंक्टन, अधिक कार्बन संचय, अधिक थंड होणे ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते. या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते.

त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टॅट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे, की प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मोस्टॅट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात? याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते, की जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामान संकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधन पत्रात म्हटले आहे, की पुढील हिमयुग पन्नास हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्ये हा खरा प्रश्न आहे. पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टॅट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही.

या संशोधनातून स्पष्ट होते, की पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाही. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे. शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे, की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल, की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्त्रोतांकडे वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात, की जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते.

कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापरा च्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत, की जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहे. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते.

हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादरीने झाकला जाईल. काही संशोधकांच्या मते हरितगृह वायूच्या परिणामामुळे पृथ्वीच्या वातावरणात अडकलेली उष्णता या थंडीची भरपाई करेल. ती पृथ्वीला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखेल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली तरी संशोधकांच्या इशाऱ्यानुसार जागतिक तापमानवाढ ही सोपी कामगिरी नाही. त्याचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# यवतमाळ जिल्हा परिषदेच्या ६२ गटांचे आरक्षण जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ एकुण ६२ जि.प.गटासाठी आरक्षण सोडत आज दि. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यवतमाळ जि.प.गटासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांनी मान्यता दिलेले आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. एकूण ६२ जागांसाठी आरक्षण सोडत उत्साहात पार पडली. जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्रमांक आरक्षण व महिला राखीव खालील प्रमाणे आहे.






जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्रमांकानुसार बाभुळगांव तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग १ घारफळ, अनुसूचित जाती २ सावर, कळंब तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ३ कोठा, अनुसूचित जमाती ४ नाझा,अनुसूचित जमाती ५ डोंगरखर्डा , राळेगांव तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ६ जळका, अनुसूचित जमाती महिला ७ झाडगांव, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ८ खैरी, मारेगांव तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ९ कुंभा, अनुसूचित जमाती महिला १० वेगाव, वणी तालुका निहाय सर्वसाधारण ११ राजुर, सर्वसाधारण १२ वेल्हाळा (वसाहत), सर्वसाधारण १३ तरोडा, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग १४ वागदरा, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला १५ शिरपूर, झरीजामणी तालुका निहाय अनुसूचित जमाती महिला १६ माथार्जुन,सर्वसाधारण १७ मुकुटबन, केळापुर तालुका निहाय अनुसूचित जमाती महिला १८ मोहदा, अनुसूचित जमाती महिला १९ सायखेडा,अनुसूचित जमाती २० पहापळ, अनुसूचित जमाती २१ पाटणबोरी, घाटंजी तालुका निहाय अनुसूचित जमाती २२ खापरी, अनुसूचित जमाती २३ पारवा, अनुसचित जमाती महिला २४ पार्डी न., यवतमाळ तालुका निहाय अनुसूचित जमाती २५ भारी, सर्वसाधारण महिला २६ आकपुरी, अनुसूचित जमाती महिला २७ अकोला बाजार, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग २८ रुई, नेर तालुका निहाय अनुसूचित जाती २९ पाथ्रड गोळे, सर्वसाधारण महिला ३० मागला देवी, सर्वसाधरण ३१ बाणगांव, दारव्हा तालुका निहाय सर्वसाधरण ३२ बोरी खुर्द, सर्वसाधरण महिला ३३ लाडखेड, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ३४ लोही, सर्वसाधरण महिला ३५ भांडेगांव, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ३६ महागांव क., आर्णी तालुका निहाय सर्वसाधरण महिला ३७ जवळा, सर्वसाधरण महिला ३८ बोरगांव दा., नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ३९ सुकळी, सर्वसाधरण ४० सावळी स.,दिग्रस तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ४१आरंभी-साखरा, सर्वसाधरण ४२ कलगांव-डेहणी, सर्वसाधरण ४३ हरसुल-सिंगद, पुसद तालुका निहाय सर्वसाधरण महिला ४४ बान्सी, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ४५ मधुकरनगर, सर्वसाधारण ४६ जांबबाजार, सर्वसाधारण महिला ४७ रोहडा, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ४८ श्रीरामपूर, अनुसूचित जाती महिला ४९ काकडदाती, सर्वसाधरण ५० शिळोणा, अनुसूचित जाती महिला ५१ शेंबाळपिंप्रि,महागांव तालुका निहाय नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ५२ काळी दौ.सर्वसाधरण महिला ५३ हिवरा, सर्वसाधरण महिला ५४ गुंज, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला ५५ सवना, सर्वसाधरण ५६ फुलसावंगी, उमरखेड तालुका निहाय सर्वसाधारण ५७ निंगणूर, सर्वसाधरण महिला ५८ बिटरगाव बु., अनुसूचित जाती ५९ ब्राह्मणगांव, सर्वसाधारण ६० पोफाळी, अनुसूचित जाती महिला ६१ मुळावा, अनुसूचित जाती महिला ६२ विडूळ, या गटाचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी,पत्रकार, नागरिक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वणीत राजकीय भूकंप..! भाजपचे वरिष्ठ नेते विजय चोरडिया शिंदे गटात दाखल

## नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वणीतील समीकरणे बदलणार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - वणीच्या राजकीय वातावरणात आज मोठा भूकंप घडला आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, राज्य कार्यकारिणी सदस्य आणि लोकप्रिय समाजसेवक विजय बाबू चोरडिया यांनी भाजपला रामराम ठोकत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. मुंबई येथे झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय राठोड, मंत्री गुलाबराव गावंडे आणि मंत्री संजय शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती.

नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या घडामोडीमुळे भाजपला वणीत मोठा धक्का बसल्याची चर्चा सुरू झाली असून, आगामी काळात वणी विधानसभा क्षेत्रातील राजकीय समीकरणे पूर्णतः बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. या पक्षप्रवेश सोहळ्यात आशिष काळे आणि राहुल मुंजेकर यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. तसेच वणीतील शिवराज पेचे, अनिल ढगे आणि चंद्रकांत घुगुल आदींची उपस्थितीही लक्षणीय होती.विजय चोरडिया हे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून त्यांनी आरोग्य शिबिरे, लोककल्याण उपक्रम आणि सामाजिक सेवेद्वारे शहरासह ग्रामीण भागात आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे शिंदे गटाला स्थानिक स्तरावर मोठा फायदा होईल, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. मागील काही दिवसांपासून भाजपमध्ये अंतर्गत मतभेद आणि गटबाजीचे वारे वाहत होते. त्यामुळे विजय चोरडिया हे पक्ष नेतृत्वावर नाराज असल्याची चर्चा आधीपासूनच रंगत होती. अखेर त्यांनी आज त्या चर्चांना पूर्णविराम देत शिंदे गटात प्रवेश केला.पक्ष प्रवेशानंतर विजय चोरडिया यांनी "दैनिक जनमाध्यम" प्रतिनिधी शी बोलताना सांगितले की, "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली वणीच्या विकासासाठी अधिक कार्यक्षमतेने काम करता येईल. जनतेच्या अडचणी दूर करून त्यांच्या कामांना वेग देणे हे माझे उद्दिष्ट आहे. शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली वणीच्या विकासाची गती अधिक वाढवणार आहे."

दरम्यान, एक वेगळीच राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. विजय चोरडिया यांचे पुत्र कुणाल चोरडिया हे सध्या भाजपच्या यवतमाळ जिल्हा उपाध्यक्षपदी कार्यरत आहेत. त्यामुळे "पिता शिंदे गटात, पुत्र भाजपमध्ये" असे अनोखे राजकीय समीकरण उभे राहिले आहे.नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींचा वणीतील राजकीय समीकरणांवर थेट परिणाम होणार असून, भाजप या धक्क्यातून स्वतःला कसा सावरतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अवैधपणे वाहनांतून गोवंश मासाची वाहतुक करणारा इसमास अटक !, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - यवतमाळ जिल्हात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, शस्त्र बाळगणा-या तसेच अउघड गुन्हे,आरोपी शोध,अवैध धंदे तसेच गुंगीकारक औषधद्रव्याची तस्करी समुळ उच्चाटन व्हावे याकरीता पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से) यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना आदेशीत केले होते. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी त्याचे अधिनस्थ पथकांना गोपनिय माहीती काढून प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या आहेत.

१४ अॅक्टोबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा कडील पथक महागांव पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमी मिळाली कि, मौजे पेढी येथील इसम नामे शेख अकील शेख मिरांजी हा त्याचे चारचाकी वाहनांतून गौवंश मांसची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती मिळाल्याने नमूद पथकांने पेढी-पोखरी रोडवर सापळा रचून सदरचे वाहन क्रमांक एम एच ०५-६५२१ थांबवून चेक केले असता त्यामध्ये११० किलो गोवंश मांस २४० प्रमाणे असा एकूण २६,४०० व सदर वाहन किंमत रु१,००,००० रु असा एकूण १,२६,४०० रु मुददेमाल बाबत पशू वैदयकिय अधिकारी यांना अभिप्राय घेवून त्याप्रमाणे पंचनामा करुन ताब्यात घेवून इसम नामे शेख अकील शेख मिरांजी वय ४३ वर्ष,रा.पेढी ता.महागांव जि. यवतमाळ यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन महागांव येथे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता (भा.पो.से) सा, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ पियुष जगताप (म.पो.से) सा तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड,सा, पोलीस निरीक्षक सतीश चवरे, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, यांचे मार्गदर्शनात सपोनि/धिरज बांडे,पोउपनि शरद लोहकरे,पोहवा संतोष भोरगे, सफौ मुन्ना आडे, पोहवा तेजाब रणखांब,पोहवा सुभाष जाधव,पोहवा कुणाल मुंडोकार, पोहवा रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र श्रीरामे,पोशि राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा तीव्र निषेध

## राष्ट्रपतींकडे पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिकचे निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - 6 ऑक्टोबर 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर वकील राकेश किशोर यांनी बुट फेकून केलेल्या हल्ल्याचा पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक तर्फे तीव्र निषेध करण्यात आला आहे. या घटनेविरोधात राष्ट्रपतींना निवेदन पाठवून दोषी वकिलावर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, "हा हल्ला केवळ सरन्यायाधीशांवर नव्हता तर भारताच्या संपूर्ण न्यायव्यवस्थेवर आणि संविधानिक मूल्यांवर झालेला हल्ला आहे. अशा प्रकारची कृत्ये देशातील न्यायसंस्थेवरील विश्वास डळमळीत करतात. पक्षाने राष्ट्रपतींकडे मागणी केली आहे की, आरोपी वकिलाला देशद्रोही घोषित करून त्याच्यावर तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी. निवेदनात नमूद करण्यात आले की, "दोषी वकिलाला कोणतेही पश्चात्ताप नाही, उलट तो अभिमानाने आपले कृत्य योग्य असल्याचे सांगत आहे. यामागे काही जातीयवादी शक्तींचा आश्रय असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे.पक्षाने सरकारच्या मौन भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली असून, "सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशही सुरक्षित नसतील, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय?" असा सवाल उपस्थित केला आहे. पक्षाने इशारा दिला आहे की,जर अशा घटना रोखण्यासाठी कठोर पावले उचलली नाहीत, तर देशात सामाजिक असंतोष वाढण्याची शक्यता आहे.

# • वेचक



## उमरखेड नगरपालिकेत एमआयएमचा झेंडा फडकवणार, समीर साजिद

उमरखेड - शहरातील जनतेने २०१६ च्या निवडणुकीत एमआयएमवर दाखवलेल्या प्रेम आणि विश्वासाने, त्यांच्या सहकार्याने यावेळीही पुन्हा असा आम्हाला पालिकेत एमआयएमचा झेंडा फडकवण्याची संधी द्यावी असे आवाहन एमआयएमचे सरचिटणीस समीर साजिद बिल्डर यांनी ए-ऑन फंक्शन हॉलमध्ये आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात केले. उमरखेड शहरातील ए१ फंक्शन हॉलमध्ये आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना समीर साजिद बिल्डर यांनी तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना आगामी नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. २०१६ च्या निवडणुकीत उमरखेड नगरपालिकेत एमआयएमने ८ जागा जिंकल्या होत्या. यावेळी एमआयएम च्या वतीने तालुक्यातील ढानकी, मुळावा, सह अनेक गावातील इच्छुक कार्यकर्ते पदाधिकारी या कार्यकर्ता मेळाव्यात उपस्थित होते, या मेळाव्यात काका साहेब काकडे, जिल्हाध्यक्ष सय्यद इरफान,जिलाह उपाध्यक्ष शमशेर खान लाल,जिलाह समन्वयक फैज़ान लाल, जिल्हा समन्यक कृष्णा जाधव, शहर अध्यक्ष सय्यद असफर,ता अध्यक्ष शहाबुद्दीन कुरेशी,मुजीब बागवान, रसूल पटेल, सय्यद अन्सार, इरफान नदवी, शेख वसीम, सिद्दीक राज, शेख इनायत, वजाहत मुजावर, शेख अजीम,शेख असलम,शेख इमरान, सय्यद सरफराज, शेख अकील ,यश यांच्यासह सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## यवतमाळ येथे विश्व भक्तामर दिवस साजरा, शेकडो भाविकांनी घेतला लाभ

यवतमाळ - येथील आदिनाथ दिगंबर जैन मंदिरामध्ये गुरुवारी दिनांक नऊ रोजी सकाळी नऊ वाजून नऊ मिनिट नऊ सेकंदांनी विश्व भक्तामर दिवस उत्साह साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला संपूर्ण शहरातील समाजबांधव उपस्थित होते त्यांनी पाठाचे वाचन केले विश्व शांती, आणि सर्व जनकल्याणार्थ पाठाचे वाचन करण्यात आले. माळीपुरा परिसरातील आदिनाथ जैन मंदिरात सकाळी सात पासूनच गर्दी होऊ लागली मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले मंगलध्वनी, घंटा नांद, आरती, भक्तामर, मंत्रोपचार, यामुळे हा परिसर पवित्रतेने भरून गेला. जैन समाजातील महिला पुरुष आणि तरुण मंडळी तसेच बालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सर्वजण सुखी भवन्तु, सर्वे संतू निरामया, या मंगल भावनेने कार्यक्रमाचा समारोप झाला कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनासाठी समाजातील सर्व मान्यवरांनी परिश्रम घेतले होते. मंदिराचे अध्यक्ष अशोक रोहणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रद्धापूर्वक कार्यक्रम पार पडला यावेळी भक्तामर स्तोत्राचे विविध लाभ, तसेच यापासून होणारे आत्मिक समाधान यावर मार्गदर्शनही करण्यात आले.

## घरफोडी प्रकरणातील आरोपी २४ तासांत जेरबंद : पोलिसांची तत्पर कारवाई

नेर - ग्राम व्याहाळी येथे घडलेल्या घरफोडी चोरी प्रकरणातील आरोपीचा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोध घेऊन अटक केली आहे. पोलिसांच्या तात्काळ आणि प्रभावी तपासामुळे चोरीस गेलेला जवळपास ९० हजार रुपयांचा सोन्याचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, व्याहाळी येथील पोलीस ठाण्यात अप. क्र. ५४८/२५ कलम ३०५(अ), ३३१(३) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी देबीचंद नरसिंग राठोड (वय ४२ वर्षे, रा. व्याहाळी) याचा पोलिसांनी शोध घेत अवघ्या एका दिवसात अटक केली. गुन्ह्यात चोरीस गेलेला मुद्देमाल सोन्याचे मणी व त्रिकोणी पदक असलेली काळ्या मन्यांमध्ये ओवलेली पोत, किंमत सुमारे ६०,०००, सोन्याचे बदामी ८ पतडी व १६ मणी असलेली लहान पोत, किंमत सुमारे ३०,००० असा एकूण ९०,००० किंमतीचा सोन्याचा ऐवज आरोपीकडून ताब्यात घेण्यात आला आहे.

श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित वणी कडून पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी करिता धनादेश प्रदान करण्यात आला.



हा धनादेश सहायक निबंधक सचिन कुमार कुडमथे यांना संस्थेचे सीईओ संजय दोरखंडे व शाखा व्यवस्थापक प्रविण नांदे यांनी प्रदान केला.

# हलबा विकास युवा मंडळाच्या वतीने कोजागिरी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - हलबा विकास युवा मंडळ यवतमाळ यांच्यावतीने कोजागिरी व कौटुंबिक सोहळा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचेआयोजन यवतमाळ शहरातील प्रजापती नगर येथील गणपती मंदिरात 11 ऑक्टोंबर रोजी करण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रदीप चांदेकर, प्रमुख अतिथी म्हणून विद्यमान आमदार बाळासाहेब मांगुळकर, मोरेश्वर लिखार, राजेंद्र पराते, अमरावतीचे सामाजिक कार्यकर्ते श्री देवानंद हेडाऊ, सुरेश कायरकर आदि मान्यवर उपस्थित होते.

यवतमाळ शहरात हलबा बांधव मोठ्या संख्येने वास्तव करीत आहे अशातच समाजातील कौटुंबिक सलोखा वाढावा व गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांना वाव मिळावी या हेतून यवतमाळ हलबा विकास युवा मंडळाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमास सर्वप्रथम हलबा विकास युवा मंडळ तर्फे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल निमजे यांनी करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यामध्ये प्रत्युषा पत्रे, ऋत्वी पराते, अवनी लिखार, किंजल लिखार, अन्वीर्थ धकाते, हिमांशू पराते, यांनी सहभाग घेऊन आपले नृत्य सादर केले. सोबतच ज्योती उमरेडकर, योगेश निमजे, अनिल निमजे, शरदराव वरुडकर यांनी गीत सादर केले. यानंतर १०वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यवतमाळ चे प्रसिद्ध कवी जयंत चावरे यांचा 'आसु आणि हसू' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कवी प्रा. जयंत चावरे यांच्या विनोदी आणि सामाजिक कवितारुपी शब्दांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.टाळ्यांच्या गजरात उपस्थितांनी त्यांना उत्तम दाद दिली. जेवणासोबतच दुग्धप्राशनाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन संदीप पत्रे व अभिजीत धकाते यांनी केले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन मनस्वी पराते व अन्वित पत्रे यांनी केले. तर आभार संजय पराते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर पराते, रितेश उमरेडकर, सुशांत पराते, वसंत नेवाळे, अविनाश बोकडे, स्मिता पराते,किरण पत्रे, कांचन पराते,शिल्पा लिखार यांनी परिश्रम घेतले.

# पालिकांच्या मतदार याद्यांवरील आक्षेपासाठी ४ दिवसांची मुदतवाढ !

## काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळेंच्या तक्रारीची निवडणूक आयोगाकडून दखल

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - राज्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीच्या प्रारूप मतदार याद्या ८ आक्टोबरला प्रसिद्ध झाल्या. या याद्यांवर आक्षेप व हरकती दाखल करण्याची अंतिम तारीख १३ ऑक्टोबर आयोगाने निश्चित केली होती. मात्र आक्षेप व हरकतीसाठी अवघ्या पाचच दिवसांचा कालावधी दिल्या गेल्याने, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे यांनी निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्याकडे लेखी तक्रार ८ ऑक्टोबरला केली होती. त्यावर आयोगाच्या सचिवांनी दखल घेत १३ ऑक्टोबरला सुधारित आदेश जारी करून आक्षेपासाठी १७ ऑक्टोबरपर्यंतची म्हणजे चार दिवसाची मुदतवाढ दिली आहे.

राज्यातील नगरपरिषद व नगर पंचायतीच्या सदस्य व अध्यक्षपदाच्या निवडणुका होऊ घातल्या आहे. निवडणूक आयोगाने ८ ऑक्टोबरला प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची तारीख जाहीर केली. १३ ऑक्टोबरपर्यंत त्यावर आक्षेप, हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत होती. मात्र, आयोगाच्या या कार्यक्रमामध्ये आक्षेपासाठी केवळ पाचच दिवसांचा कालावधी दिल्याने काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे यांनी ८ ऑक्टोबरला निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार दिली. अल्पकालावधीत प्रत्येक प्रभागातील मतदार याद्यांचा बारकाईने अभ्यास करून त्रुटी शोधणे व हरकती तयार करणे व त्या हरकती, सूचना निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करणे अवघड ठरत असल्याचे नमूद केले होते. नागरिकांसह सामाजिक संस्था, राजकीय पक्षांचे प्रतिनिधींना आक्षेप दाखल करायला अत्यल्प वेळ मिळाल्याचे , साहेबराव कांबळे यांनी तक्रारीत नमूद केले होते. पूर्वी आक्षेपांसाठी १५ ते ३० दिवसांचा कालावधी दिला जायचा.

मात्र, पाचच दिवसांचा कालावधी मिळाल्याने निवडणूक विभागाचे सचिव सुरेश काकाणी यांच्याशी थेट कांबळे यांनी संवाद केला. दरम्यान, काकाणी यांनी काल १३ ऑक्टोबरला राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सुधारित मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला.

सुधारित आदेशाने आक्षेपासाठी १७ आक्टोबर पर्यंत अतिरिक्त ४ दिवसांचा वेळ मिळाल्याने, यवतमाळ जिल्ह्यासह राज्यभर फायदा झाला. या मुदत वाढीमुळे मात्र सर्व राजकिय पक्ष, सामाजिक संघटना व नागरिकांनी समाधान व्यक्त केले असुन कांबळेचे आभार व्यक्त केले जात आहेत.

# पुसद येथे क्रांतिवीर बिरसा मुंडा जयंती उत्सवाची तयारी जोरात !

## आदिवासी संस्कृती जागृतीचा निर्धार आणि समाजएकतेचा संकल्प

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - येथील बैठकीत क्रांतिवीर बिरसा मुंडा जयंती उत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बिरसा ब्रिगेड च्या मुख्य आयोजनातून भव्य व आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारा होणार असून त्यासोबतच प्रबोधन कार्यक्रमाचे सुद्धा आयोजन करण्याचे नियोजन या बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले.

12 ऑक्टोबर 2025 रोजी येथील रेस्ट हाऊस येथे सर्व समाजातील सर्व संघटना व आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीसह आदिवासी समाज बंधू भगिनी उपस्थितीत विशेष बैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान आदिवासी सेवक नारायण क-हाळे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश धनवे, बिरसा ब्रिगेडचे विदर्भ अध्यक्ष पांडुरंग व्यवहारे, बिरसा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष मारोती भस्मे, तसेच महिला बिरसा ब्रिगेडच्या तालुका अध्यक्ष सुनीता मळघणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. सभेत आदिवासी पँथरचे देविदास डाखोरे, आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीचे संदीप आढाव व राम अंभोरे, सचिन आत्राम आदींनी आपले विचार या ठिकाणी मांडले. तदनंतर सभेचे अध्यक्ष नारायण क-हाळे यांनी सुद्धा आपल्या अध्यक्षीय भाषणातून जयंती उत्सवाच्या यशस्वीतेसाठी सूचना मांडल्या. या बैठकीमध्ये आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीच्या नियोजनातून ऐतिहासिक पुसद येथील भव्य दिव्य मोर्चाच्या यशस्वी साठी अथक परिश्रम घेणाऱ्यांचा अभिनंदनचा प्रस्ताव मांडू त्यांचे टाळ्या वाजवून अभिनंदन करण्यात आले. आदिवासी इतिहास, परंपरा आणि संस्कृती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी यंदाचा उत्सव विशेष उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येईल. केल्या असल्याच्या भावना आपल्या प्रभावी सूत्रसंचालनातून बिरसा ब्रिगेडचे विदर्भ सचिव नानाभाऊ बेले यांनी मांडल्या. क्रांतिवीर बिरसा मुंडा यांनी आदिवासींना गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी एकत्र आणले आणि "धरतीआबा" (धरतीचे पुत्र) म्हणून आत्मविश्वास दिला. त्यांच्या विचारांत भूमी हक्क, शिक्षण, एकता, आणि निसर्गाशी नाते जपणे या मूल्यांचा गाभा होता. महामानवांच्या जयंती साजरी करण्यामागे केवळ त्यांच्या स्मृतींना वंदन करणे एवढाच हेतू नसतो, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा त्यामागचा खरा उद्देश असतो. हे उत्सव आपल्याला संघटन, संघर्ष आणि समाजजागृती यांची प्रेरणा देतात. महामानवांनी ज्या मूल्यांसाठी लढा दिला. समानता, स्वाभिमान, शिक्षण आणि सामाजिक न्याय तीच मूल्ये आजही जिवंत ठेवण्याची जबाबदारी या जयंतीद्वारे आपण स्वीकारतो. त्यांच्या स्मृतींना नमन करताना आपण त्यांच्या विचारावर चालून समाज कल्याणाचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प पूर्ण करता येतो. अशा उत्सवांतून समाजात एकता, संस्कृतीचा अभिमान आणि परिवर्तनाची जाणीव दृढ होत राहते असे प्रेरणादायी विचार सभेचे मार्गदर्शक तथा आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती पदाधिकारी सुरेश धनवे यांनी मांडले. तसेच गजानन उघडे व अनेक उपस्थित समाज बांधव व सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपले मत व्यक्त केले व अनेक विषयावर सर्वानुमते ठराव झाले.

# महासम्राट बळीराजा रथयात्रेचे नेर शहरात भव्य दिव्य स्वागत

**जनमाध्यम प्रतिनिधी**



नेर – महासम्राट बळीराजा राष्ट्र सेवा संघ व्दारा आयोजित विदर्भ स्तरीय महासम्राट बळीराजा रथयात्राचे आगमन 10ऑक्टोंबर रोजी सुरू झाले असून 11 ऑक्टोंबर ते 14 ऑक्टोंबर पर्यंत तीर्थक्षेत्र गुरुकुंज मोझरी ते शिवतीर्थ उमरी ता सावनेर अशी रथयात्रा अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर या चार जिल्हयातून ही रथयात्रा मार्गक्रमण करणार. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवात अभिवादन करुन रथयात्रेचा शुभारंभ राष्ट्रीय समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज, खा.बळवंत वानखडे, आ.संजय खोडके, माजी आ.यशोमतीताई ठाकूर, माजी आ.बच्चू कडू, आ. सुलभाताई खोडके, आ.राजेश वानखडे, रवींद्र शिंदे, प्रेमकुमार बोके यांच्या हस्ते झाले. महासम्राट बळीराजा फक्त कृषी, शेतकरी नव्हे तर व्यापार, तंत्रज्ञान, विज्ञान, कला, संस्कृती,सर्वधर्मसमभावाची पताका घेवून बळीराजाच्या कार्याचा प्रचार प्रसार व राष्ट्रीय एकात्मकतेची भावना जागृत या हेतूने विविध संघटनांच्या सहकार्याने रथयात्रचे आयोजन केले आहे.रथयात्रमध्ये महासम्राट बळीराजाचा मुर्तीरथ, जिजाऊ शिवबा मुर्तीरथ, झांकी, ढोल ताशा, पथनाट्य, गाण्यांचा कार्यक्रम हे रथयात्रेचे विशेष आकर्षण ठरले. नेर शहरात महासम्राट बळीराजा यात्रा व त्यांचे सर्व शीलदारांचं भव्य दिव्य स्वागत करण्यात आलं. तद्वाताच स्थानिक महात्मा फुले स्मारक समिती येथे प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला त्यात प्रामुख्याने शिव स्मारक समितीचे प्राध्यापक अभिविलास नखाते नागपूर यांनी उपस्थितांना प्रबोधन केले यावेळी मंचावर खुशाल मिसाळ अध्यक्ष शिवसेना सुनीताताई नखाते संचालिका शिवतीर्थ प्रोजेक्ट तथा नेर अर्बन बँक, नरेंद्र गद्रे अध्यक्ष बळीराजा स्वराज्य सेना एक सामाजिक संघटन, एडवोकेट रमेश जुनघरे उमेश इंगोले तथा अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दोन वेच्यातच कपाशीची उलंगवाडी

## शेतकऱ्यांची दिवाळी मात्र अंधारातच

**कुऱ्हा/ वार्ताहर**

भारतासारख्या कृषीप्रधान देशात जीवनावश्यक वस्तूच्या महागाईने कहर केला आहे. त्यातून शेतीही सुटलेली नाही. खते, औषधांच्या वाढत्या किंमतीमुळे शेतकरी होरपळून गेला असून, शेती कसायची तर हातात पैसा नाही, सोडायची तर पोराबाळांच्या पोटाला काय घालायचे, असा प्रश्न घेऊन शेतकरी शेतीचा गाडा ओढत आहे. खते, रासायनिक खते, तणनाशके, कीटकनाशके यावर १८ टक्के जीसटी लावण्याचे काम सरकारने केले असून शेतमालाला भाव नसल्याने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहेत.

आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या दावणीला शेतकऱ्यांना बांधण्यात येत आहे. याचा परिणाम शेतीच्या अर्थकारणावर झाला असून कृषी प्रधान देशातील शेत जमिनी उद्धवस्त होत आहे.



गेल्या दोन ते तीन वर्षात कीटकनाशक, तणनाशक व खतांच्या दरात झालेल्या वाढीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे शेती करायची की, सोडून द्यायची, अशी वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.सतत कोसळणाऱ्या पावसाच्या आणि अतिवृष्टी पावसाच्या संकटातून यावर्षी सुद्धा शेतकरी आजही संघर्ष करताना दिसत आहे. तसेच यावर्षीसुद्धा अतिवृष्टी पावसाच्या संकटाने शेतकऱ्यांना दगा दिला. त्यामुळे तिवसा तालुक्यात आत्महत्या वाढताना दिसत आहे. त्यामुळे यंदाचे सोयाबीन, कापूस, तूर पीक आणि संत्रा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने उत्पन्न कमी झाले आणि कवडीमोल भावसुद्धा मिळाला. सततच्या पावसामुळे संत्रा पिकावर फायप्टोप्थोरा बुरशी वाढ झाली असून अख्खी संत्रा बाग खाली आली आहे. संत्रा उत्पादक शेतकरी सुद्धा मोठ्या संख्येने संकटात सापडला आहे. कपाशी पूजन सितादहीच्या अंदाजवरून यंदाही दिवाळी उसणवारीवर होणार आहे. शेतकरी अंधारात असल्याने शेतकऱ्यांची दिवाळी सुद्धा अंधारातच जाणार आहे. कारण शेतकरी आपल्या काळया आईसोबत बेईमान झाला आहे. शेतकरी हा विलनीकरणात सामील झाला आहे.

त्यामुळे मी शेती अभ्यासक निखिल तेटू शेतकऱ्यांना नेहमी कमी खर्चिक शेती व्यवस्थापन बाबत माहिती देत असतो. शेतीवरील खर्च कमी कसा होणार असे माहिती रोज देत असतो, तसेच कापूस हे पीक शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सांभाळणारे नगदी पीक असल्याने अनेक शेतकरी या पिकाला सर्वात मोठे प्राधान्य देत असतात आणि काही वर्षापूर्वी कापसाला भावही थोडाफार चांगला मिळत असल्याने पेरणी क्षेत्रात वाढ झाली आहेत. परंतु यावर्षी सततच्या पावसामुळे कपाशी पिकांच्या मुळांची अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली थांबल्याने कपाशी सुकायला लागली आहेत. त्यामुळे कपाशी पिकांची पाने लालसर होऊन अख्खे कपाशीचे प्लॉट लालसर होऊन पूर्ण वाया जात आहे. अशातच शेतकऱ्यांनी सितादही केली असून हा कापूस घरी आल्यानंतर शेतकऱ्यांना एक



ते दोन वेच्यातच कापसाची उलंगवाडी होण्याचे चित्र दिसत आहे. कारण पिकांना फुल, पाती कुठेच दिसत नाही आहे. कपाशी झाडावर परिपक्व झालेले फक्त दहा बारा बोंडे दिसत आहे. शेतकऱ्यांच्या हाता- तोंडाशी आलेला घास मातीमोल झालेला दिसत आहे. कपाशी या पिकांवर हजारोचा खर्च करूनसुद्धा उत्पादन होणार की नाही, लावलेला खर्च निघणार की नाहीत, मालाला योग्य हमीभाव मिळणार की नाही, याचं प्रकारची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहेत. यामुळे सर्व समस्यामुळे उत्पन्नात मोठी घट होणार, हे मात्र निश्चित आहे. उन्हाच्या प्रखरतेमुळे कापसाची बोंडे फुटून कापूस वेचणीसाठी लवकर मिळत आहे. त्यामुळे लवकर पीक खाली होणार आहे, हे दिसत आहे. त्यामुळे सर्व शेतकरी मित्र चिंतेत दिसत आहे. कपाशी पीक हे बहुतांश निसर्गावर अवलंबून आहे. अशा शेतकऱ्यांना अधिक फटका बसल्याचे भयानक वास्तव दिसत आहे. सरकार खरंच मदत करतील का, अनुदान देतील का ही शंका सर्व शेतकऱ्यांच्या मनात उपस्थित झाली आहे. तुटपुंजी मदत नकोय प्रति हेक्टरी ५० हजार रुपये सरसकट मदत करावी अशी मागणी कुऱ्हा येथील एकजूट शेतकरी संघटनेच्या वतीने होत आहे. काही शेती शिवार मंडळे वगळल्याने शेतकरी गोंधळून गेला आहे. सरकार मदतीकडे डोळे लागल्याचे दृश्य दिसत आहे. शेतकऱ्यांमध्ये संभ्रम तयार झाला आहे.

## नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते स्व. द.ना. उपाख्य बबनराव दादा मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५' प्रदान करावयाचा आहे. यावर्षी व्यक्ती गटात एक व संस्था गटात एक, अशा एकूण दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी आवेदकांना १० नोव्हेंबर, २०२५ पूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र पाच प्रतीत ''कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ४४४६०२ या पत्त्यावर पाठवावयाची आहेत. नामांकन आवेदनपत्र पाठवितांना लिफाप्यावर ' कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५'' नामांकनाकरीता आवेदनपत्र हे ठळक अक्षरात लिहावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) व्यक्ती गट व संस्था गट अशा दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र नामांकन आवेदनपत्र विहीत प्रपत्रात देण्यात आले आहे. विद्यापीठाव्दारे संकेतस्थळावर दिलेल्या नामांकन आवेदनपत्रानुसार ए-फोर साईज मधीलच संगणकीय नामांकन आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. पुरस्काराकरीता अर्ज करण्यास इच्छुक व्यक्तींनी वा संस्थांनी www.sgbau.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर 'अवार्ड अ‍ॅन्ड अचिव्हमेन्ट' यामध्ये 'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२५' या लिंकवर विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र व पुरस्काराचे निकष यांची सविस्तर माहिती करून घ्यावी. अधिक माहितीसाठी जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचेशी प्रत्यक्ष वा दूरध्वनी क्रमांक ९०११०७१०७६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले आहे.

# व्यापाऱ्याचे २ कोटीचे सोने रेल्वेतून उडविले

**अमरावती/ का.प्र.**

सुवर्ण विक्रीचा व्यवसय करणाऱ्या व्यापाऱ्याचे सुमारे २ कोटी ११ लाख ८२ हजार रूपयाचे सोने रेल्वे प्रवासादरम्यान उडविण्यात आले. सदर व्यावसायिक हा जळगांव येथील असून त्याचे सुमारो २ किलो ३०० ग्रॅम सोने रेल्वेच्या जनरल कोचमधून चोरी झाले आहे. ही घटना रविवारी (ता.१३) सायंकाळी बडनेरा रेल्वे स्थानकावर घडली. याप्रकरणी बडनेरा पोलीसांनी अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. किशोर ओमप्रकाश वर्मा (४४, रा. जळगाव) असे या प्रकरणातील तक्रारदार व्यापाऱ्यांचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, किशोर वर्मा रविवारी सकाळी जळगाव येथून अमरावती शहरात सोने विक्रीसाठी आले होते.त्यांनी विक्रीकरीता अडीच किलो सोने आणले होते. अमरावती शहरात त्यांनी एका सराफा व्यावसायिकास १९८ ग्रॅम सोने विक्री केले होते. त्यानंतर अन्य दोन ते तीन सुवर्ण व्यावसायिकाकडे ते गेलेत मात्र त्या ठिकाणी त्यांची भेट न झाल्यामुळे सोने परत घेवून ते रविवारी सांयकाळी जळगावला परत निघाले होते. शर्मा जळगांव येथे जाण्यासाठी बडनेरा रेल्वे स्थानकावर पोहोचले. बडनेरा रेल्वे स्थानकावर त्यांनी जनरल कोचचे तिकीट काढले.

सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास ते बडनेरा स्थानकावर हावडा ते मुंबई मेलमध्ये जनरल कोचमध्ये चढले होते. परंतु रेल्वेत गर्दी असल्यामुळे ते दरवाज्याजवळ उभे होते. काही वेळातच त्यांनी जवळ असलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग कोचमधील लगेज रॅक ठेवली. परंतु त्यांचे दुर्लक्ष होताच चोरट्यांनी सुमारे सव्वादोन किलो सोने असलेली बॅग चोरून नेली. रेल्वे सुटण्यापूर्वी ही घटना घडली होती. यामुळे वर्मा यांनी बॅग पाहीली असता त्यांना दिसली नाही. त्यांनी बॅगचा शोध घेतला असता बॅग चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकरणी वर्मा यांनी तत्काळ बडनेरा जीआरपी ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीवरुन पोलिसांनी खातरजमा करुन सोमवारी सायंकाळी गुन्हा दाखल केला आहे

स्वर्गीय मथुराबाई बोहरा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ

# जिल्हा मानांकित टेबल टेनिस स्पर्धेचे बक्षिस वितरण



**अमरावती/ का.प्र.**

२५ ऑक्टोबर पासून पुणे येथे होणा-या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याकरिता अमरावती जिल्हा संघ निवड प्रक्रिया म्हणून अमरावती जिल्हा मानांकित टेबल टेनिस स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल येथे घेण्यात आले होत्या. सदर स्पर्धेचे बक्षिस वितरण सोहळा विभागीय क्रीडा संकुल येथे पार पडला. जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे प्रभाकरराव वैद्य यांच्या आशीर्वादाने व जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष प्रदीप जी काळेले, सचिव वसंत हरणे, शरद कासट, बकुल जी कक्कड यांचे मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली होती. अमरावती जिल्ह्यात होणाऱ्या तीन स्पर्धा व एक अजिंक्यपद स्पर्धेत जास्त गुण घेणाऱ्या खेळाडूंची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेकरिता करण्यात येणार आहे.

सदर स्पर्धेचे प्रायोजक अमरावती जिल्ह्यचे इलेक्ट्रिक सामानाचे विक्रेते जे के इलेक्ट्रिकल्स व अमरावतीचे प्रसिद्ध व्यापारी व समाजसेवक डाया भाई बोहरा व त्यांचे चिरंजीव अ‍ॅड सुरेंद्र जी बोहरा, वीरेंद्र भाई बोहरा यांनी मथुरा बाई बोहरा यांच्या स्मृतीत प्रायोजित केलेली होती. वीरेंद्र भाई यांचा मुलगा हानिश बोहरा हा विदर्भ चॅम्पियन असून श्रेष्ठ टेबल टेनिस खेळाडू आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीप काळेले तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा कार्यकर्ते आशा चावला, प्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. खालिद जमील व भाजपाचे कार्यकर्ते विवेक चुटके डॉ कांबळे उपस्थित होते.अध्यक्षीय भाषणात प्रदीप काळेले यांनी संघटनेचे कार्याची संपूर्ण माहिती दिली. तत्पूर्वी पाहुण्यांचे स्वागत आंडे व शहजाद खान, सस्तकर व पालकांनी केले कार्यक्रमाचे संचालन एच ए खान यांनी केले. आभार आंडे यांनी केले.

## अमरावती व बडनेरा रेल्वे स्थानकांवरील बॅग तपासणी मशीन बंद

### अवैध तस्करी वाढण्याची शक्यता

**अमरावती/ का.प्र.**



अमरावती व बडनेरा रेल्वे स्थानकांवरील सामान तपासणीसाठी वापरली जाणारी बॅग तपासणी मशीन सध्या बंद असून त्यामुळे अवैध तस्करी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या संदर्भात रेल्वे सुरक्षा बल (RPF) ला तक्रार अर्ज सादर करण्यात आला आहे. सदर अर्जात नमूद करण्यात आले आहे की, दोन्ही शहरांमध्ये तपासणी यंत्रणा ठप्प असल्यामुळे प्रवासी कोणतेही संशयास्पद किंवा बेकायदेशीर साहित्य बिनधास्तपणे बरोबर घेऊन येत आहेत. त्यामुळे अंमली पदार्थांची (ड्रग्स) तस्करी होण्याची शक्यता वाढली असून, काही प्रमाणात ती झालीही असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.यामुळे स्थानिक तरुणांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही परिस्थिती शहरातील सामाजिक व कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम करू शकते, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.तक्रार अर्जात रेल्वे प्रशासनास सद्यस्थितीत बंद असलेली चेकिंग मशीन त्वरित सुरू करण्याची विनंती करण्यात आली आहे, जेणेकरून भविष्यातील गंभीर परिणाम टाळता येतील.रेल्वे सुरक्षा बलाकडून या तक्रारीची दखल घेण्यात आली असून, पुढील कारवाई लवकरच करण्यात येईल अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

# गोरक्षण संस्थेत गोमातेचे लक्ष्मीपूजन

### मनोज देशमुख बेलोरेकर यांच्या रेणू-धनू जोडीला पूजेचा मान

**दर्यापूर/ वार्ताहर**

तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळी दहा दिवसीय गोमाता -दिपावली महोत्सव साजरा करण्यात येणार असून यामध्ये मनोज राजकुमारजी देशमुख यांनी गोरक्षण संस्थेस दान दिलेल्या रेणू-धनू या जोडीचे गोपूजन करून महोत्सव आरंभ होणार आहे.

गाडगेबाबा गोरक्षण स्थळ हे गोसेवेच्या निष्काम कार्यासाठी सर्वत्र परिचित असून या ठिकाणी गोरक्षण संस्थेचे संस्थापक संचालक यांच्या शेतीपूरक अभिनव संशोधनाने चर्चेत आहे.शेती समृद्धी साठी अनेक प्रकारचे नव नविन संशोधनास प्रा भारसाकळे हे सिद्ध मूर्तरूप देण्यास यशस्वी ठरले असून त्यांच्या कार्याची नोंद होत आहे . या स्थळावर लम्पी या जनावरांच्या दुर्धम आजारावर औषधी निर्मिती,दर्जेदार कॉम्पोस्ट खत तसेच अभिनव पद्धतीने गायीच्या शेणाची वेगवेगळ्या कार्यार्थ गोवरी निर्मिती करण्यात



येते.या विविध कार्याचे प्रा. भारसाकळे यांना केंद्रशासन कार्यालयाचे कॉपी राईट सुद्धा प्राप्त आहे.या सर्व कार्याचे पेंटेंट सुद्धा मुंबई व दिल्ली कार्यालयात रजिस्टर करण्यात आलेले असून प्रा भारसाकळे यांना अनेक राज्य तथा परप्रांत यांच्या द्वारे प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी आजवर सन्मानित करण्यात आलेले आहे. प्रा. गजानन भारसाकळे हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या बाभूळगांव- अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यायात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांचे शेती व्यवसाया संबंधीत तसेच शाश्वत शेती पूरक अनेक प्रबंध राज्य, राष्ट्र तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहेत.या सर्व कार्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या गोरक्षण स्थळावर दिपावली महोत्सवाच्या या रेणू - धनू गो-पूजनास विशेष महत्व प्राप्त होत आहे.दहा दिवस गोपूजनासाठी या ठिकाणी गोप्रेमींची नेहमी प्रमाणे गर्दी होणार असून गोरक्षण संस्थेच्या सेवेची व समाज उपयोगी कार्याची उजळणी सुद्धा होणार आहे.या महोत्सवास परिसरातील सर्व गो प्रेमी व्यक्तींनी तन मन धनाने सहभाग नोंदवावा असे आवाहन गोरक्षण संस्थेच्या सर्व कार्यकारिणीसह सचिव शेखर पाटील यांनी केले आहे.

## ऐका दिवसात अमरावती मध्ये दोन नेत्रदान

**अमरावती-** येथील रहिवासी स्व. राजेश रामचंद्र बतरा (वय ५३) व स्व.दिनकर बाळकृष्ण घोगरे (वय ७८) यांचे दुःखद निधन झाले. दोन्ही परिवारावर सुद्धा दुःखाचा डोंगर कोसळला परंतु अशाही परिस्थितीत गरजूंना या जगातील रंग पाहता



स्व.राजेश बतरा स्व.दिनकर घोगरे

येतील या उद्दात भावनेने बतरा परिवार व घोगरे परिवाराच्या सदस्यांनी स्व. राजेश रामचंद्र बतरा व स्व. दिनकर बाळकृष्ण घोगरे यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला.

यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा एजुकेशन फाउंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला संपर्क केला. दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे डेप्युटी मेडिकल डायरेक्टर डॉ. अंकित हरवानी, हिमांशू बंड,अनिल देशमुख, प्रणाली चांभारे यांनी मरनोतर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

## शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

**अमरावती-** पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ यांच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही यासाठी अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली आहे. अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांसाठी हा कार्यक्रम राहणार आहे.मतदार नोंदणीसाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नमुना १९ मध्ये आपला अर्ज सादर करावा. यासाठी मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) नुसार प्रसिद्ध केलेल्या नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर नोटीस जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, सर्व पंचायत समिती, सर्व नगर परिषद कार्यालयांच्या नोटीस बोर्ड आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.यासंबंधीचा सर्व तपशील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या मद.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आणि विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या amravatidivision.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

## बुध्द धम्म आचरणारा-डॉ. रत्नशील खोब्रागडे

### विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागात व्याख्यान

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, विद्यार्थी अभ्यास मंडळाच्यावतीने आयोजित 'धम्मचक्र प्रवर्तन- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि आजचे वास्तव' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर



व्याख्याते म्हणून सिनेट सदस्य डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. वामन गवई, डॉ. भीमराव वाघमारे,डॉ. पवन तायडे, प्रा.सुरेश पवार, प्रा. असित गुर्जर, प्रा. तेजस गुर्जर, प्रा. दादाराव मुटकुरे, बी. एल. वानखडे, उपाध्यक्ष संजय घरडे उपस्थित होते.यावेळी सविता मेश्राम, विद्याशाली गुडधे, वंदना काळपांडे आणि चमूने 'भीमरायांनी देशावरती'सादर केले. सुरेखा लांडगे, डॉ.रविंद्र खंडारे, भंते अमरज्योती, प्रफुल्ल कडू, मदन गायकवाड या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालन अलका वर्धे व सुबोध काळे यांनी केले.

## अ.भा. श्री गुरुदेव सेवामंडळाची निवडणूक



**श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम/ वार्ताहर**


अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सन २०२५-२०२८ यावर्षाकरिता नवीन कार्यकारिणी करिता झालेल्या निर्वाचण सभेत प्रकाश वाघ यांची सर्वाधिकारी तर उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील व प्रचार प्रमुख गोपाल कडू यांची एकमताने निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी जनार्दन बोथे यांना कायम ठेवण्यात आले. कार्यकारिणी सदस्य म्हणून दामोदर श्रावणजी पाटील (वर्धा), राजू तुळशीरामजी देवतळे (चंद्रपूर), अ‍ॅड. दिलीप कमलाकर कोहळे (अमरावती), रविंद्र माधवराव मुंडगांवकर (अकोट), रामदास भीमराव देशमुख (दर्यापूर), सौ.पौर्णिमा विजयराव सवाई (टाकरखेडा संभू), भाष्कर बळवंत पवित्रकार (दर्यापूर), गणेश महादेवराव जवंजाळ (बुलढाणा), सौ.शुभांगी सुनीलराव वानखडे (नागपूर) यांना निवडण्यात आले.निर्वाचन सभेचे कामकाज श्याम मुंडगांवकर यांनी सांभाळले. सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू तसेच कार्यकारिणीतील सदस्यांना अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पा बोंडे यांनी प्रार्थना मंदिरात पद व सेवेची शपथ दिली.

# विभागलेला प्रभाग क्रं ७ झाला एक


### विरोधी पक्षनेता संजय अग्रवाल यांच्या विनंतीची दखल

**अमरावती/ का.प्र.**

सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभाग रचना नुकतीच घोषित करण्यात आली. या प्रभाग रचनेत प्रभाग क्रं ७ अंतर्गत जवाहर स्टेडियम (श्रीकृष्णपेठ) या भागाला दोन भागांमध्ये विभाजीत करण्यात आले होते. हे भाग एकत्रित करण्यात यावे याकरिता मनपाचे माजी विरोधीपक्ष नेता संजय अग्रवाल यांनी मनपा आयुक्तांना विनंती केली होती. त्यांनी ही विनंती मान्य करुन श्रीकृष्ण परिसर एकत्र करण्यात आला असून नव्याने रचना जाहिर करण्यात आली आहे.



३ सप्टेबर २०२५ रोजी सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभाग रचना करण्यात आली होती. तसेच यावर आक्षेप नोंदविण्याबाबत स्पष्ट केले होते. विरोधीपक्षनेता संजय अग्रवाल यांनी प्रभाग क्रं ७ जवाहर स्टेडियम मध्ये निवडणूक आयोगाने दिलेल्या रचनेनुसार ते झाले नसल्याबाबत मनपा आयुक्तांना विनंतीअर्जाद्वारे कळविले होते.या अर्जात मुख्य रस्ते ओलांडून अतिशय लहान गल्लीबोळीतून प्रभाग रचना करण्यात आली आहे. जसे की,इर्विन ते जुना कॉटन मार्केट ते शेगांव नाका हा १०० फुटाचा रोड नैसर्गिक सीमा असतांना ती ओलांडून श्रीकृष्णपेठ या परिसरामधुन अतिशय लहान रस्त्याने प्रभागाची सीमा ठरविण्यात




आली आहे. ती नियमाच्या विरुध्द असून ती दुरुस्त करुन देण्यात यावी तसेच श्रीकृष्णपेठ परिसराला दोन भागामध्ये विभागण्यात आले आहे ते सुद्धा दुरुस्त करण्यात यावे ही विनंती मनपाचे माजी विरोधीपक्ष नेता संजय अग्रवाल यांनी केली होती.मनपा आयुक्तांनी ही विनंती मान्य करुन श्रीकृष्ण परिसर एकत्र करण्यात आला आहे.तसेच नव्याने रचना जाहिर करण्यात आली आहे.

# हरवत चाललेल्या वाचनसंस्कृतीचा शोध...

अलीकडे फेसबुक वर एक चित्र पाहिले.रेल्वे स्थानकावर माणसांची गर्दी होती, पण सगळे मोबाईलच्या पडद्यामध्ये गढलेले, आणि बाकावर बसलेले दोन रोबोट मात्र शांतपणे पुस्तक वाचत होते। या उपरोधिक चित्राने मनात विचारमंथन सुरू झाले.आपली वाचन संस्कृती नेमकी कुठे हरवली ?

भारतीय संस्कृतीचा पाया ज्ञान, चिंतन, आणि वाचनावर उभारलेला होता. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथांनी केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक व नैतिक जीवनालाही दिशा दिली. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'ह्या गीतेतील वचनात वाचन- ज्ञानाचे मर्म दडलेले आहे. ह्या संस्कृतीतील साहित्याने अध्यात्माचा संस्कार जनमाणसात रुजवला. तोच वारसा अनेक शतके प्रवाहित राहिला.पण काळाच्या ओघात ही ज्ञान परंपरा एका मर्यादित वर्गापुरती राहिली. अशा परिस्थितीत भारतीय अज्ञानरूपी अंधःकाराला छेदण्याचे कार्य १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आलेल्या वैचारिक क्रांतीने केलेली दिसून येते. ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांच्या साहित्याच्या वाचनातून भारतीय तरुणांनी नव्या कल्पना, विचार आणि सुधारणा यांचा परिचय करून घेतला. तेव्हा राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यासारखे विचारवंत वाचनातून प्रेरित झाले आणि समाज परिवर्तनाचे कार्य त्यांनी हाती घेतले.

वाचन हे केवळ छंद नाही. ती एक मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकासाची अत्यंत गरजेची क्रिया आहे. वाचन हे परिवर्तनाचे साधन आहे. इतिहास साक्षी आहे की एक पुस्तक सुद्धा समाजात विचार क्रांती घडवू शकते.'दास कॅपिटल' ने अर्थव्यवस्थेचे समीकरण बदलले. 'अंकल टॉम्स कॅबिन' ने गुलामगिरी विरोधी लढ्याला चालना दिली ,तर गीतांजलीने भारतीय आत्म्याला अभिव्यक्ती दिली. भारतात वाचन संस्कृतीने आंदोलन आणि सुधारणा यांना ऊर्जा दिली. शेतकऱ्यांचे, स्त्रियांचे, कामगारांचे प्रश्न पुढे आणणारे लेखक समाजाचे जागृतीदूत ठरले.

आजचे युग माहितीच्या महासागरात जगते, पण वाचनाचा गाभा म्हणजे एकाग्रता आणि चिंतन,आणि हीच बाब मोबाईलच्या स्क्रीनवर हरवली आहे. इंटरनेट, सोशल मीडिया आणि रिल्सच्या जलद गतीने माणूस 'क्षणिक वाचक' बनला आहे ए आयच्या युगात माणूस अधिक माहिती पूर्ण पण कमी विचारशील होत आहे. अलीकडच्या एका सर्वेक्षणानुसार, भारतातील शालेय विद्यार्थ्यांपैकी जवळपास ६५% मुले शाळेबाहेरील पुस्तक वाचत नाहीत. वाचनालये रिकामी होत आहेत. आणि ई -पुस्तके व ऑडिओ बुक्सची लोकप्रियता वाढत असली तरी त्यात वाचनाचा आत्मीय संवाद कमी जाणवतो.



वाचन केवळ ज्ञान वाढवत नाही ,तर ते मन शांत करते, विचारांना खोली देते आणि आत्मसंवाद साधायला शिकवते. वाचकाची भाषिक क्षमता, कल्पनाशक्ती, भावनिक बुद्धिमत्ता आणि निर्णयक्षमता वाढविण्याचे सामर्थ्य फक्त वाचनात आहे. परंतु वाचन हे एकांगी नसावे. सर्व विषयांना जाणून घेण्याच्या हेतूने केलेले विविधांगी वाचनच व्यक्तिमत्वाला बहुआयामी बनवते. विशिष्ट कोशाच्या बाहेर पडून विश्वातील घडामोडींचे संस्कृतीचे आणि विचारांचे ज्ञान ज्या वाचनातून प्राप्त होते, त्यातून विशाल दृष्टिकोन आणि वैचारिक व्यापकता प्राप्त होण्यासाठी वाचनासारखे दुसरे साधन नाही. वाचना अभावी माणसाची अवस्था शेणातील किड्याने ज्याप्रमाणे शेणाच्या पोला आपले विश्व मानावे आणि त्यातच रममाण व्हावे तद्वत तोकडी आणि संकुचित होते.

डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात, 'Reading gives you knowledge, and knowledge makes you great,' त्यांचा जन्मदिन म्हणजेच १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो याचे हेच प्रतीक आहे.अलीकडच्या काळात वाढते नैराश्य, तणाव आणि आत्महत्यांच्या घटना चिंतेचा विषय ठरत आहेत. मानसशास्त्रज्ञ सांगतात की वाचन ही 'थेरपी' ठरू शकते.आत्मपरीक्षणाची, भावना व्यक्त करण्याची, आणि आशावादी विचारांची दिशा देणारी. परंतु अशा बहुउपयोगी असलेल्या वाचनाला लागलेली ओहोटी म्हणजे समाजाच्या भौतिक दृष्ट्या विकसित परंतु नैतिकदृष्ट्या होणाऱ्या अधःपतनाचे द्योतक आहे. त्यामागे सोशल मीडिया हे जसे कारण दाखवता येते, तसेच साहित्याची कमी गुणवत्ता अर्थात दर्जेदार साहित्याचा अभाव, वेळेचा अभाव, वाचनाची आवड कमी होणे, वाचनासाठीची पुरेशी साधने उपलब्ध नसणे आणि बदललेली जीवनशैली अशी सांगता येतील. मानवी जीवन अर्थ केंद्रित झाले असल्यामुळे धनप्राप्तीकडे लोकांचा कल वाढलेला दिसून येतो. याव्यतिरिक्त ग्रामीण भागात पुस्तकांची उपलब्धता कमी आहे. तेव्हा वाचन संस्कृती समृद्ध करावयाची असेल तर इतर देशांप्रमाणे काही बदल स्वीकारणे गरजेचे ठरेल. जपानमध्ये प्रत्येक रेल्वे स्थानकावर बुक कॉर्नर असतो तर इंग्लंडमध्ये 'बुक कॅफे'ची लोकप्रियता वाढते आहे. भारतातही अशा उपक्रमांची गरज आहे. महाराष्ट्रातील काही शाळा 'नो मोबाईल फक्त वाचन' अशा तासांची सुरुवात करीत आहेत. पुण्यातील काही वाचनालयांनी 'ओपन बुक फेअर्स' सुरू केले आहेत.

वाचन संस्कृती हरवलेली नाही.ती फक्त झोपलेली आहे तिला पुन्हा जागवण्याची जबाबदारी आपली आहे. एक पालक, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक म्हणून आपण दररोज काही पाने वाचली तर समाजाची विचारशक्ती पुन्हा तेजस्वी होईल. तेव्हा वाचन प्रेरणा दिन केवळ एक दिवसापुरता उत्सव न राहो, तर ती आपल्या दैनंदिन जीवनाचा श्वास बना कारण वाचणारा समाजचे विचार करणारा समाज असतो.

**उज्वला शिंदे**
मो नं.९५५२१९५१४६

# वस्तूसेवाकर आकारणी पारदर्शक असावी

आपल्या देशातील सर्व राज्यात एकसमान करपद्धती असावी या उद्देशाने केंद्र सरकारने आठ वर्षांपूर्वी निर्णय घेतला गेला. दरवर्षी होणाऱ्या जीएसटी काउन्सिलच्या बैठकीमध्ये सातत्याने त्यात काही सुधारणा असायला पाहिजेत म्हणून आग्रह केला जात होता. राज्या राज्यातून काही तक्रारीही यासंबंधी येत होत्या. व्यापारी संघटनांकडून आणि उद्योजगताकडूनसुद्धा वस्तूसेवकरांची आकारणी होताना येणाऱ्या अडचणींचाही पाढा वाचला जात होता. परंतु ही करपद्धती पहिल्यांदाच देशभर अंमलात येत असल्याने वेगवेगळ्या अनुभवातून त्यात छोट्या-मोठ्या सुधारणा केल्या गेल्या. मात्र बऱ्याचशा त्रुटी कायम राहात असल्याने हा कर भरण्याची टाळाटाळही होऊ लागली. आणि त्यातल्या पळवाटाही शोधल्या गेल्या. गेल्या आठ वर्षांमध्ये जवळपास दोन लाख कोटींचा कर व्यापाऱ्यांकडून लपवला गेला. असे असूनही सरकारच्या तिजोरीत मात्र दरवर्षी वस्तू सेवकराच्या माध्यमातून मोठी भर पडत गेली. आणि सरासरी दोन लाख कोटींचे कर उत्पन्न देणारी ही करप्रक्रिया सरकारसाठी सर्वात मोठा आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत ठरला.

आता केंद्र सरकारकडे अपेक्षित असलेल्या उत्पन्नाची कमालमर्यादादेखील बऱ्याच प्रमाणात गाठलेली आहे. भविष्यकाळात यातून मोठा तो होणार नाही याची सरकारला जाणीव झाल्याचे दिसून येते.



म्हणून जीवनावश्यक वस्तूंवरचा बारा ते अठरा टक्क्यांपर्यंत असलेला वास्तुसेवाकर आता थेट पाच टक्क्यांपर्यंत खाली आणला गेला. स्वाभाविकपणे सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अनेक वस्तू आता स्वस्त होतील आणि दिवाळीच्या सणासुदीच्या काळात काही प्रमाणात निश्चितच दिलासा मिळू शकेल असे दिसते. यातून सामान्य माणसाचे सणासुदीचे आर्थिक गणित काही प्रमाणात कोलमडणार नाही. अर्थात सरकारने याची अंमलबजावणी केली असली तरी त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहणार आहेत. कारण व्यापारी वर्ग सरकारने देऊ केलेली ही सवलत ग्राहकांपर्यंत किती प्रामाणिकपणे पोहोचवतो हेदेखील पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

सणासुदीच्या काळात दुग्धजन्य पदार्थांना मोठी मागणी असते.आणि आता या करसवलतीनुसार या सर्व पदार्थांवर केवळ पाच टक्केच कर लागणार आहे, अशावेळी दुग्धजन्य वस्तूंच्या किमतीत मोठी घट होणे अपेक्षित आहे. अनेक प्रकारच्या सेवांवरही असलेला कर कमी होतो आहे. यामुळे कॅटरिंग, कुरिअर, याबाबतही करभार कमी होऊ शकतो. घरांच्या खरेदी विक्रीवरचाही कर कमी होत असताना आरोग्य आणि जीवन विमावरच्या हप्त्यांवरही आता सूट मिळणार आहे. म्हणजेच यापूर्वी कर आकाराला गेल्याने सामान्य माणसाचे नुकसान झाले. मागील दोन वर्षांपूर्वी जर कररचनेचा नीट आढावा घेतला गेला असता तर बऱ्याच दैनंदिन वस्तूंवरचा सेवाकर कमी होऊ शकला असता. आतादेखील गेल्या काही दिवसांपूर्वी घर खरेदीसारखे व्यवहार जर झाले असतील तर त्यांच्यावर आकारला गेलेला वस्तूसेवाकर ग्राहकांना त्यातल्या फरकाची रक्कम परत मिळणे अपेक्षित आहे. कारण घरखरेदीची नोंदणी केली जाते आणि त्याच्या हप्त्यांवरही वस्तुसेवाकर आकारला जात असतो. म्हणून याची पारदर्शक अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०

# दिवाळी अंकांची वैभवशाली सांस्कृतिक परंपरा

मराठी माणूस, दिवाळी आणि दिवाळी अंक यांचे अतूट असे एक सांस्कृतिक नाते आहे. खरे तर दिवाळी जसजशी जवळ येत जाते तसतसा मनोमनी आनंदाचा, उत्साहाचा झरा वाहू लागतो. दिवाळीची वैशिष्ट्ये म्हणजे करंज्या, लाडू इत्यादी दिवाळीचा फराळ, आकर्षक आकाश कंदील, पणत्या, रांगोळ्या असतात तसेच वाचकांना बौद्धिक खुराक देणारे दिवाळी अंकही या दीपोत्सवाचा एक अविभाज्य भाग असतात. अशा या आपल्या दिवाळी अंकांना एकशेसोळा वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. दिवाळी अंकांच्या इतिहासात डोकावून पाहिले असता अनेक मराठी ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि प्रतिथयश साहित्यकांची, लेखकांची, कवींची साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात दिवाळी




अंकांतूनच झाली असल्याचे दिसून येते. १९०९ साली प्रसिद्ध झालेल्या 'मनोरंजन' मासिकाच्या पहिल्या वहिल्या दिवाळी अंकात बालकवींची सुप्रसिद्ध 'आनंदी आनंद गडे' ही कविता प्रसिद्ध झाली होती, हे एकच उदाहरण बोलके आहे. दरवर्षी दर्दी वाचक दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहत असतात. विविध विषयांवरचे मान्यवरांचे माहितीपूर्ण लेख, ललित लेख, कथा, कविता, तत्कालीन विषयांवरील चर्चात्मक संवाद अशा अनेक प्रकारचा दर्जेदार मजकूर दिवाळी अंकांमधून प्रकाशित केला जातो. यंदाही आरोग्य, कलाक्रीडा, चित्रपट, पर्यटन, पर्यावरण अशा वेगवेगळ्या विषयांना वाहिलेले दिवाळी अंक बाजारात आले आहेत. वाचन आनंदासाठी त्यांचे स्वागत करूया आणि महाराष्ट्राची दिवाळी अंकांची ही वैभवशाली सांस्कृतिक परंपरा पुढे नेऊया।

-
**प्रदीप मोरे**

# पुस्तकांशी मैत्री करुया...

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी प्रगत भारताचे स्वप्न साकारण्यासाठी मोठे प्रयत्न केले. ते वैज्ञानिक असताना त्यांनी १९९६ मध्ये 'इंडिया २०२०' हे पुस्तक लिहिले, त्यावर नियोजन मंडळाने काम केले. त्यांचे जीवन अत्यंत प्रेरणादायी असून शिक्षक व मुलानं मध्ये रमणे हा त्यांचा छंद नव्हे तर उद्याचे नव भारताचे स्वप्न शिक्षक आणि विद्यार्थी घडवेल हीच त्यांची धारणा होती. २४ प्रेरणादायी पुस्तके लिहून सक्षम भारताला प्रेरणा दिली. विद्यार्थी व शिक्षक म्हणून वाचन दिन महत्वाचा आहे. कलाम यांच्या जन्मदिनी वाचन दिन खऱ्या अर्थाने प्रेरणादायी झाला पाहिजे.

आज देशात पाखंडवाद पसरवला जात आहे. धर्म व राजकारण यात सामान्य माणूस भरडला जात आहे. आपण नेमक्या कोणत्या दिशेने चाललो आहेत याची जाणीव स्वतःला झाली पाहिजे. ती जाणीव पुस्तके करुन देतात. पुस्तके निस्वार्थी मित्र असतात. हे मित्र आपली साथ कधी सोडत नाही. पुस्तकांचा अंतर्भाव जीवनात झाला की माणसाचा एकटेपणा नाहिसा होतो. झालेला भ्रमनिरास व अज्ञान दूर होते. भरभरून ज्ञान, माहितीचा खजिना, मनोरंजन, चांगले विचार,



जीवन मुल्य, संस्कार, योग्य दिशा मार्गदर्शन, दुरदृष्टी, जिद, चिकाटी, प्रेरणा पुस्तके देतात. हे मित्र आपले अनुभवविश्व संपन्न करतात.पुस्तकांच्या संगतीने माणूस सृजनशील बनतो. अशा मित्रांना वाचल्याने मनाचा उत्तम व्यायाम होतो. मन प्रसन्न होत जाते. यातून उत्तम विचार निर्माण होत एक नवनिर्माण संकल्प उदयास येतो, यासाठी वाचन आवशक आहे.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दाचीच शस्त्रे यत्न करु ॥
शब्दची आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटु धन जन लोका ॥

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी सुद्धा शब्दांचे महत्व विशद केले आहे. शब्द रत्ने आणि शस्त्र आहेत. जनलोका सांगताना आधि वाचन किती महत्वाचे आहे. यासाठी ग्रंथ आणि पुस्तके खरे गुरु आहेत.

अभ्यासोनी प्रकटावे । नाहीं तरी झाकोनी असावे।
प्रकोटोनी नासावे । हे बरे नोहे ॥

समर्थ रामदास सांगतात मानवी जीवन व्यवहार सांगताना समाजात कसे बालावे, वागावे त्यासाठी सामोरे जाताना विषयाचा आभ्यास परिपुर्ण असावा, नाहीतर रोषाला सामोरे जावे लागते.

विद्ये विना मती गेली। मती विना निती गेली ॥
निती विना गती गेली। गती विना वित्त गेले ॥
वित्त विना शुद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले ॥

हा महात्मा फुले यांचा संदेश म्हणजे क्रांतीकारक तर आहेच पण एक ज्ञानाचे तत्वज्ञान मांडणारा आहे. अनादी काळापासून एखाद्या मुक्या जनावराप्रमाणे राहणाऱ्या शुद्र, अतिशुद्र, महिला समुहाचा अडकलेला अज्ञानी वर्ग फुले यांनी साक्षर केला. शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. असे डॉ. आंबेडकरांनी निक्षूण सांगितले. साऱ्या महापुरुषांनी शिक्षणाचे महत्व जाणले व जगाला सांगितले. म्हणून जगात नवनवी क्रांती घडून आली.

आज हातातल्या पुस्तकांची जागा मोबाईलने घेतली सर्व काही त्यात उपलब्ध झाले. सोशल मिडिया, दृश स्वरूपातील चित्रणे,गाणी, तर आभ्यासाची सुत्रेही आहेत. स्मार्ट झालेला हा फोन त्यात आलेल्या गेम्स व सोशल मिडियाच्या नशेच्या व नैराश्याच्या गर्तेत अडकला हा नव्या पिढीचा वर्ग वाचना पासून दुर तर गेलाच, शिवाय खेळाच्या मैदानालाही दुरापस्त झाला. अशा सोशल मिडियाच्या लिखाण माध्यमातून कोणतेच पुस्तक न वाचता मनाला वाटेल ते विचार मांडून मूळ विचार बाजूला ठेवत मतमतांतरे घडून येत आहे. हा प्रकार उद्याच्या भविष्याला घातक आहे.

पुस्तक वाचण्यापूर्वी विषयसूची समजून घ्यावी. पुस्तक वाचताना वाचनाचा उद्देश निश्चित करावा म्हणजे पुस्तक समजते. वाचन करताना लक्ष केंद्रित असावे, मुख्य मुद्दे अधोरेखित केल्याने पुस्तकाचे विश्लेषण करता येईल. स्वतःला प्रश्न विचारल्याने काय शिकलो हे समजते. वाचून झाल्यावर त्यातून निष्कर्ष काढावेत. यातून जीवनात विचार व शिकवण यांचा अंगिकार होतो. यासाठी वाचनाची नियमित आवड तयार करावी. बहुअंगी वाचनाने माहितीचा साठ व स्वतःला घडवण्याची प्रक्रिया सुरु होते. हीच प्रक्रिया तुम्हाला जीवनाच्या यशाकडे घेवून जाते.

मोबाईलच्या अतिवापराने रोजचे वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचा खप कमी झाला. यातून दैनंदिन घडामोडींचा मिळणारा आढावा हा मोबाईलच्या विश्वासहर्तावर अवलंबून राहिल्याने सामाजिकवीण विस्कटत चालली आहे. काय वाचावे काय वाचू नये ! हे समजले पाहिजे. आपल्या ग्रंथालयात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, कृषी, क्रिडा, स्पर्धा, व्यवसाय, वैचारिक, वैज्ञानिक व मनोरंजनाची वाचण्यासाठी उपयुक्त पुस्तके, ग्रंथ उपलब्ध आहेत. आता अशा वाचनालयात युवा वर्ग फिरकणे बंद झाला आहे. पुस्तके वाचल्याने तुमच्या जीवनात येणाऱ्या अडचणीवर तुम्ही स्वतःहून मात करतात. यासाठी वाचन किती महत्वाचे आहे, हे लक्षात येते. त्यासाठी पुस्तकांशी मैत्री करावी.

**विठ्ठल वळसे पाटील**
पुणे -
८४८४०६६०४२

# स्तन कर्करोग : वास्तव

कॅन्सर (कर्करोग) हा शब्द उच्चारताच अंगावर शहारे येतात व तसे स्वाभाविक आहे. याचे कारण म्हणजे कॅन्सरच्या निदानानंतर उपाराकरिता होणारा आर्थिक खर्च व उपचार नंतर फलिताची अनिश्चितता तसेच रुग्ण व कुटुंबाला होणारा मानसिक व शारिरीक त्रास हे आहे.स्तन कॅन्सर हा जगभरातील स्त्रीयांमध्ये होणाऱ्या कॅन्सर पैकी पहिल्या क्रमांकाचा कॅन्सर आहे दोन दशकापुर्वी भारत देशात योनि-मार्गाच्या कॅन्सरचे प्रमाण हे स्तन कॅन्सर पेक्षा जास्त होते. सध्यास्थितीत स्तन कॅन्सर भारतीय स्त्रियांमध्ये आढळणारा सर्वात जास्त प्रमाणाचा कॅन्सर आहे. २८ पैकी एका स्त्रीला स्तन कॅन्सर होण्याची भविष्यात शक्यता आहे. यावरुन असे लक्षात येते की स्तन कॅन्सर रुग्णाचे प्रमाण हे आपल्या देशात भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे.

भारत व इत्तर विकसनशिल देशाच्या तुलनेत विकसीत देशांमध्ये स्तन कॅन्सरचे रुग्ण जास्त असले तरीही विकसित देशांमध्ये स्तन कॅन्सरमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या



कमी आहे. याचे विश्लेषण केले असता असे निदर्शनास येते की, स्तन कॅन्सरचे निदान व उपचार हे पाश्चिमात्य देशांमध्ये आजार प्राथमिक अवस्थेत असतांना केला जातो. याउलट आपल्या देशात शेवटच्या स्टेज ३ व ४ मध्ये निदान व उपचारा करिता येणाऱ्या रुग्णाची संख्या ही फार मोठ्या प्रमाणात आहे. अलिकडे सुशिक्षित व शहरीभागातील रुग्ण प्राथमिक अवस्थेत येत असल्याचे दिसून येते व हा आशेचा किरण आहे. मात्र आजतागत ग्रामीण भागातील परिस्थिती मध्ये विशेष फरक जाणवत नाही ही चिंताजनक व भारतीय आरोग्य व्यवस्थेला आव्हानात्मक बाब आहे. याची मिमांसा केले असता त्याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्वाचे कारण म्हणजे समाजात या रोगाबद्दलची अपुरी माहिति व ज्ञान, अशिक्षितपणा, आर्थिक दुर्बलता, अपु-या आरोग्य सुविधा व रोगाबद्दलचे गैरसमज अशी आहे.

भारतीय स्त्रियांमध्ये स्तन कॅन्सरच्या रुग्णांमध्ये वयाच्या ३० ते ४० वयोगटात झपाट्याने वाढ होत आहे. हे अत्यंत काळजी-जनक आहे. बदललेली जिवनशैली, असंतुलित आहार, शारिरीक हालचालींचा अभाव, वाढता ताण, पर्यावरणातील घटक, उशिराचे गरोदरपण व स्तनपान आणि आणुवंशिक प्रकृती ही याची मुख्य कारणे आहेत. तरुण वयातील स्त्रीयांना स्तन कॅन्सरचा उपचार हा वयोवृध्द स्त्रीयांच्या तुलनेत कमी प्रभावी असतो याचा परिणाम हा कुटुंब व अपत्यावर होतो. लवकर निदान प्रभावो उपचार हे ब्रिदवाक्य सर्वच रोगांकरिता मुख्यत्वे कॅन्सर बद्दल तंतोतंत आहे. स्तन कॅन्सरचे निदान हे प्राथमिक अवस्थेत उपचार झाल्यास त्यावर आजघडीला प्रभावी उपचार पध्दती उपलब्ध आहे. लवकर निदान झाल्यास रुग्णाची निदान व उपचारानंतर साधारण जिवन जगण्याची शक्यता पुर्णपणे वाढते. याऊलट कॅन्सरचे निदान व उपचार उशिरा झाल्यास त्या प्रमाणात प्रभावी ठरत नाही याचाच अर्थ लवकर निदान व उपचार होणे हे अतिशय महत्वाचे आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे जगभरातील एकूण स्तन कॅन्सरच्या रुग्णांपैकी निम्म्यापेक्षा जास्त रुग्ण हे भारतासारख्या विकसनशील व इतर आथकदृष्ट्या दुर्बल व अविकसीत देशांमध्ये निदान होतात. अशा देशामधील अपुरी आरोग्याची जिवनशैली, आर्थिक अडचणी या बाबीमुळे रुग्ण उपचाराकरिता उशिरा डॉक्टरांकडे येतो. ज्यामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णांची संख्या ही विकासित देशाच्या तुलनेत विकसनशील आर्थिकदृष्ट्या दुर्बल देशांमध्ये जास्त आहे. वैद्यक शास्रातील प्रगतीमुळे आजीला स्तन केन्सरचे निदान व उपचार हे अगदी प्राथमिक अवस्थेत करणे शक्य आहे.देशात स्तन केन्सरच्या लवकर निदानाकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना राबविणे शक्य आहे.

**जिवन शैलीतील बदल**

जिवन शैलीतील साधारण बदला मद्यसेवन धुम्रपान वर्जीत करणे, नियमित व्यायाम वाढविते व कॅन्सरचे प्रमाण कमी होण्यास मदत करते.

स्तनाची स्वतपासणी-वयाच्या तिशीनंतर प्रत्येक स्त्रीने स्तनाची तपासणी आरशासमोर उभे राहून मासिकानंतर पाच दिवसानी दरमहिण्यात करावी. स्त्रियांनी आपल्या जन्मदिवशी स्तनन्सरतज्ञांकडून स्तनांची तपासणी करुन घ्यावी.३५ वर्षांनी मेमोग्राफी करुन घ्यावी.

भारत देशातील स्तन रुग्णाचा स्तर उंचविण्यासाठी तसेच लवकर निदानाकरिता डॉक्टर, नर्सेस यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सर्वसामान्यामध्ये विशेषता ग्रामीण भागात स्तन कॅन्सर बद्दल जनजागृती करणे अत्यावश्यक आहे.या उपक्रमात डॉक्टर्स, नर्सेस, स्वंयसेवी संस्था व शासनाच्या सहभाग उत्कुर्तपणे आवश्यक आहे.आपणास अथवा आप्तेष्टास स्तनाचा आजार असल्यास किंवा स्तनरोगांबद्दल काही शंका असल्यास कुठलाही संकोच न बाळगता स्तनरोग विशेषज्ञ किंवा कॅन्सरतज्ञ अथवा शल्यचिकित्सक यांचा त्वरीत सल्ला घ्यावा.

**डॉ. भाऊसाहेब बकाने**
आस्था सर्जीकल व कॅन्सर हॉस्पीटल, वर्धा

# सरपंचासह शेतक–यांच्या तक्रारीवर कृषी सहायकाची बदली

## टाकळी खेट्री परिसरातील सर्वेक्षणातील घोळ प्रकरण




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील टाकळी खेट्री परिसरात पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ केल्याचा आरोप करणाऱ्या शेतकऱ्यांच्या तक्रारीवर अखेर प्रशासनाने कारवाई केली आहे. या प्रकरणात संबंधित कृषी सहायक एम. एम. पेंढारकर यांची टाकळी खेट्री येथून बदली करण्याचे आदेश १४ ऑक्टोबर रोजी तहसीलदार राहुल वानखेडे यांनी तालुका कृषी अधिकारी यांना पत्राद्वारे दिले आहेत.

याआधी खेट्रीचे सरपंच जहूर खान आणि स्थानिक शेतकऱ्यांनी २९ सप्टेंबर रोजी तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत सर्वेक्षण पथकातील काही कर्मचाऱ्यांनी आर्थिक व्यवहार करून फक्त ३६ जवळच्या शेतकऱ्यांचे पंचनामे तयार केले आणि त्यांना पीक नुकसानीचा लाभ दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. तसेच काही लाभार्थ्यांच्या नावे पीक पेरेची नोंद नसतानाही नुकसान भरपाई मंजूर करण्यात आल्याचेही नमूद केले होते.प्रशासनाकडून कारवाईला विलंब होत असल्याने ९ ऑक्टोबर रोजी सरपंच जहूर खान यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन, कारवाई न झाल्यास तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता. या प्रकरणाचे वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि अखेर संबंधित कृषी सहायकावर बदलीची कारवाई करण्यात आली.

'टाकळी खेट्री परिसरात रब्बी पिकांच्या सर्वेक्षणात आर्थिक व्यवहार करून घोळ करण्यात आल्याबाबत आम्ही तक्रार केली होती. तहसीलदार राहुल वानखेडे यांनी आमच्या तक्रारीची दखल घेत संबंधित कृषी सहायकावर बदलीची कारवाई केली आहे. शेतकऱ्यांवर अन्याय खपवून घेणार नाही, अशी आमची भूमिका आहे.'

**- जहूर खान,** सरपंच खेट्री

-------

'टाकळी खेट्री परिसरात सर्वेक्षणातील घोळाबाबत सरपंच व शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सरसकट नुकसानीच्या लाभात अनियमितता होऊ नये, म्हणून संबंधित कृषी सहायकाची तिथून बदली करण्याबाबतचे पत्र तालुका कृषी अधिकाऱ्यांना दिले आहे.'

**- राहुल वानखेडे,**
तहसीलदार पातूर

# दि. अकोला अर्बन बँकेच्या पुणे शाखेचे थाटात उद्‌घाटन

■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भातील ग्राहकांची विश्वासाहर्ता कमावलेली आणि ग्राहकसेवेसाठी नावाजलेली दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला हिची ३६ वी शाखा पुणे शहरातील पिंपळे निलख येथे मोठ्या उत्साहात व जल्लोषात सुरू झाली. या भव्य उद्घाटन सोहळ्याला पुणेकर नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला विशेष ऊर्जामय वातावरण तयार झाले.

या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी पिंपरी चिंचवड जिल्हा संघचालक विनोदजी बन्सल (सीए) होते. प्रमुख अतिथी म्हणून अ. भा. बँकिंग प्रकोष्ट प्रमुख सहकार भारतीचे मा. अभयजी माटे (सीए) तसेच सहकार भारतीचे अ. भा. संघटन मंत्री मा. संजयजी पाचपोर यांनी उपस्थित राहून बँकेच्या कार्याचा गौरव केला. मंचावर बँकेचे अध्यक्ष शंतनू जोशी, उपाध्यक्ष राहुल राठी, मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी यांनी करताना बँकेच्या वाटचालीचा आढावा सादर केला. त्यांनी बँकेने सहकार क्षेत्रात उभारलेले विश्वासाचे भक्कम



## पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अधिष्ठान आणि नव्या शाखेमुळे पुण्यातील ग्राहकांना मिळणाऱ्या सुविधांचा उल्लेख केला

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के यांनी बँकेच्या विविध कर्जाच्या योजना, आकर्षक ठेवी योजना, डिजिटल बँकिंग सुविधा आणि ग्राहकाभिमुख उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पुणे शाखेच्या माध्यमातून बँकेच्या सेवांचा विस्तार पश्चिम महाराष्ट्रात अधिक प्रभावीपणे होईल. पिंपळे निलख, पुणे शाखेचे शाखाधिकारी प्रवीण हातवळणे यांनी मंचावरील मान्यवरांचा परिचय करून दिला. तर आभारप्रदर्शन बँकेचे संचालक शार्दुल दिगंबर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पूजा जलताडे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचारीवृंदाने एकदिलाने मेहनत घेतली. सर्वांच्या अथक प्रयत्नांमुळे पुणे शाखेचा शुभारंभ हा केवळ उद्घाटन सोहळा न राहता 'अकोला अर्बन बँकेच्या विश्वास आणि प्रगतीच्या प्रवासातील एक नवा पर्व' ठरला. या प्रसंगी या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष राहुल राठी, तसेच संचालक अमरिकसिंग वासरीकर, प्रमोद शिंदे, मोहन अभ्यंकर, दिपक मायी, माधव बनकर, किरण खोत, कैलाश मशानकर, धनंजय पाटील, शार्दूल दिगंबर तसेच पिंपळे निलख परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, ग्राहक आणि सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या शाखेमुळे नागरिकांना पारदर्शक, आधुनिक आणि ग्राहककेंद्रीत बँकिंग सेवा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आदिवासी लाभार्थी दोन वर्षांपासून घरकुल योजनेपासून वंचित

## माजी उपसभापती इमरान खान यांचे प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील आदिवासी समाजातील लाभार्थी गेल्या दोन वर्षांपासून शासकीय शबरी घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. या संदर्भात पातुर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान यांनी दि. १३ ऑक्टोबर रोजी अकोला येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

शासनाच्या शबरी घरकुल योजनेअंतर्गत आदिवासी बांधवांना निवारा उपलब्ध करून देण्याचा हेतू आहे. या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पातुर पंचायत समितीकडून २४ डिसेंबर २०२४ रोजी एकात्मिक आदिवासी विभागाकडे लाभार्थ्यांची यादी प्रस्तावित करण्यात



आली होती. मात्र, अद्यापही या प्रस्तावावर कार्यवाही न झाल्याने आदिवासी लाभार्थी घरकुलापासून वंचित असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

'आदिवासी लाभार्थ्यांना शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळावा म्हणून २४ डिसेंबर २०२४ रोजी प्रस्ताव विभागाकडे सादर केला होता. परंतु अद्यापही लाभ मिळाला नाही. त्यामुळे आदिवासी बांधव दोन वर्षांपासून घरकुल योजनेपासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.'

**- इमरान खान,**
माजी उपसभापती, पं.स. पातुर

माजी उपसभापती इमरान खान यांनी सांगितले की, 'पातुर तालुक्यात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. शासनाच्या शबरी घरकुल योजनेचा लाभ त्यांना तातडीने मिळावा, यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून लवकरात लवकर या योजनेचे टार्गेट मंजूर करण्यात यावे,' अशी मागणी त्यांनी केली.

## मारवाडी युवा मंचच्या वॉकथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** युवा आणि ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याकडे वळविण्याच्या उद्देशाने मारवाडी युवा मंच शाखा अकोला, महिला मिडटाऊन शाखा आणि उदय शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विद्यापीठ मैदानात आयोजित वॉकथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मंचाचे मार्गदर्शक निकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनात आणि प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा, नंदकिशोर अग्रवाल, शीतल अग्रवाल, नंदकिशोर पचौरी आणि धैर्य अग्रवाल यांच्या उपस्थितीत हा वॉकथॉन उपक्रम पार पडला.

## आरोग्य विभागातर्फे 'सीपीआर' जनजागृती आठवडा

**अकोला :** 'कार्डिओ-पल्मोनरी रिसुसिटेशन' अर्थात सीपीआर ही आपत्कालीन जीवनरक्षक प्रक्रिया आहे, व्यक्तीच्या हृदयाचे ठोके थांबल्यावर सीपीआर देऊन त्याचे प्राण वाचवले जातात. या प्रक्रियेबाबत जनजागृतीसाठी आरोग्य विभागामार्फत 'सीपीआर जनजागृती आठवडा' साजरा केला जात आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, आरोग्य उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात सर्व आरोग्य संस्थांतर्फे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी नियोजन करून उपक्रमांची आखणी केली आहे.

# दिवाळीपूर्वी सोयाबीन खरेदी सुरू करा, अन्यथा आमदारांच्या घराला घेराव

## किसान ब्रिगेडचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची झाली असून, शासकीय खरेदी केंद्र सुरू न झाल्यामुळे व्यापारी अत्यल्प दराने सोयाबीन खरेदी करत आहेत. या पार्श्वभूमीवर, किसान ब्रिगेडने राज्य सरकारला दिवाळीपूर्वी शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याचा इशारा दिला आहे. अन्यथा आमदार आणि लोकप्रतिनिधींच्या घराला घेराव घालण्याचा इशारा किसान ब्रिगेडचे अध्यक्ष दिवाकर गावंडे यांनी दिला आहे.

सध्या बाजारात सोयाबीनचे दर तीन हजार ते साडेतीन हजार रुपये प्रतिक्विंटल या दरम्यान असून, उत्पादन खर्चसुद्धा निघत नाही अशी परिस्थिती आहे. बियाणे, मजुरी, खते, कीटकनाशके या सर्वांचा एकत्रित खर्च प्रति एकर सुमारे २० हजार रुपये येतो, मात्र व्यापारी कमी दराने खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिवाकर गावंडे म्हणाले, 'राज्य सरकारने फसवे पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. शासकीय खरेदी केंद्र सुरू न करून सरकार शेतकऱ्यांना आर्थिक खाईत ढकलत आहे. ही परिस्थिती त्वरित बदलली नाही, तर किसान ब्रिगेडला आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही.' या संदर्भात किसान ब्रिगेडचे कार्याध्यक्ष शरद वानखडे, प्रदीप पाटील गावंडे, भगवंतराव गवळी, राजेश मावळे, रामधन दामोदर, राजेंद्र जंजाळ, सिद्धार्थ तायडे तसेच प्रवक्ते धनंजय मिश्रा यांनी संयुक्त निवेदन प्रसिद्ध केले आहे.

दरम्यान, या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधताना राष्ट्रीय किसान परिसंघाचे सचिव प्रकाश पोहरे यांनी सांगितले की, 'नाबार्डमार्फत शासकीय खरेदी केंद्र सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र सरकार याकडे दुर्लक्ष करीत आहे. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी आणि हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरू करण्यासाठी आम्ही हा प्रश्न दिल्ली दरबारी मांडणार आहोत.' शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे, अशी जोरदार मागणी किसान ब्रिगेड आणि राष्ट्रीय किसान परिसंघतर्फे करण्यात आली आहे.


### जाहीर प्रसिध्दी

दिनांक : १४/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोट तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोट तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेचही करतात अशा व्यक्तींनी जिल्हा मजुर संघाचे सुचनेनुसार अकोट तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो.गजानन नगर, अकोट ता. अकोट जि. अकोला येथे दिनांक २९/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**(प्रशांत भिमराव सिरसाट)**

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१३७/२०२४ — प्रोसेस नं.१७१५०/२०२५
चौ.ता. १०/११/२०२५ — दिनांक : १०/१०/२०२५

**अर्जदार :** १) प्रदीप भगवंतराव देशमुख पत्ता- रा. व्दारका नगरी मोठी उमरी अकोला ता. जि. अकोला २) कल्पना राजेंद्र खारोडे रा. तळेगाव बाजार ता. तेल्हारा जि. अकोला ३) वैष्णवी नितीन भांबुरकर रा. अ. १५३ भारत टाउन इरखेडा नागपुर ता. जि. नागपुर ४) मंजुळाबाई बाजीराव देशमुख रा. चरणगांव, ता. पातूर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** अर्चना प्रशांत डिक्कर पत्ता - रा. व्दारका नगरी मोठी उमरी अकोला ता. जि. अकोला

**मयताचा पत्ता :-** मयत : १. भगवंतराव बाजीराव देशमुख २. कांता भगवंतराव देशमुख
**पत्ता :-** दोघेही रा. व्दारका नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क.१. भगवंतराव बाजीराव देशमुख यांचे दि. २५/०८/२०२१ रोजी अकोला, ता. व जि. अकोला येथे व मयत क. २. कांता भगवंतराव देशमुख यांचे दि. २८/०१/२०२० रोजी अकोला, ता. व जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही. मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८००/२०२५ — प्रोसेस नं.१६४०९/२०२५
चौ.ता. ०६/११/२०२५ — दिनांक : ३०/०९/२०२५

**अर्जदार :** १. लता जयंत गुढे २. पंकज जयंत गुढे रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ३. पवन जयंत गुढे रा. फ्लॅट नं. एफ/७०२, ड्रीम विला, हडपसर, पुणे ता. जि. पुणे ४. माधुरी मिलिंद कोरे रा. पोस्ट ऑफिस जवळ, सावडा रूरल, ता. सावडा जि. जळगांव.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जयंत नारायण गुढे
**पत्ता :-** रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जयंत नारायण गुढे यांचे दि. २९/०४/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटिस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ११४/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, आंबेडकर नगर, जऊळका, ता. अकोट जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. सतिश ईश्वरदास घनबहादूर रा. जऊळका, ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/ १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रुपये ५००/- अध्यक्षांच्या ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेलत्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशारितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक - १३/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७५१/२०२५ — प्रोसेस नं.१५६७८/२०२५
चौ.ता. २७/१०/२०२५ — दिनांक : १९/०९/२०२५

**अर्जदार :** १. शिरिष शरद दिक्षित ग. श्री गजानन कृपा, नाईक वाड्याजवळ, देशमुखपुरा, बोरगांव, ता. जि. अकोला. २. गौरी ललितदास जोशी (लग्नानंतरचे नाव) सुरेखा शरद दिक्षित (लग्नाआधीचे नाव) ग. बलुतीचा माळा, गणेश नगर, आंबेजोगाई, ता. आंबोजोगाई जि. बिड ३. श्रुती श्रीकांत दिक्षित ४. मृणाल श्रीकांत दिक्षित ५. मिहीर श्रीकांत दिक्षित अर्जदार क. ३ ते ५ रा. ए-१७, अयोध्यानगर, व्हीआयपी रोड, एल ॲण्ड टी सर्कल जवळ, करेलीबाग, वडोदरा, गुजरात. ६. सुरेंद्र शरद जोशी रा. प्लॉट नं. १, फ्लॅट नं १०, मैत्री रेसिडेन्सी, नुतन वर्षा कॉलनी, जळगाव ता जि. जळगांव

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शरद विनायक दिक्षित
**पत्ता :-** रा. श्री गजानन कृपा, नाईक वाड्याजवळ, देशमुखपुरा, बोरगांव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शरद विनायक दिक्षित यांचे दि. ११/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २७/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (कु. स्तर) मुर्तिजापूर, जि. अकोला (श्री तांबोळी साहेब) यांचे न्यायालय**

आर. एम. जे. सी. क्रमांक : ३३०/२०२५ — प्रोसेस नं.२८७९/२०२५
चौ.ता. ११/११/२०२५ — दिनांक : ०७/१०/२०२५

**अर्जदार :** १. दिलीप अंबादास अहेरवाल, वय ४६ वर्ष, २. राधा अंबादास अहेरवाल, वय ४२ वर्ष, ३. सोनिया बाई विक्रम सुनहेरे, वय ४४ वर्ष, रा. शिवमंदिर जवळ, दमारु उस्ताद चौराह, अर्जुनसिंग गौहर नगर, इंदौर, पोस्ट भागीरथपुरा, ता. जि. इंदौर ४. अनिल अंबादास अहेरवाल, वय ३७ वर्ष, अ. क्र. १, २ व ४ रा. रा. संत रविदास नगर, मोचीपुरा, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत शंकुतला अंबादास अहेवाल, रा. संत रविदास नगर, मोचीपुरा, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदार ११/११/२०२५ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी स्वतः अगर निर्देशीत केलेल्या वकीला मार्फत चौकशी तारीख दिनांक ११/११/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

### जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७८/२०२५ — प्रोसेस नं.१६९८५/२०२५
चौ.ता. २५/११/२०२५ — दिनांक : ०८/१०/२०२५

**अर्जदार :** १. संगीता बाळकृष्ण नागापुरे २. शुभम बाळकृष्ण नागापुरे दोन्ही रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला. ३. अंजली किशोर ढगे रा. एरंडा ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बाळकृष्ण वासुदेव नागापुरे
**पत्ता :-** रा.डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाळकृष्ण वासुदेव नागापुरे यांचे दि. १९/०८/२०२४ रोजी राहत्या घरी डोंगरगाव ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८०३/२०२५ — प्रोसेस नं.१७२९१/२०२५
चौ.ता. १५/११/२०२५ — दिनांक : १३/१०/२०२५

**अर्जदार :** १. राकेश अजाबराव बडगे रा. घर क्र. ५७२/ई/ २८ / ए, सुरेंद्रगढ, मानव सेवा नगर, सेमिनरी हिल्स, नागपूर, ता. जि. नागपूर. २. सौ. प्रिती धिरज बनसोड रा. यशोदा नगर, शांती नगर, अमरावती. ता. जि. अमरावती. ३. सौ. जयश्री अविनाश इंगळे रा. घर क. १५, जुना बायपास रोड, सैनिक नगर, अमरावती. ता. जि. अमरावती. ४. मोनोनिशा पंकज रामटेके रा. व्दारा विशाल चिमनकर घर क्र. ५५४ / ई, गणेश मंदिर जवळ, सुसेंद्रगढ, सेमीनरी हिल्स, नागपूर ता. जि. नागपूर. ५. आरती अजाबराव बडगे (विवाहापूर्वीचे नाव) आरती रितेशकुमार गजबे ( विवाहानंतरचे नाव) व्दारा एन. आर. राणे, निशिगंध निवास, चैतन्य हनुमान मंदिर जवळ, चैतन्यवाडी, मलकापूर, ता. मलकापूर, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अजाबराव नसर बडगे
**पत्ता :-** रा. वृंदावन नगर गायत्री मंदिराजवळ, सुधीर कॉलनी जवळ,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अजाबराव नसर बडगे यांचे दि. १५/०८/२०२४ रोजी किटीझोन हॉस्पिटल, नागपूर येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५ / ११ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटिस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १२०/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** मातोश्री गौरक्षण ट्रस्ट विवरा ता. पातुर जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. स्वप्नील दारासिंग पजई रा.मु.पो. विवरा, ता. पातुर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १ )वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- ११००/-रुपये आहे.

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा- अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे संगीता संजय काकड रा. पार्डी, ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :**

मौजे -पार्डी मालमत्ता क्र.१०१, घर क्र.१०१ क्षेत्रफळ २८६७ चौ.फु. व त्यावरील बांधकामा सह गट ग्रा. पंचायत पार्डी मोझरी बु. हद्दीतील, ता. बार्शिटाकळी जि. अकोला.

त्यास चतुर्सिमा :- पूर्वेस :- प्रवीण पुंडलीक काकड पश्चिमेस:-रामभाऊ शालिग्राम अघडते उत्तर:- सरकारी रोड दक्षिण:- सरकारी रोड वरील सदरहू मालमत्ता हि श्री. संजय दादाराव काकड यांची वडिलोपार्जित मालमत्ता होती. सदरहू मालमत्ता हि महिंद्रा रुरलहाऊसिंग फायनान्स लि. येथे रजि. गहाण खत क्र. १८९५/२०२४ दिनांक २४/०६/२०२४ रोजी गहाण केली आहे. तदनंतर श्री. संजय दादाराव काकड यांचा दिनांक ०३/१०/२०२४ रोजी मृत्यू झाला व सदरहू ममता हि त्यांच्या पत्नी नामे संगीता संजय काकड यांचे नावे झाली.तरी वरील मालमत्तेवर महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लि. शिवाय आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : १४/१०/२०२५
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस: आनंद बेकरी जवळ,
रामदास पेठ, अकोला मो. ९४२३४३०१७१


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३१७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## पीएम धनधान्य कृषी योजनेंतर्गत कार्यक्रम

# शेतकऱ्यांना शेती आणि रब्बी पिकांबाबत मार्गदर्शन

**वर्धा/जनमाध्यम**

कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे पीएम धनधान्य कृषि योजनेंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमाचे थेट प्रसारण करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना शेती आणि रब्बी पिकांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कृषि विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.जीवन कतोरे यांच्या यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम सेलसुरा येथे आयोजित करण्यात आला होता. आयोजित करण्यात आला. केंद्र सरकारने कृषी क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी भारतरत्न लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीदिनी दोन महत्त्वाकांक्षी योजनांचा शुभारंभ केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्था, पुसा येथे आयोजित विशेष 'कृषी कार्यक्रमात' 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना' आणि 'डाळींमध्ये आत्मनिर्भरता अभियान' यांचा औपचारिक प्रारंभ झाला. कार्यक्रमादरम्यान प्रधानमंत्र्यांनी देशातील विविध भागांतील निवडक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्थांच्या प्रतिनिधींशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे थेट संवाद साधला.



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक राम अंबुरे, बोपापुरचे सरपंच विनोद दांदळे, पोलिस पाटील सचिन वडतकर, प्रगतिशील महिला शेतकरी नीलिमा अक्कलवार उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी कमी खर्चात शेती करून उत्पन्न कसे वाढवावे याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. डॉ.रुपेश झाडोदे यांनी रब्बी पीक व्यवस्थापन विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच डॉ.प्रेरणा धुमाळ यांनी मूल्यवर्धन प्रक्रिया उद्योग याविषयी तर डॉ.सविता पवार यांनी रब्बी हंगाम पीक लागवड तंत्रज्ञान व ड्रोन फवारणी विषयी विस्तृत माहिती दिली.

डॉ.सचिन मुळे यांनी जनावरांची काळजी व गजानन म्हसाळ यांनी खत व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन केले. सचिन वडतकर यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी फार्मर्स कप स्पर्धेच्या शेतकरी गटांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन व आभार डॉ.अंकिता अंगाईतकर यांनी केले.

कार्यक्रमाकरिता डॉ.निलेश वझीरे, पायल उजाडे, वैशाली सावके, किशोर सोळंके, दिनेश चराटे, गजेंद्र मानकर, वसीम खान, किशोर उगलमुगले, ऋतुजा कोरडे, गणेश वायरे, वैभव चौधरी व सर्व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या मागे जीवघेणा खड्डा; अपघाताचा धोका वाढला

**वर्धा/जनमाध्यम**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या मागील परिसरात मोठा खोल खड्डा निर्माण झाल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या भागातून जाणाऱ्या वाहनधारकांना तसेच पादचाऱ्यांना दररोज अपघाताचा धोका निर्माण झाला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सदर खड्ड्यासोबतच नालीच्या चेंबरवरील लोखंडी ग्रील ही अत्यंत कमकुवत व दबलेली असून कुठल्याही क्षणी तुटण्याची शक्यता आहे. या धोकादायक परिस्थितीची दखल घेत नगरसेविका रंजना पट्टेवार यांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करत तातडीने सिमेंट काँक्रिटीकरण करून खड्डा बुजविण्याची व लोखंडी ग्रीलची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.नगरसेविका पट्टेवार यांनी आपल्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी वान्मथी चंद्रमोहन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता सतीश अंभोरे व नगर परिषद मुख्याधिकारी विजय देशमुख यांनाही पाठवली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी या ठिकाणी तात्काळ दुरुस्तीचे काम हाती घेण्याची गरज असल्याचे त्या म्हणाल्या.प्रभागातील ज्येष्ठ समाजसेवक सुरेश पट्टेवार यांनीही हा प्रश्न गंभीर असून अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.



## संक्षिप्त

### मतदार यादीत बदलासाठी आणखी चार दिवस

**वर्धा-** आगामी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत नावांवरील हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार आता १७ ऑक्टोबर २०२५, शुक्रवारपर्यंत नागरिकांना ही संधी मिळणार आहे.८ ऑक्टोबर रोजी नगर परिषद कार्यालय व अधिकृत वेबसाईटवर यादी जाहीर करण्यात आली होती. सुरुवातीला १३ ऑक्टोबरपर्यंतची मर्यादा होती, मात्र आयोगाच्या १३ ऑक्टोबर रोजीच्या पत्रानुसार आणखी चार दिवस वाढविण्यात आले आहेत.मुख्याधिकारी तथा प्रशासक विजय देशमुख यांनी नागरिकांना आवाहन केले की, मतदार यादीतील समावेश, वगळा किंवा दुरुस्ती संबंधित सूचना समयोचित दाखल कराव्यात.



### सरस्वती विद्यालयाच्या कन्यांचा विजेतेपदावर मोहोर

**गिरड-** धोंडगाव पोलिस ग्राऊंड, वर्धा येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सरस्वती ग्रामीण शिक्षण संस्था, बोडखा (पाई.) संचालित सरस्वती विद्यालय, धोंडगाव या शाळेतील कन्यांनी मैदानी खेळात यश संपादन केले. १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट संघभावना, तंत्रकौशल्य आणि दमदार कामगिरीच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय विजेतेपद पटकावले. या गटातील थाळीफेक स्पर्धो श्रावणी श्याम गाठे हिने वैयक्तिक विभागात प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तिच्या या यशाने विद्यालयाचे आणि धोंडगावचे नाव जिल्ह्यात उज्जवल केले आहे.या यशाचे श्रेय विद्यार्थिनींच्या मेहनतीसोबत पालकांचे मार्गदर्शन, संस्थेच्या अध्यक्षा रेखा गुजरकर, सचिव किशोर गुजरकर तसेच संस्थापक सदस्य व शाळा समिती पदाधिकारी प्रा. संदीप झाडे यांच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनाला दिले जात आहे. मुख्याध्यापक अतुल देवढे, क्रीडा शिक्षक महेंद्र बुटे यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून विभागस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रत्नापूरमध्ये १११ लाख ५४ हजारांच्या विकासकामांचा शुभारंभ

## आ. राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस यांच्या हस्ते भूमीपूजन व लोकार्पण सोहळा

**देवळी/जनमाध्यम**

रत्नापूर येथे विविध विकास योजनेअंतर्गत १११ लाख ५४ हजार रुपयांच्या कामांचा भुमीपूजन व लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन देवळी विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश बकाने व माजी खा. रामदास तडस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते होते. या प्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भुमीपूजनावेळी बोलताना आ. राजेश बकाने म्हणाले, देवळी विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हे माझे ध्येय आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी आणून गावागावांत मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याचे काम सुरू आहे, असे ते म्हणाले.माजी खासदार रामदास तडस यांनी ग्रामविकासाचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की, गावाचा विकास झाला तरच देशाचा विकास शक्य आहे. रत्नापूरमध्ये सत्तापरिवर्तनानंतर खऱ्या अर्थाने विकासाची नवी दिशा मिळाली असून आज विविध विकास योजनेतून १११ लाख ५४ हजार रुपयांची कामे सुरू होत आहेत, हे गावासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.'जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी सांगितले की, भाजपा महायुती सरकार हे खऱ्या अर्थाने विकासात्मक आहे. पूर्वी विकास फक्त कागदावर दिसायचा, पण आज गावोगाव रस्ते, पाणी, वीज, शिक्षण यावर काम चालू आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने इतिहासातील सर्वात मोठे सहाय्यपॅकेज जाहीर करून दिलासा दिला आहे.

कार्यक्रमाचे संचालन ग्रामविकास अधिकारी अंकीता इसळ यांनी केले, तर आभारप्रदर्शन सरपंच सुधीर बोबडे यांनी केले. कार्यक्रमाला उपसरपंच सौरभ कडू, राहुल चोपडा, स्वप्नील खडसे, मयुरी मसराम, तसेच परिसरातील सरपंच, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## होमगार्डचे त्रैमासिक संमेलन उत्साहात



**वर्धा/जनमाध्यम**

महासमादेशक, महाराष्ट्र राज्य होमगार्ड यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील पुरुष व महिला होमगार्ड यांचे त्रैमासिक संमेलन जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते.

सरोज मंगल कार्यालय येथे आयोजित त्रैमासिक संमेलनात पुरुष व महिला होमगार्डच्या अडीअडीचणी सोडविण्यात आल्या. तसेच बंदोबस्त काळात होमगार्ड कर्तव्यावर हजर होऊन जिल्ह्याला दिलेली संख्या पुर्ण करतात व संपुर्ण गणवेषात कर्तव्य यशस्वीरित्या बजावतात. यापुढेही होमगार्डनी अशीच कामगिरी करुन होमगार्ड संघटनेचे नाव रोषण, लौकीक करावे, अशा शुभेच्छा सदाशिव वाघमारे यांनी दिल्या. यापुढेही आगामी काळात सन उत्सव, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त कालावधीत चांगली कामगिरी बजावावी अशा सूचना त्यांनी दिल्यात. कार्यक्रमाला जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे प्रशासकिय अधिकारी संजय सुरोशे, केंद्र नायक प्रमोद वानखेडे, पलटन नायक प्रदिप बलवीर, अनंत गजबे, समादेशक अधिकारी हेमलता कांबळे, कैलास रोखडे, सागर थेरे, तसेच पथकातील अधिकारी, पुरुष व महिला होमगार्ड उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय हॅन्डबॉल क्रीडा स्पर्धा उत्साहात

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा हँडबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय हँडबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांचे उद्घाटन बजाज विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.व्ही.टेकाडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य संजय नाखले, क्रीडा अधिकारी अनिल निमगडे, हँडबॉल असोसिएशनच्या सचिव सुप्रिया भोंगाडे, शारीरिक शिक्षण शिक्षिका योगिता तागडे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रितेश रामटेके आणि विभाग प्रमुख विनोद गराड यांची उपस्थिती होती.

बजाज विज्ञान महाविद्यालय येथे आयोजित या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये १७ वर्ष वयोगट मुलांमध्ये १२ संघांनी सहभाग घेतला. मुलींच्या १७ वर्ष वयोगटामध्ये १२ संघ सहभागी झाले होते. १४ वर्ष वयोगटात मुले व मुलींमध्ये प्रत्येकी १० संघ सहभागी झाले होते. १९ वर्ष मुलांच्या वयोगटामध्ये दोन संघ व मुलींमध्ये तीन संघ होते. जिल्ह्याच्या बऱ्याच शाळेंनी जगातल्या दुसऱ्या क्रमांकाचा जलद खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हँडबॉल या ऑलम्पिक क्रीडा प्रकारात जिल्ह्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीने स्पर्धेत सहभाग घेतला होता. शालेय क्रीडा स्पर्धा संयोजक क्रीडा अधिकारी अनिल निमगडे यांच्या नेतृत्वात व जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी शिक्षा मंडळ सभापती संजय भार्गव, स्पर्धेसाठी पंच म्हणून आग्रगामी शाळेच्या क्रीडा शिक्षिका स्वाती नागरगोजे, विशाल देशकर, हेमंत भयसारे, नरेंद्र चनाप, भुषण चव्हाण, प्रशांत मानमोडे, प्रशांत सातपुते, अन्वर हुसेन, प्रज्वल चौधरी, भूषण आगलावे, संदेश मेश्राम यांनी स्पर्धा यशस्वी करण्याकरिता सहकार्य लाभले, असे जिल्हा क्रीडा कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले.

## चोरीच्या प्रयत्नात असलेला इसम पोलिसांच्या ताब्यात

वर्धा- झेंडा चौक परिसरात रात्री चोरीच्या उद्देशाने लपून बसलेल्या एका इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले. इरफान खान सिंकदर खान पठाण (४०), रा. आर्वी नाका, असे त्याचे नाव आहे. पोलिस गस्त घालत असताना तो काळोखात संशयास्पदरीत्या बसलेला आढळला. विचारपूस केल्यावर त्याच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## आज वाचन दिन

# वाचन संस्कृतीला नवजीवन देणारी 'पुस्तक दोस्ती' चळवळ

**वर्धा -** वाचन संस्कृतीचा लोप होत चाललेला काळात नव्या पिढीमध्ये वाचनाची गोडी लावण्यासाठी सचिन सावरकर यांनी विदर्भात राबवलेली 'पुस्तक दोस्ती' चळवळ एक आदर्श उपक्रम ठरला आहे. मोबाईल व इंटरनेटच्या युगात मुलांचे वाचन कमी होत असल्याचा खबरदारीचा नाद कानावर येत असताना, सचिन सावरकर यांनी सात ते वीस वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी ही चळवळ सुरू केली.

प्रत्येक रविवारी खेडागावं जाऊन गोष्टीरूप पुस्तकांच्या माध्यमातून वाचन संस्कारासाठी प्रबोधन करत सचिन सावरकर वेळोवेळी मुलांना वाचनाची आवड लावण्यासाठी खेळी भावाने प्रयत्नशील आहेत.या उपक्रमाचा मूळ उद्देश केवळ पुस्तकांची वाटप नाही, तर मुलांच्या मनावर संस्कारांच्या बीजा पेरणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधणे हा आहे. कुंभार ओल्या मातीला आकार देतो तसा सचिन सावरकरांच्या या उपक्रमाने बालसुलभ मनावर वाचन संस्कारांचे सिंचन घडवले आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये तब्बल दहा हजार विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला असून मुलांचे स्वर व्यक्त करणे वाढले आहे.दिवाळीदरम्यान सचिन सावरकर आणि त्यांच्या सहकार्यांनी फटाके टाळून पुस्तके वाटण्याचा अनोखा उपक्रम राबवला. या कार्यक्रमांत मुलांना प्रेरक चरित्रे, वैज्ञानिक कथा, लेखकांचे विचार, खेळाडूंचे मार्गदर्शन अशा विविध साहित्यांचा परिचय करून दिला जातो.सचिन सावरकर यांनी स्वतःला मिळालेल्या पुरस्कारांच्या रकमेतूनही पुस्तके खरेदी करून ही चळवळ सातत्याने वाढवली आहे.

विदर्भातील प्रकाशक, लेखक, समाजसेवी यांना सचिन सावरकर यांनी आमंत्रण दिले आहे की, आपले पुस्तके 'पुस्तक दोस्ती अभियान' कडे पाठवावीत जेणेकरून हा उपक्रम अधिक प्रभावी म्हणून पुढे नेता येईल.आजच्या धावपळीच्या काळात मुलांना वाचनाची गोडी लावणे, त्यांच्यात सामाजिक जबाबदारी आणि मूल्य शिक्षणाची जाणीव वाढवणे, हे 'पुस्तक दोस्ती' चळवळीचे परम उद्दिष्ट आहे. या उपक्रमामुळे भविष्यातील पिढी अधिक सशक्त आणि संस्कारक्षम होईल, हा समाजासाठी मोठा ठेवा ठरेल असे निश्चित आहे.

# औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत अखिल भारतीय समन्वयीत औषधी व सुगंधी वनस्पती आणि पानवेली संशोधन प्रकल्प व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने देवळी तालुक्यातील दिघी व बोपापुर येथील अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थी शेतकऱ्यांसाठी औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.



प्रशिक्षणात अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० लाभार्थी शेतकऱ्यांना मान्यवरांच्याहस्ते १० प्रकारच्या औषधी वनस्पती, टोपले तसेच सुगंधी तेल व ट्रायकोडर्मा हे निविष्ठा वाटप करण्यात आले. सदर प्रशिक्षणामध्ये कुलगुरू डॉ.शरद गडाख, सन्माननीय तसेच विद्यापिठाचे संशोधन संचालक डॉ.एस.एस.माने यांच्या मार्गदर्शनाखाली नागार्जुन वनौषधी उद्यानचे प्रमुख डॉ.नितीन पतके यांनी जिल्ह्यात कोणत्या औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड करता येईल याबाबत माहिती दिली. औषधी वनस्पती मानवी आरोग्य आणि पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या वनस्पती शतकानुशतके वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये रोगनिवारण, आरोग्य संवर्धन आणि जीवनशैलीचा भाग म्हणून वापरल्या जातात, असे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांनी सांगितले तसेच औषधी वनस्पतींचे महत्व व उपयोग याविषयी मार्गदर्शन केले. जैवतंत्रज्ञानचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.अमित देशमुख यांनी वाटप करण्यात आलेल्या १० औषधी वनस्पतींचे गुणधर्म सांगितले. कृषि वनस्पतीशास्त्रचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.मनीष वाकोडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व औषधी व सुगंधी वनस्पतींचे संकलन करून संवर्धन कसे करावे, याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच विनोद दांदळे, संदीप दिघीकर, पोलिस पाटील सचिन वडतकर, डॉ.अंकिता अंगाईतकर, नागार्जुन वनौषधी उद्यान येथील योगेश चौके, कनिष्ठ संशोधन सहाय्यक प्रीतम वाघ आणि दिनेश घावडे, किशोर उगलमुगले, ऋतुजा कोरडे, गजेंद्र मानकर तसेच ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

## शेतकरी महिलेची आत्महत्या

**कारंजा (घा.)-** नापिकीमुळे वाढलेल्या कर्जाचा ताण सहन न झाल्याने शेतकरी महिला कांता बैगने (६०), रा. बोरी यांनी शेतातील विहिरीत उडी घेत आत्महत्या केली. त्यांचा मुलगा दीपकवरील वाढता आर्थिक ताण आणि परतफेडीची चिंता यामुळे त्या मानसिकदृष्ट्या त्रस्त होत्या. पोलिसांनी मृत्यूची नोंदकेला आहे.

### शस्त्र बाळगणारास पोलिसांकडून अटक

**सेलू-** बोंडसुला येथे सार्वजनिक ठिकाणी शस्त्रासह फिरणाऱ्या रत्नपाल जवादे (३२), रा. बोंडसुला यास पोलिसांनी अटक केली. गस्तीच्या दरम्यान दहेगाव पोलिसांना संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी पोहोचून आरोपीस शस्त्रासह पकडले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.


**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३१६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विद्यार्थ्यांना दान दात्याकडून २० सायकली प्रदान



**खल्लार/प्रतिनिधीः-** एका उदार दान दात्याने जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळा दारापूर उर्दू शाळेला भेट दिली. शाळेची पाहणी करून व विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून त्यांनी चंडिकापूर येथून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८० हजार रुपये किंमतीच्या २० सायकली अमरावती येथिल बाहेती इंटरप्रायजेस येथून खरेदी करुन चंडिकापूर वरुन दारापूर येथे उर्दू शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना (नाव प्रकाशित 'न'करण्याच्या अटीवर दान दिल्या.

सायकलींच्या खरेदीवेळी शाळेचो मुख्याध्यापक साबीर शाह, पदवीधर शिक्षक कलीम खान, डी. आर. जामनिक, अब्दुल सिद्दीकी यांनी खरेदी करून गरजू विद्यार्थ्यांना वाटप केल्या. या उदार दानदात्याचे दारापूर येथिल पूर्व माध्यमिक शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले आहे.

# यादव देशमुख महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाची विभागीय स्तरावर निवड

**तिवसा/प्रतिनिधीः-** आदर्श क्रिकेट अकादमी, गणोरी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेच्या १९ वर्षाखालील गटातील अंतिम सामन्यात यादव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा संघाने उत्कृष्ट कामगिरी करत चांदूरबाजार येथील संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले.सामन्यात तिवसा संघाने प्रभावी फलंदाजी, अचूक गोलंदाजी आणि दमदार क्षेत्ररक्षणाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व गाजवले. संघाने उत्कृष्ट संघभावना आणि शिस्तबद्ध खेळ सादर करत निर्णायक विजय मिळवला. या विजयामुळे तिवसा महाविद्यालयाचा संघ आता विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरला असून खेळाडू आणि महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विजयी संघातील खेळाडू सुशील उईके (कर्णधार),वेदांत खंडार (उपकर्णधार),जय वानखडे, सुजल सोनटक्के,तुषार तायडे, वैभव कोंडे, आकाश मरसकोल्हे, वेदांत पावडे,रोशन हिंगमिरे,त्रिशूल अळसपुरे,प्रथमेश पांडव,सागर सिंग टाक,राजवीर सिंग टाक,सार्थक वानखडे यांचा समावेश आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी विजयी संघाला विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देत कौतुक केले आहे. या विजयामुळे महाविद्यालयाच्या मानाचा तुरा रोवला गेला. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संघाचे कौतुक केले आहे.



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६७०/२०२५
**श्री.प्रभाकर अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१५.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Prabhakar Mahadevrao Yawale, Age 66 Yrs. Occu.: Labour R/o Near Harishchandra Patil Ganpati Temple, Tarkheda, Amravati.
2. Gajanan Mahadevrao Yawale (Dead) Through his L.R's
   1. Pravin Gajananrao Yawale, Age 50 Yrs. Occu.: Business R/o Near Ganpati Temple, Tarkheda, Amravati. Tq. Dist. Amravati
   2. Sachin Gajananrao Yawale, Age 45 Yrs. Occu.: Business R/o Bhaji Bazar Road, Near Ganpati Temple, Tarkheda, Amravati.
   3. Sangita Haridas Devghare, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Avdhut Mandir Ward No.3, Talegaon Syamji Panth, Tq.Ashti, Dist. Wardha.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेवराव विश्रामजी यावले** हे दिनांक 11.08.2001 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **प्रभाकर अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रभाकर अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संचालित**
**स्व.बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्था द्वारा संचालित**
**नानीबाई शिक्षण महाविद्यालय, अमरावती, कठोरा रोड,**
**अ म रा व ती**

AGAINST CAP (ACAP) VACANCY ROUND
FIRST YEAR B.Ed. ADMISSIONS-2025-26
(INSTITUTE CODE - 10027) CONTACT - 9890832080

बी.एड. प्रथम वर्ष २०२५-२६ करीता फेरी (CAP ROUND) नंतर रिक्त असलेल्या जागांसाठी प्रवेश प्रक्रिया संस्था स्तरावर दि.१५ ते १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे.

प्रवेशाकरीता सविस्तर माहितीकरीता महाविद्यालयाचे संकेतस्थळ nanibaibed.com भेट द्यावी किंवा प्रत्यक्ष महाविद्यालयामध्ये संपर्क साधावा.

**प्राचार्य**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३६०/२०२५
**श्रीमती सपना अधिक दोन -वि- अनिता**
पुढील ता.२१.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सपना **गौरीष** वर्धे, वय ३३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. प्रियल **गौरीष** वर्धे, वय ०९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. सम्राट **गौरीष** वर्धे, वय ०५ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
(अर्जदार नं.१ ही स्वतःकरीता व अ.पा.क.आई म्हणून अर्जदार नं.२ व ३ करीता) सर्व रा.गोखले लेआऊट, बालाजी नगर, नवोदय विद्यालयाजवळ, नवसारी, व्ही.एम.व्ही. अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गौरीष नामदेव वर्धे** यांचे दिनांक **१६.०६.२०२५** रोजी **नवसारी, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सपना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सपना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सूचनापत्र

सर्वत्र लोकांना जाहीर सूचना देतो कि

मी विशाल द पवार रा अयोध्या नगर भुसावळ माझ्या मालकीचे मौ पाथरी ता देवळी जी वर्धा येथील शेट सर्वे क्र १६८/४,क्षेत्रफळ ०.९३ हे. आर आकार रुपये २.३१ रुपये एवढी शेतजमीन आहे या मालमत्तेबाबत मा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग येथे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. करिता या मालमततेसंबंधि कोणीही खरेदी विक्रीचे व्यवहार करू नये.केल्यास रद्दबातल समजण्यात येईल.

**विशाल पवार**
ता.भुसावल, जि.जळगाव, मोबाईल : ८९८३६०३०३५

## जाहीर सुचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे **१) राजेश जगन्नाथराव काळे, २) नितीन दादाराव तायडे, ३) लक्ष्मीनारायण सुभाष यादव, ४) राजुभाऊ माधवराव लुंगे**, सर्व रा.अमरावती यांनी **राम बाबुरावजी हिंगणकर**, रा.मुर्तिजापूर, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्त (शेतजमीन) विकत घेण्याचा करार केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अकोला ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अकोलाचे हद्दीतील ग्रामपंचायत असलेले मौजे - वडगांव, ता.जि.अकोला येथील,

| | |
|---|---|
| १) शेत सर्व्हे नं.१०७ क्षेत्रफळ २ हे.०० आर | ८) शेत सर्व्हे नं.११८ क्षेत्रफळ १ हे.९५ आर |
| २) शेत सर्व्हे नं.१०८ क्षेत्रफळ २ हे.०० आर | ९) शेत सर्व्हे नं.११९ क्षेत्रफळ १ हे.६० आर |
| ३) शेत सर्व्हे नं.१०९ क्षेत्रफळ १ हे.८२ आर | १०) शेत सर्व्हे नं.१२० क्षेत्रफळ २ हे.०० आर |
| ४) शेत सर्व्हे नं.११० क्षेत्रफळ १ हे.८२ आर | ११) शेत सर्व्हे नं.१२१ क्षेत्रफळ २ हे.०० आर |
| ५) शेत सर्व्हे नं.११३ क्षेत्रफळ १ हे.८२ आर | १२) शेत सर्व्हे नं.१२२ क्षेत्रफळ १ हे.०७ आर |
| ६) शेत सर्व्हे नं.११४ क्षेत्रफळ १ हे.८१ आर | १३) शेत सर्व्हे नं.१२३ क्षेत्रफळ ० हे.९३ आर |
| ७) शेत सर्व्हे नं.११७ क्षेत्रफळ १ हे.७७ आर | |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा करार माझे पक्षकार यांनी केलेला आहे व लवकरच सदर मालमत्तेची खरेदी करुन घेणार आहेत.

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझीशन, कूळ वहीवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बँक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सूचना प्रेषित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

**अमरावती**
**दिनांक १४.१०.२०२५**

**स्वाक्षरी/-**
**(ॲड.राजेश एन.पट्टलवार)**
**प्रभात कॉलनी, शिलांगण रोड, अमरावती**
**मो.नं.९९७०४४७७०७**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.६३७/२०२५ — ने.ता.१८.११.२०२५

**अर्जदार -**
१. श्रीमती सविता सुरेशराव लांडे, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.शिवदीप सुरेशराव लांडे, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
३. कु.धनश्री सुरेशराव लांडे, वय २० वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील नामे **सुरेशराव किसनराव लांडे** हे दि.**१४.११.२०२१** रोजी **खानापूर**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.१०.२०२५

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३१६/२०२५
**श्री.नरेंद्र -वि- निरंक**
पुढील ता.१४.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Narendra Shankar Sadamake, Age 50 Yrs. Occu.: Labour R/o Adarsha Neharu Nagar, Congress Nagar Road, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शंकर राजाराम सडमाके** हे दिनांक 02.02.2018 रोजी **ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे व मयत उमा शंकर सडमाके** ही दिनांक **१४.१०.२०१८** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **नरेंद्र विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नरेंद्र विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं.३०६/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१०/१०/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**
किरकोळ अर्ज क्र.३६१/२०२५ — ने.ता.०१.११.२०२५

**अर्जदार -**
**१. श्रीमती वर्षा महेंद्र यादव,** वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
**२. इशीका महेंद्र यादव,** वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण
**३. अनुष्का महेंद्र यादव,** वय ११ वर्षे, धंदा - शिक्षण
**४. माही महेंद्र यादव,** वय ०९ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार क्र.२ ते ४ अ.पा.क.अर्जदार क्र.१
सर्व रा. ६४, जीन प्लॉट, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **महेंद्र धनराज यादव** हे दिनांक १०.०५.२०२५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
(शिक्का) दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २३४४/२०२५**
**श्री ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २४.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Dnyaneshwar Bhashkar Karale,** Age 64 yrs., Occu.- Service, R/o. Morshi Road, Om Trezari,Arjun Nagar, Amravati Dist.Amravati- 444603
2) **Sau. Lalita Dnyaneshwar Karale,** Age 55 yrs., Occu.- Household, R/o. - Morshi Road, Om Trezari, Arjun Nagar, Amravati Dist.Amravati - 444603

-- विरुध्द -

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ऋषिकेश ज्ञानेश्वर कराळे हे दि.१७/११/२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री.ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
(शिक्का) दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २२७८/२०२५**
**श्रीमती शितल अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २५.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Shital Gopal Rathi,** Age 46 yrs., Occu.- Housewife,
2) **Purva Gopalji Rathi,** Age 22 yrs., Occu.- Education,
3) **Raman Gopalji Rathi,** Age 16 yrs., Occu.- Education, **(Minor) Through its Natural Guardian, Mother i.e. applicant No.1**
**All R/o.** House No. 104, Rachana Plam, Ganediwal Layout Camp, Amravati, Tq. & Dist. Amravati -444601
2nd Address- Mangilal Plot, Amravati,Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द -

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गोपाल रतनलालजी राठी हे दि.२४/०८/२००५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शितल अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शितल अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
(शिक्का) दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.६३५/२०२५ — ने.ता.१७.११.२०२५

**अर्जदार -**
१. श्रीमती निर्मलाबाई अंबादासराव तागडे, वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.विनोद अंबादासराव तागडे, वय ३७ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.संजय अंबादासराव तागडे, वय ३५ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.चिंचोली गवळी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सौ.रंजना अनिलराव ढोके, वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
रा.जाटलापूर (लिंगा) ता.पांढुर्णा, जि.पांढुर्णा (म.प्र.)

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील नामे **अंबादास गुलाबराव तागडे** हे दि.**२१.०८.२०२५** रोजी **चिंचोली गवळी,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.१०.२०२५

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.६३८/२०२५ — ने.ता.०९.१२.२०२५

**अर्जदार -**
१. श्रीमती मिनाक्षी छत्रपती यावले, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
२. चि.ओम छत्रपती यावले, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार नं.२ करीता अ.पा.क.आई अर्जदार नं.१
दोघेही रा.दुर्गवाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.प्रिया संकेत महल्ले, वय २७ वर्षे, धंदा - घरकाम
(लग्नापुर्वीचे नांव कु.प्रिया छत्रपती यावले)
रा.धामणगांव रेल्वे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती
४. श्रीमती लिलाबाई महादेवराव यावले, वय ८५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दुर्गवाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील तर अर्जदार नं.४ चा मुलगा नामे **छत्रपती महादेवराव यावले** हे दि.**१७.०९.२०२५** रोजी **दुर्गवाडा** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.१०.२०२५

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **श्री रोहितकुमार कैलाशचंद्र धानुका** यांनी **श्रीमती कौशल्यबाई सुनीलराव पोकळे** यांच्या मालकीची खालील वर्णन केलेली मालमत्ता यांच्या सोबत सदहू मालमत्त्याचा सौदा झाला असुन ज्याचे इसार दि. ०२.०९.२०२५ रोजी झालेले आहे.

**सदर मालमत्तेचे वर्णन :-**

पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपाचे हददीतील मौजे - बडनेरा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नंबर १५१, मधील ० हे ५९ आर जमिनीतील मा.जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांच्या फाईलावरील रा.मा.क्र.एन.ए.पी. ३४/ बडनेरा-१५२/२०१०-११ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या त्रिमुर्ती नगर नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील प्लॉट क्र.६-अ (सहा-अ) याची साईज ८.५०X १६ मी असून याचे एकुण क्षेत्रफळ १४६४ चौ.फुट (१३६.०० चौ.मी.) आहे. त्या प्लॉटची चतुःर्सिमा :

**पुर्वेस** : प्लॉट नं.५, — **पश्चिमेस :-** प्लॉट नं.६-ब
**उत्तरेस :-** रस्ता, — **दक्षिणेस :-** प्लॉट नं.- ७ ब

तरी सर्व लोकांना जाहीरपणे सूचित करण्यात येते की, वरील नमुद मालमत्तेमध्ये अथवा त्या संदर्भात.कोणत्याही प्रकारचा,कोणताही हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, अधिकार, धारणाधिकार,सुविधाधिकार, करार, इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत आपला आक्षेप असल्यास खालील पत्यांवर संबंधीत कागदपत्रांसह येऊन भेटावे. असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदहू मालमत्तेची खरेदी घेतील व त्यानंतर माझे पक्षकाराचे खरेदी व मालकी हक्काबाबत कोणत्याही प्रकारचा आक्षेप, वाद अथवा उजर चालणार नाही व तो माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : /१०/२०२५**

**सही/-**
**ॲड.रुबीना शेख**
चमन शाहवली, युनिवर्सिटी रोड, अमरावती
मो.नं.-९७६४६७३३७९

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अमरावती विभाग, अमरावती
## चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.१९१/कलम १९/२०२५ — पुढील तारीख ०७/१०/२०२५**
**सार्वजनिक न्यासाचे नांव नोंदणी क्रमांक - मॉ कुलदेवी ट्रस्ट अमरावती, ता.जि.अमरावती**
**बाबत अर्जदार - श्री अनिल जुगलकिशोर अग्रवाल**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) -**

**ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** गाव नमुना ७/१२ प्रमाणे ता.जि.अमरावती येथील मौजा निंभोरा शेत स.न.गट क्र.५०/२अ व ५०/२ब मधील अमेनिटी प्लॉट नं. ११०, क्षेत्रफळ ६००.०० चौ.मी. जमीन **मॉ कुलदेवी ट्रस्ट, अमरावती ता.जि.अमरावती** यांची चर्तुसिमा :-

पुर्वेस :- प्लॉट नं.१०३ ते १०९, पश्चिमेस :-खुली जागा,
उत्तरेस :-रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट नं.८२ व १०२

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु. १७,८२,०००/-**

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०३/१०/२०२५ रोजी दिली.

**सही /-**
**अधीक्षक (न्याय शाखा)**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

**मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.अर्ज क्र.२५७/२०२५ — ने.ता.१२.११.२०२५**

**शांता एकनाथ कानबाले आणि इतर वि. निरंक**

**अर्जदार :-**
**१. शांता एकनाथ कानबाले**
**२. माधव एकनाथ कानबाले**
**३. संजय एकनाथ कानबाले** — अर्जदार क्र.१ ते ३ रा.मलकापूर,पो.सालोड ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
**४. धनंजय एकनाथ कानबाले** — रा.साईनगर, अमरावती
**५. वैशाली सतीश गंजीवाले** — रा.बसस्थानक मागे, विवेकांनद कॉलनी,मोर्शी

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **मयत एकनाथ देवाबाआप्पा कानबाले** यांचा मृत्यू दि.**०२.०७.२०२५** रोजी झाला. अ.क्र.१ ही मृतक यांची पत्नी आहे व तसेच अर्जदार क्र.२ ते ५ हे मृतक यांचे अपत्य आहे.अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १३ ऑक्टोबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक**
(शिक्का) मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.६४६/२०२५ — ने.ता.२८.११.२०२५

**अर्जदार -**
१. श्रीमती मंगलाबाई वासुदेवराव निरापुरे, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
२. सुनिल वासुदेवराव निरापुरे, वय २८ वर्षे, धंदा - शेती
३. अजय वासुदेवराव निरापुरे, वय २० वर्षे, धंदा - शेती
रा.चिंचोली गवळी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील नामे **वासुदेव अर्जुन निरापुरे** हे दि.**१५.०८.२०२५** रोजी **चिंचोली गवळी,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.१०.२०२५

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
(शिक्का) दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सुचना

सर्वसामान्य नागरिक, बांधकाम व्यावसायिक, खरेदीदार व संबंधित सर्व घटक यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, माझे वडील **स्व.शरदचंद्र खांडेकर** यांनी खरेदी केलेली मालमत्ता ही वादात असून ती माझे बंधू **श्री.विजय शरदचंद्र खांडेकर** यांनी बेकायदेशीररित्या आपल्या नावाने केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन -**

मौजे - राजापेठ, प्रगणे - बडनेरा ता.जि.अमरावती पन्नालाल नगर, शिट नं.७९-सी, नझुल प्लॉट नं. १/१ (खरेदीप्रमाणे प्लॉट नं.२६ व २७)

वरील मालमत्ता संदर्भात माझ्या संमतीशिवाय कुठलाही व्यवहार करु नये.

सदर नोटीस ही कायदेशीर प्रकियेसाठी आणि सर्वसामान्य जनतेस सावध करण्याकरीता देण्यात येत आहे.

**दिनांक १४/१०/२०२५**
**स्थळ - अमरावती**

**(संजय खांडेकर)**

# एकाच वार्डातील नागरिकांची नावे चार वार्डात

## मतदार यादी दुरुस्त करण्याची निलेश रोडे यांची पत्रकार परिषदेमधून मागणी

**मोर्शी/ वार्ताहर**

नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होणार असून त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मोर्शी नगर परिषदेची मूळ प्रारूप मतदारयादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध करण्यात आली. या प्रसिद्ध झालेल्या यादीत एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागामधील यादीत घेण्यात आल्याने प्रचंड घोळ निर्माण झाला आहे. त्यामुळे मतदारांसह इच्छुक उमेदवारांचीसुद्धा संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.या प्रारूप याद्या ताबडतोब दुरुस्त करण्यात याव्यात अशी मागणी निलेश रोडे यांनी पत्रकार परीषदेमधून केली आहे.

संपूर्ण राज्यात जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होत आहेत. दुसरीकडे मतदार यादीमध्ये इतरत्र नावे गेल्याने ऐन मतदानाच्या दिवशी अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता मोर्शी मध्ये निर्माण झाली आहे.निलेश रोडे यांनी पत्रकार परीषदेमध्ये प्रारूप याद्यांमध्ये असलेला गोंधळ वाचून दाखविला.त्यामध्ये स्वीपर कॉलनी मध्ये रहात असलेले अनेक मतदार अलग अलग प्रभागात दाखविण्यात आले.शहराच्या जुन्या वस्तीमध्ये राहणारे शेकडो मुस्लिमांची नावे नवीन तयार झालेल्या कॉलनी मध्ये दाखविण्यात आली आहे



तर एकाच घरातील ३ व्यक्ती एका प्रभागात तर एक व्यक्ती दुसऱ्या प्रभागात दाखविण्यात आलेल्या आहे.या प्रभागातील अंतर सुद्धा दूर असल्याने या मतदारांना मतदान करण्यासाठी सुद्धा दूरवर जावे लागेल त्या कारणाने मतदानाची टक्केवारी कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याचबरोबर मोर्शी नप मध्ये १२ प्रभाग असुन या प्रभागातील मतदार संख्येत सुद्धा तफावत असल्या चा आरोप निलेश रोडे यांनी केला आहे. नप तर्फे प्रकाशित केलेल्या प्रारूप मतदार यादीत प्रभाग क्रमांक सहा मध्ये १८२१ इतके मतदार दर्शविले असून प्रभाग क्रमांक दहा मध्ये ३३६० इतके मतदार दाखविले आहे.दोन प्रभागात इतकी तफावत कशी असा प्रश्न सुद्धा त्यांनी या निमित्ताने उपस्थित केलेला आहे. या मतदार यादीमध्ये झालेल्या घोळाचा फटका माजी नगरसेवकांनासुद्धा बसला असून त्यांची नावे परंपरागत प्रभागातून दुसऱ्या प्रभागांमध्ये समाविष्ट झालेली आहेत.

या याद्यांमध्ये प्रचंड प्रमाणात घोळ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे देशभरात सुरू असलेल्या मतदार यादीच्या घोळाबाबत नागरिकात शंका निर्माण होत आहे. या याद्या तयार करताना जे अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी या याद्यांमध्ये हेतू पुरस्सर तफावत निर्माण केली का? याबाबत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीसुद्धा निलेश रोडे यांनी केली आहे.

या पत्रकार परिषदेला निलेश रोडे, मोबीन सर, अतिक अहमद बाबू, कमलेश रोडे, पारेख रोडे, हितेश उपासे, विशाल खराले, शुभम मिश्रा, विजय राऊत, दिलीप डहाणकर,विशाल बडोदेकर आदी उपस्थीत होते.

# 'प्रभाग तिथे राष्ट्रवादी' अभियाना-अंतर्गत कार्यकारणी जाहीर

## गाडगे नगर - पीडीएमसी प्रभागातील पदाधिकाऱ्यांना आ.संजय खोडके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप



**अमरावती/ का.प्र.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने आज पर्यंत युवकांना मोठ्या प्रमाणात काम करण्याची संधी दिली आहे. युवक विकासासाठी राष्ट्रवादीकडे एक अनुकूल धोरण असून त्यांना आत्मनिर्भर, रोजगारक्षम बनवून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पक्षाने महत्वाची भूमिका बजावली आहे. 'प्रभाग तिथे राष्ट्रवादी' या अभियानात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश महासचिव आ. संजय खोडके यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अमरावती अंतर्गत प्रभाग क्रमांक २ गाडगे नगर-पीडीएमसीच्या कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांना आ.संजय खोडके यांच्या हस्ते नियुक्त पत्र वाटप करण्यात आले. ज्यामध्ये प्रभाग अध्यक्ष मनीष फाटे यांच्या नेतृत्वात बाबू अमृतकर - प्रभाग उपाध्यक्ष, निखिल राऊत- प्रभाग सहसचिव, सुनील खिची - हॉकर्स सेल प्रमुख, वैभव निचळ - व्यापार सेल प्रमुख, तर अमोल वैराळे, आशिष बोके,हेमंत खरोडे, विकी कडू, सुमित चौधरी, रोशन गावंडे, निखिल फाटे यांना प्रभाग सदस्य म्हणून कार्यकारणीत स्थान देण्यात आले आहे. त्याचबरोबर धीरज तायडे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत प्रवेश केल्याने त्यांना राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या शहर उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन नियुक्ती पत्र सुद्धा देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस चे जिल्हाध्यक्ष (शहर) ऋतुराज राऊत, योगेश सवई, संकेत महल्ले रायुकॉ शहर उपाध्यक्ष मनीष पाटील, आदींची उपस्थिती होती. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष (शहर) ऋतुराज राऊत यांनी 'प्रभाग तिथे राष्ट्रवादी' हि संकल्पना मोठ्या जोमाने राबविण्यास सुरुवात केल्याने युवकांची संघटनात्मक बांधणी करून पक्षाला बळकटी मिळत आहे.

# जी.एच.रायसोनी विश्वविद्यालयात संशोधकांसाठी कार्यशाळा



**अमरावती/ का.प्र.**


जी. एच. रायसोनी विश्वविद्यालय, अमरावती येथे २०२५-२६ शैक्षणिक सत्रासाठी पीएच.डी. संशोधकांसाठी आयोजित पाच दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळा झाली. या परिवर्तनकारी कार्यक्रमात ४० हून अधिक उत्साही संशोधकांनी सहभाग घेतला. संशोधन डिझाइन, नैतिकता, डेटा विश्लेषण आणि विद्वत्तापूर्ण लेखन यांसारख्या महत्त्वपूर्ण कौशल्यांना प्रोत्साहन देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य अतिथी डॉ. प्रांतिक बनर्जी, हिस्लॉप कॉलेज, नागपूर येथील इंग्रजी प्राध्यापक, यांच्या प्रेरणादायी भाषणाने झाले. त्यांनी 'तुमचे संशोधन प्रभावी आहे का? संशोधनाचे कौशल्य' या विषयावर सामाजिकदृष्ट्या प्रासंगिक संशोधनावर जोर दिला. रजिस्ट्रार डॉ. स्नेहिल जैसवाल, पीएच.डी. सेल प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे, परीक्षा नियंत्रक डॉ. विनायक डकरे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीने उद्घाटन समारंभाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. डॉ. चवाटे यांच्या 'संशोधन परिदृश्याचे नेव्हिगेशन: संकल्पनेपासून निष्कर्षापर्यंत' या सत्राने उत्साहपूर्ण चर्चेला चालना दिली. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी संचालित केलेल्या सत्रांनी कार्यशाळेला समृद्ध केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद अतीक यांनी संशोधन नीतिमत्तेवर प्रकाश टाकला, तर डॉ. सचिन पडोले यांनी मापनाच्या अचूकतेवर भर दिला. नागपूरच्या सी.पी. अँड बेरार कॉलेजचे डॉ. आशीष लिंगे यांनी नमुना तंत्रांचे स्पष्टीकरण दिले, तर डॉ. अमोल झाडे यांनी बौद्धिक संपदा अधिकारांवर चर्चा केली. अंतिम दिवशी, व्हीएनआयटी, नागपूरचे डॉ. राहुल रालेगांवकर यांनी नैतिक लेखन आणि साहित्यिक चोरी प्रतिबंधनावर मार्गदर्शन केले. डॉ. चवाटे यांनी साहित्य समीक्षा आणि डेटा विश्लेषणासाठी डिजिटल साधनांचा परिचय करून दिला. रजिस्ट्रार डॉ. जैसवाल यांच्या 'शिकण्या पासून अंमलबजावणीपर्यंतचा मार्ग' या समारोप भाषणाने संशोधकांना नाविन्यपूर्ण संशोधनासाठी प्रेरणा दिली. विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ. विनायक देशपांडे आणि विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. प्रशांत आवचट यांच्या उपस्थितीत समारोप समारंभ झाला. यावेळी डॉ. देशपांडे यांनी संशोधकांना उत्साही राहून उच्च दर्जाचे संशोधन करण्याचा सल्ला दिला, तर डॉ. आवचट यांनी नियोजनबद्ध आणि व्यवस्थितपणे संशोधन कार्य करण्यावर भर दिला. डॉ. चवाटे आणि डॉ. पडोले यांनी समन्वित केलेली ही कार्यशाळा विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टता आणि संशोधन संस्कृतीप्रती असलेल्या बांधिलकीचे दर्शन घडवते.

# सरकारी निधीअभावी पोषण आहार योजनेचे 'कुपोषण'

## प्राथमिक शिक्षक समितीची निधीची मागणी

## चार दिवसात निधी वाटपाचे शिक्षण संचालक यांचे आश्वासन




**अमरावती/ का.प्र.**

राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार योजनेचा निधी शाळांना गेल्या चार महिन्यांपासून मिळालेला नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून निधीच मिळालेला नसल्याने पोषण आहार योजनेसाठी शाळांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून पोषण आहार उपलब्ध करावा लागत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील चार दिवसांत शाळांना चार महिन्यांचा निधी एकत्रित वितरित केला जाणार असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने दिले.



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासकीय शाळा, अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना राबवण्यात येते. त्यात पहिली ते पाचवी विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक, १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक, २० ग्रॅम प्रथिनेयुक्त भोजन देण्यात येते. त्यासाठी शासननियुक्त पुरवठादाराकडून शाळांना तांदूळ, कडधान्ये, तेल, तिखट, मीठ, मसाला, मोहरी, जिरे अशा धान्य मालाचा पुरवठा केला जातो. ग्रामीण भागात स्वयंपाक्यांकडून आहार शिजवून घेऊन विद्यार्थ्यांना दिला जातो, शहरात केंद्रीय स्वयंपाकघरातून आहार पुरविण्यात येतो. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, 'पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीत प्रचंड बेफिकीरी आहे. योजनेचे कोणतेही अनुदान अग्रीम स्वरूपात दिले जात नाही. तसेच, दोन दोन-तीन महिने अनुदान मिळत नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून गेल्या चार महिन्यांपासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कोणताही बचत गट किंवा स्वयंपाकी या योजनेचे काम स्वीकारत नाही. शालेय पोषण आहार देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक हे शेतमजूर, कष्टकरी, गरीब कुटुंबातील असतात. हेच पालक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी असतात. ते शालेय पोषण आहार योजनेमध्ये खर्चाचा हातभार उचलू शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून ही योजना चालवण्याची वेळ आली आहे.

# विद्यार्थी परिषदेच्या 'समस्या शोध मोहीम'ला व्यापक स्वरूप

**अमरावती/ का.प्र.**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अमरावती महानगराच्यावतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच मूलभूत सोयी-सुविधांशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने 'समस्या शोध मोहीम' हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या मोहिमेद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी, तक्रारी आणि प्रश्न थेट विद्यार्थी परिषदेकडे पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी त्यांना भेडसावणाऱ्या समस्या प्रत्यक्ष व ऑनलाइन गुगल फॉर्मच्या माध्यमातून नोंदविल्या.



या मोहिमेचा प्राथमिक उद्देश विद्यार्थ्यांच्या समस्या केवळ नोंदवणे एवढाच मर्यादित नसून, त्या समस्यांच्या मूळावर जाऊन त्यांच्या समाधानासाठी निर्णायक आणि रचनात्मक पावले उचलण्याचा आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नेहमीच विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी संघर्षशील राहिली आहे. या मोहिमेद्वारे विद्यार्थी-हिताचे प्रश्न पुढे आणून, संबंधित प्रशासकीय व शैक्षणिक अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून, आवश्यक ती कार्यवाही तातडीने घडवून आणण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ आणि बुलढाणा या पाचही जिल्ह्यांमध्ये ही मोहीम मोठ्या उत्साहात पार पडत असून, एकूण ३२५ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. महाविद्यालयांतील अभ्यासक्रमातील अडचणी, वसतिगृहांमधील निकृष्ट भोजनव्यवस्था, ग्रंथालय व प्रयोगशाळांमधील अपुरी साधनसामग्री, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्न अशा विविध मुद्द्यांची नोंद या मोहिमेद्वारे होत आहे. या सर्व समस्यांचे संकलन करून एक सविस्तर अहवाल तयार करण्यात येणार असून, तो विद्यापीठ प्रशासन तसेच शासन पातळीवर सादर करण्यात येईल.

विद्यार्थी परिषदेचा हा लढा केवळ समस्या नोंदवण्यापुरता मर्यादित नाही, तर त्या सोडवण्यासाठी निर्णायक आंदोलन उभारले जाईल, असा निर्धार अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विदर्भ प्रांत मंत्री पायल ताई किनाके यांनी व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सदैव कटिबद्ध असून, प्रत्येक विद्यार्थ्याचा आवाज योग्य ठिकाणी पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय मिळवून देण्यासाठी परिषदेचा प्रत्येक कार्यकर्ता सज्ज असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### पौष्टिक आहार जीवनाचा अविभाज्य घटक- प्राचार्य डॉ.बोडखे



**अमरावती-** जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर अर्थशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यासोबत महिला व बालकल्याण विभाग एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना दर्यापूर यांच्यासोबत करण्यात आला. ज्या माध्यमातून विविध कार्यक्रम आणि प्रोजेक्ट घेण्यात येणार आहे. या अंतर्गत २०० अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची कार्यशाळा महाविद्यालयांच्या जिजाऊ हॉलमध्ये संपन्न झाले. या कार्यशाळेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अमोल मेरगळ एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी दर्यापूर हे उपस्थित होते.तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. राजेश बुरंगे तसेच प्रशांत अढाऊ उपस्थित होते. ही कार्यशाळा दोन सत्रांमध्ये घेण्यात आली.उद्घाटन पर भाषणामध्ये प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी आजच्या जीवन शैलीमध्ये अन्न सुरक्षितता या विषयावरती विविध उदाहरणे दिली.

### विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात जनजागृती कार्यशाळा



**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा मानसशास्त्र विभाग व जिल्हा सामान्य रुग्णालयामधील मानसोपचार विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य जनजागृती सप्ताहानिमित्त 'मानसिक आरोग्याची पायाभूत माहिती : आजार, उपचार,नैदानिक दृष्टिकोन' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. प्रमुख वक्ते जिल्हा रुग्णालयाचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ.अमोल गुल्हाने, विशेष अतिथी म्हणून समुपदेशक मंगेश घोडेस्वार, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ.श्रध्दा हरकंचे उपस्थित होते. डॉ.अमोल गुल्हाने यांनी मानसिक आजारांचे विविध प्रकार, उपचार पध्दती, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. मंगेश घोडेस्वार यांनी मानसिक आरोग्य जागृतीचे महत्त्व पटवून दिले.डॉ.श्रध्दा हरकंचे यांनी राग,तणाव,चिंता अशा भावनिक अडचणी कमी करण्यासाठी विविध मानसशास्त्रीय तंत्रांची माहिती दिली. कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता प्रा. मंजुषा लकडे, प्रा.ऋतुजा ठाकरे, प्रा.दिग्विजय कडू, प्रा.अभिजित खंडारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### कपाशी पिकांवर लाल्या रोगाचा प्रादूर्भाव

**कुऱ्हा/ वार्ताहर**



[illegible] तालुक्यातील कुऱ्हा परिसरातील यावर्षीच्या अतिपावसा मुळे सोयाबीन पिक तर गेलेत,पण कसे बसे तरी कपाशी पिके शेतकऱ्यांच्या हाती येतील असे वाटत होत, परंतु ऐका ऐकी आठ दिवसांपासून कपाशी पिकांवर इतका भयंकर लाल्या नावाचा रोग पडल्यामुळे शेतकरी आर्थिक परिस्थिती पुन्हा बिघडली असून कपाशी पिकांची सुध्दा नापिकी होत आहे. शासनाने त्वरित कपाशी पिकांचा सर्व्हे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी. अशी मागणी कुऱ्हा परिसरातील वऱ्हा,घोटा, माळेगांव, बोर्डा, चनुष्ठा, हसनापूर, आलवाडा,दुर्गवाडा,कौंडण्यपूर,वंडली, छिंदवाडी, मारडा, मिर्चापूर, काळाघोटा, अंजनवती, मसदी आदी गावातील शेतकऱ्यांची आहे. तसेच यावर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक मदत अद्याप मिळाली नाही ती दिवाळी आधी जर मिळाली तर शेतकऱ्यांची कशी बशी दिवाळी साजरी होईल.नाही तर शेतकऱ्यांची यावर्षीच्या नापिकीमुळे अंधारात दिवाळी साजरी करावी लागेल असे सुध्दा शेतकऱ्यांमध्ये चर्चा असून झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी.

### शकुंतला अमृतकर यांचे निधन



**आसेगाव पूर्णा-** अचलपुर तालुक्यातील हिवरा पूर्णा येथील शकुंतर्ल नारायणराव अमृतकर यांचे अल्पशा आजाराने (९० वर्षी) रात्री नऊ वाजताच्या दरम्यान अमरावती येथील गाडगे नगर मध्ये निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुलं, दोन मुली, सुना व नातवंड असा बराचसा आप्त परिवार आहे. अमरावती येथील हिंदू मशान भूमीत त्यांच्या पार्थिवयावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**अमरावती -** स्थानिक, डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर येथे वाणिज्य व अर्थशास्त्र, सामाजिक शास्त्रे अभ्यास



मंडळांचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ कमलाकर पायस हे अध्यक्ष तर अभ्यास मंडळाचे उद्घाटन इंदिरा बाई मेघे महाविद्यालय अमरावती येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संगीता ढगे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. आकाश ढोमणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन डॉ. एस के तंत्रपाळे, डॉ. आर एम देशमुख आणि प्रा. दिपाली पडोळे यांच्यामार्फत करण्यात आले तसेच डॉ,पी एल अंबोरे,डॉ. खेडकर डॉ. मस्के यांनी अभ्यास मंडळात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची नावे जाहीर केली. प्रा. पी आर एस राव प्रा. मानकर प्रा. मेघा चिमणकर प्रा. दिपाली गवई प्रा. ज्योती टाले,प्रा. राधा काळे ,डॉ पांडे प्रा. बनसोड प्रा. आढाऊ किशोर बिजवे ,नाखले विजय इंगळे, युनाते या सर्वांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# नांदगावपेठ पोलिसांनी पकडला २१ लाखांचा पोर्टिफाईड तांदूळ

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

### सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याच्या अवैध वाहतुकीवर कारवाई

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील धान्याची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्यांविरोधात नांदगावपेठ पोलिसांनी मंगळवारी मोठी कारवाई केली. काटेकोर तपास आणि जलद प्रतिसाद देत





पोलिसांनी पोर्टिफाईड तांदळाने भरलेला ट्रक पकडत तब्बल २१ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या धाडसी कारवाईने धान्य तस्करी करणाऱ्या रॅकेट्समध्ये एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना एका ट्रकमधून पोर्टिफाईड तांदूळ अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती ग्रामीण यांना कळवून संयुक्तरीत्या पाहणी केली. पंचासमक्ष पंचनामा करून २४० क्विंटल पोर्टिफाईड तांदूळ किंमत सुमारे ६ लाख रुपये आणि ट्रक क्र. एमएच ☞(पान २ वर)

# अजित पवारांकडून संजय खोडके यांची राष्ट्रवादीच्या संघटन महासचिव पदी नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधीः-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संघटनात्मक पुनर्रचनेच्या दिशेने आणखी एक निर्णायक पाऊल उचलत पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांची 'संघटन महासचिव' (General Secretary-Organisation) म्हणून नियुक्ती केली. पक्षात सुरू असलेल्या नव्या घडामोडी आणि संघटन बळकटीकरणाच्या प्रयत्नांचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेसकडून 'राष्ट्रवादी चिंतन शिबिर' आणि 'राष्ट्रवादी परिवार मिलन' सारख्या उपक्रमांद्वारे पक्षातील संवाद



आणि तळागाळातील संपर्क वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात आता 'संघटन महासचिव' या नव्या पदनिर्मितीमुळे संघटनेतील अडथळे कमी करून संवाद अधिक परिणामकारक करण्यास मदत होणार आहे. संजय खोडके यांची या पदावर नियुक्ती झाल्याने कार्यकर्त्यांना त्यांच्या अडचणी आणि सूचना थेट पक्ष संघटनेपर्यंत पोहोचविण्याचे एक निश्चित माध्यम मिळणार आहे.


एनएससीआय, वरळी येथे आज झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सर्व आमदार आणि जिल्हाध्यक्ष सहभागी झाले होते. या बैठकीत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा रोडमॅप ठरविण्यावर चर्चा झाली. 'राष्ट्रवादी कनेक्ट' या नव्या मोबाईल ॲपच्या माध्यमातून एकसंध संवादयंत्रणा आणि कार्यकर्त्यांमधील समन्वय अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा पातळीवर नियमित 'राष्ट्रवादी परिवार मिलन' कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा आराखडा ☞(पान २ वर)

# श्री.क्षेत्र वायगावला आ.राजेश वानखडे यांचे प्रयत्नाने 'ब' वर्ग तीर्थ क्षेत्राचा दर्जा

### पाच कोटींच्या अनुज्ञेय निधीमधून तीर्थक्षेत्राचा विकासाचा मार्ग प्रशस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील धार्मिक व सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.तिवसा विधानसभेचे आमदार राजेश वानखडे यांचे सातत्यपूर्ण प्रयत्नाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग)' अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्रांना 'ब'



वर्ग दर्जा प्रदान करण्याच्या निर्णयानुसार, अमरावती जिल्ह्यातील तालुका भातकुली येथील श्री. सिद्धिविनायक गणपती संस्थान, श्री. क्षेत्र वायगावला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला असून तसा शासन निर्णय ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला आहे. या निर्णयामुळे तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत



शासनाकडून ५ कोटी रुपयांच्या अनुज्ञेय निधीमधून श्री. क्षेत्र वायगाव येथे भाविकांकरिता व नागरिकांकरींता विकासकामांचा मार्ग प्रशस्त झाला असून, या पवित्र स्थळाचा भव्य विकास होण्यास सुरुवात होणार आहे.

श्री. क्षेत्र वायगाव हे अमरावती जिल्ह्यातील ☞(पान २ वर)

# कचरा माफिया आणि मनपा स्थलांतरावरून काँग्रेस आक्रमक

## पत्रकार परिषद मध्ये दिला जनहितासाठी आंदोलन करण्याचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका नेहरू मैदान मध्ये स्थलांतरण आणि शहरातील कचरा माफीयांच्या गैर प्रकाराबाबत शहर काँग्रेस पक्षाने तीव्र विरोध दर्शविला आहे. १० ऑक्टोंबर रोजी महानगरपालिका आयुक्तांच्या सोबत झालेल्या बैठकी मध्ये आमदार दांपत्याने नेहरू मैदान येथे मनपाची नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव मांडला होता. याला आमचा विरोध आहे. जनहिताच्या कार्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेस



पदाधिकाऱ्यांनी आज मंगळवार १४ ऑक्टोंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये दिला. त्यांनी सांगितले की, महानगरपालिकाला नेहरू मैदान मध्ये स्थानांतरित करण्याला आमचा विरोध आहे.नेहरू मैदान अमरावतीचा अभिमान आहे. शहराच्या मध्यभागातील एकमेव खुली जागा आहे. ऐतिहासिक सभाचे हे साक्ष आहे. शहरातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक व राजकीय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी एकमेव जागा आहे. शहराचा वारसा आणि नागरिकांचे हक्क हिसकावून घेण्याचे प्रयत्न केले जात आहे हे आम्ही सहन करणार नाही. नेहरू मैदानच्या ऐतिहासिक वास्तूसाठी जन आंदोलन करण्याची आमची तयारी आहे. तसेच ☞(पान २ वर)

# निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सज्ज

### जिप,पंचायत समिती,नगराध्यक्ष - नगरसेवक पदाकिरता इच्छुकांनी अर्ज दाखल करा -जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका लवकर जाहीर होणार असल्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नगरपंचायत, नगरपालिका अध्यक्ष ,जिल्हापरिषद ,पंचायत समिती सदस्य पदांसाठी आरक्षण निश्चित झाले आहे. या निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवाराकडून गुरुवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ पासून अर्ज मागविण्यात येत आहे.



याकरिता इच्छुकांनी शुल्कासह अर्ज दाखल करण्याचे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी केले आहे. सदर अर्ज हे शिवसेना पक्षाच्या जिल्हाप्रमुख , तालुकाप्रमुख ,शहरप्रमुख यांच्याकडे उपलब्ध आहेत. सदर अर्ज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यालय शिवसेना भवन राजापेठ येथे जमा करावे व अर्जा सोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक असून आरक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा निवड मंडळाच्या ☞(पान २ वर)

# निवृत्त अधिकाऱ्याच्या बॅगेतून ७.८० लाखांचा ऐवज लंपास



### - एसटी बस प्रवासादरम्यान घटना


### - बडनेरा पोलिसांकडून गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य परिवहन (एसटी) बसमधील प्रवासादरम्यान एका निवृत्त अधिकाऱ्याची बॅग फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल ७.८० लाखांचा ऐवज लंपास केला. ही घटना मंगरुळपीर ते साईनगर मार्गावर घडली असून, बडनेरा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वाशिम येथील हरिदास रामकृष्ण सावके (वय ६७), हे निवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी असून, १३ ऑक्टोबर रोजी अमरावतीतील साईनगर येथे आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी एसटी बसने प्रवास करत होते. ☞(पान २ वर)

# दिवाळीच्या सणात रेशन दुकानातून गरिबांचा गहू गायब

### यंदा दिवाळी ज्वारी, तांदूळावरच साजरी करावी लागणार



■ शासनाच्या खरेदी धोरणांतर्गत खरेदी करण्यात आलेल्या ज्वारी चे आदेशानुसार सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत लाभार्थ्यांना वितरित करण्यात येत आहे.
**-वैभव महाजन, पुरवठा अधिकारी,दर्यापूर**

**खल्लार/प्रतिनिधीः-** सर्वात मोठा सण दिवाळी तोंडावर आला आहे.'दिवाळी' हा शब्द उच्चारला, तरी आपल्या अंगात उत्साह संचारतो, मन आनंदी होते. नवी खरेदी, फराळाचे नविन पदार्थ, रांगोळी,रोषणाई, भेटवस्तू आणि आनंदी आनंद अशा वातावरणाची आस आपल्याला लागते. अशातच एकीकडे यंदा दिवाळीसाठी राज्य सरकार कडून आनंदाचा शिधा रेशन कार्ड धारकांना दिला जाणार नाही.तर दुसरीकडे ग्रामिण भागातील रेशन दुकानावर गहू ऐवजी ज्वारी दिली जात आहे. शिवाय तांदूळ देखील निष्कृष्ठ दर्जाचा असल्यामुळे दिवाळी साजरी करायची कशी असा प्रश्न सर्वसामान्य ☞(पान २ वर)

# वरली मटका खेळणारे दोन जण ताब्यात, एक फरार

### बडनेरा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**
बडनेरा पोलिसांनी वरली मटक्यावर मोठी कारवाई करत दोन जणांना रंगेहात पकडले, तर एक आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला. पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी इस्लामी चौक परिसरात ही कारवाई केली.

१४ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास बडनेरा पोलीस पथक गस्त घालत असताना, इस्लामी चौक, जुनी वस्ती येथे वरली



मटका खेळला जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने छापा टाकला असता, अशोक कालूजी चव्हाण (वय ५५, रा. अण्णाभाऊ साठे नगर, बडनेरा) ☞(पान २ वर)

# दोन कोटींचे सोने चोरी प्रकरणः आरोपी अटक, ५६.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** मुंबई वरून दागिणे मालाची डिलिव्हरी करण्यासाठी शहरात येणाऱ्या एका सराफा व्यापाऱ्याला ५६ लाख ६८ हजारांनी लुटण्यात आले होते. या प्रकरणात नाशिक रोड पोलिसांनी तात्काळ कार्यवाही करून आरोपी राधे गज्जू बिसोंने (वय ३०, गांडगोहन, झल्लार ,ता. भैसदेही) याला अटक केली आहे. त्याच्या कडून चोरी गेलेल्या सोन्याच्या दागिन्याची बॅग जप्त करण्यात आली आहे.

### ■ सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयित कैद

बडनेरा रेल्वे स्टेशनवर हावडा–मुंबई मेलच्या जनरल डब्यातून तब्बल २ कोटी ११ लाख रुपयांचे सोने चोरीला गेल्याची सनसनाटी घटना उघडकीस आली होती. या घटनेमुळे रेल्वे प्रवासी आणि व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. जीआरपी बडनेरा पोलिसांनी तातडीने तपास सुरू करून सीसीटीव्ही फुटेजमध्ये चार संशयितांचा मागोवा मिळवला आहे.

माहितीनुसार प्रदीप कुमार धर्मपाल सिंह (दादर ईस्ट, मुंबई) अमरावती मध्ये सराफा व्यापाऱ्यांना सोन्याच्या दागिन्याची डिलिव्हरी करण्यासाठी हावडा मुंबई मेल ने निघाले होते. त्यांच्या कोच एस फोर मध्ये त्यांचे रिझर्वेशन होते. रात्रीचा वेळ असल्यामुळे प्रदीप कुमार दागिनेनी ☞(पान २ वर)

# रसलपुरमध्ये पोलीस पाटलाला मारहाण

### -आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगांव पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या रसलपुर साऊर मध्ये पत्नी आणि मुलाला मारहाण करणाऱ्या इसमाला समजविण्यासाठी गेलेल्या पोलीस पाटलाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सोमवारी सायंकाळी उघडकीस आली आहे. पोलीस पाटील रवींद्र जनार्धन बोंडे (वय ५६ ) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गावामध्ये राहणाऱ्या उमेश केने (वय ४५ )विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



माहितीनुसार सोमवारी दुपारी आरोपी उमेश केने पत्नीला मारहाण करत होता. गेल्या दोन-तीन दिवसापासून तो पत्नी आणि मुलांना मारहाण करत होता. यामुळे घाबरलेल्या पत्नीने याची तक्रार ☞(पान २ वर)

# वाहन चोरी प्रकरणातील आरोपी अटकेत

### चोरीस गेलेली यामाहा फॅसिनो गाडी हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दुचाकी चोरी प्रकरणाचा उलगडा करण्यात गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. या कारवाईत पोलिसांनी चोरीस गेलेली यामाहा फॅसिनो गाडी हस्तगत केली असून, एका तरुणाला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी फिर्यादी यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांची यामाहा फॅसिनो दुचाकी ही शाम नगर पार्किंग परिसरातून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. दरम्यान, या प्रकरणाचा समांतर ☞(पान २ वर)



# १२ वर्षीय मुलावर ५६ वर्षीय इसमाकडून अत्याचार

### आरोपीला केली अटकेत



**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-**
दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. घरगुती परिचयाचा गैरफायदा घेत ५६ वर्षीय इसमाने १२ वर्षीय मुलावर अनैतिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सतीश (वय ५६) हा दत्तापूर परिसरात राहतो. सोमवारी त्याची पत्नी व मुलगी बाहेरगावी गेल्याने घरात तो एकटाच होता. घरगुती ओळख असलेल्या अल्पवयीन मुलाची त्याच्या घरी ये-जा होती. या ओळखीचा फायदा घेत सतीशने मुलावर अनैसर्गिक अत्याचार ☞(पान २ वर)

# शासकीय अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन

### कॅरी ऑन लागू करण्याची मागणी - जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये कॅरी ऑन लागू करण्याच्या मागणीसाठी आज मंगळवार १४ ऑक्टोंबर रोजी विद्यार्थ्यांनी प्राचार्य कक्षासमोर ठिय्या आंदोलन केले आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना सुद्धा निवेदन दिले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये २०२० या प्रणालीमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या



विद्यार्थ्यांना अमरावती विद्यापीठाने दिलेल्या स्मूथ प्रोग्रेसच्या आधारावर ३ व ५ सेमिस्टर मध्ये ☞(पान २ वर)